महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

आक्टोबर १९५२ — दिवाळी अंक

★ या अंकांत ★

युगवाणी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
स्थापना: १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ
प्रा. भ. श्री. पंडित
डॉ. मा. गो. देशमुख
प्रा. अ. ना. देशपांडे
श्री. मधुकर मंगरूळकर

संपादक :
वामन चोरघडे

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :
"युगवाणी" कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १:

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
इंदिरा ग्रंथ संग्रह

संतांचा सदेह स्वर्गवास

डॉ. शं. दा. पेंडसे

★

आपल्या देशांतील प्राचीन समाजव्यवस्थेप्रमाणे, वर्णप्राप्त सामाजिक आणि आश्रमप्राप्त कौटुंबिक कर्तव्यकर्मे निरासक्त वृत्तीने यथासांग आचरून, वयाच्या उत्तरार्धांत संसाराचा भार मुलांवर सोपवून, संसारांतून निवृत्त होण्याचा क्रम अनेक थोर पुरुषांनी आचरिला आहे. वानप्रस्थ आणि संन्यास हे आश्रम स्वीकारून नैसर्गिक क्रमाने येणाऱ्या मृत्यूचा आनंदाने स्वीकार करण्याची सिद्धता या काळांत ते करीत असत. पण यांपैकी कांही लोक, देहाची उपयुक्तता संपल्यानंतर तो आपोआप पडेपर्यंत वाट न पाहतां त्याच्या बंधनांतून आपण होऊन मुक्त होण्याचा मार्गहि स्वीकारीत असत. आत्महत्येचा दोष न लागतां अशा रीतीने देहत्याग करण्याची सोय परंपरागत रुढीने केलेली होती असें दिसतें. प्रयागक्षेत्रीं त्रिवेणी-संगमावर किंवा पवित्र मानलेल्या नद्यांमध्यें, देह अर्पण केला असतां, हिमालयांत कडेलोट करून घेतला असतां किंवा देह पडेपर्यंत उत्तरेकडे चालत गेलें असतां आत्महत्येचा दोष लागत नाही अशी समजूत असे.

पांच पांडव आणि द्रौपदी अशा रीतीने हिमालयांत उत्तरेकडे चालत गेलीं. धर्मराजाशिवाय बाकीच्या सर्वांचें स्वर्गांत जाण्यापूर्वींच, देहपतन झालें आणि एकटा धर्मराज, त्याच्या पायाचा आंगठा तेवढा गळून, स्वर्गांत पोचला असें पौराणिक कथानक आहे. त्यावरून प्राचीन काळीं, हिमालयांत उत्तरेकडे चालत जाऊन देहत्याग करण्याची प्रथा रूढ होती असें दिसतें. उत्तरेच्या हिमालयांतील उंच प्रदेशांना स्वर्ग ही संज्ञा असे हें प्रसिद्ध आहे. अर्जुन तर एकदां स्वर्गांत इंद्राकडे कांही दिवस राहून परतहि आला होता. हिमालयांत उत्तरेकडे देहपात होईपर्यंत चालत जाण्याच्या रुढीवरून स्वर्गवासी आणि कैलासवासी या संज्ञा रूढ झाल्या असाव्यात. शैवसाधु कैलासाकडे आणि वैष्णवसाधु बदरीनारायणाकडे आयुष्याची अखेर करण्याकरितां जात असावेत. वृद्धापकाळीं सर्व निरवानिरव करून काशी, प्रयाग किंवा हिमालयांतील यात्रा करण्यामध्यें, प्राचीन काळीं तरी जाणूनबुजून किंवा आपोआप होणाऱ्या देहपाताचा हेतु स्पष्ट दिसतो.

हटयोगी लोकांमध्यें, सर्व शरीरांतून प्राण गोळा करीत शेवटीं मस्तकांतील ब्रह्मरंध्राच्या द्वारा—टाळू फोडून—ते बाहेर टाकून प्राणत्याग करणारे योगी श्रेष्ठ समजले जात. काशीला अद्यापि संन्यासी मनुष्याला तो मेल्यानंतर, मांडी घालून शिंक्यामध्यें बसवून गंगेवर नेतात व नावेमध्ये घालून गंगेच्या मध्यभागीं नेऊन, शंखाने त्याची टाळू फोडल्याचें नाटक करून त्याचा देह गंगेच्या स्वाधीन करतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानेश्वरांच्या मातापित्यांनी प्रयागांत जाऊन त्रिवेणीसंगमावर देहार्पण करून देहान्त प्रायश्चित्त घेतल्याची आख्यायिका आहे. स्वतः ज्ञानदेवांनी आळंदीला जिवंत समाधि घेतली हें तर प्रसिद्धच आहे. त्यानंतर त्यांचे बंधु सोपानदेव यांनी सासवड येथे तशीच जिवंत समाधि घेतली. त्यांच्याबरोबर वटेश्वरांनी व नंतर चांगदेवांनीहि तेथेच जिवंत समाधि घेतली. निवृत्तिनाथांनी नंतर त्र्यंबकेश्वरीं समाधि घेतली. त्यांना नाथसंप्रदायांतील गैनीनाथांचा उपदेश त्र्यंबकेश्वराच्या आसपासच झाला होता व त्यांनी नंतर तो आपल्या भांवडांना दिला होता. नामदेवानेहि देवद्वारीं विठ्ठलाचे पायरीपाशी समाधि घेतली ती नामदेवाची पायरी या नांवाने प्रसिद्ध आहे.

महानुभाव संप्रदायाचे प्रसिद्ध संस्थापक श्रीचक्रधर हे सुद्धां आयुष्याच्या अखेरीस बदरिकाश्रमाकडे निघून गेले. त्यांचें पुढे काय झालें तें कोणासहि माहित नाही. त्यांचा प्रिय पट्टशिष्य नागदेवाचार्य हा हिमालयाच्या पायथ्यापर्यंत त्यांच्या-बरोबर होता. पण त्यालाहि मार्गे टाकून श्रीचक्रधर पुढे निघून गेले. श्रीकृष्णाच्या विरहाने उद्धवाची जी अवस्था झाली तीच नागदेवाचार्यांची झाली. पुढे महदंबेने त्याचा शोध करून त्याला परत ऋद्धिपुरास आणलें, असें कै. भावे सांगतात. ज्या अर्थी श्रीचक्रधरांचें पुढे काय झालें तें समजलें नाही. त्याअर्थी या नागदेवाचार्यांनेच त्यांच्या गादीवर येण्याकरितां त्यांची हत्या केली असावी असा संशय सुदैवाने अद्यापि कोणी प्रकट केला नाही ! एकनाथांनी जलसमाधि घेतल्याची आख्यायिका कै. भावे यांनी दिली आहे. यानंतरचें सदेह स्वर्गवासाचें उदाहरण प्रसिद्ध भगवद्भक्त तुकाराम महाराज यांचें आहे. जीवितकार्य संपलें आहे, देहाविषयीं अहं किंवा मम भाव यत्किंचितहि राहिलेला नाही, देहबंधातून सुटण्याकरतां आत्मा उत्सुक झाला आहे, अशी स्थिति प्राप्त झाली असतां शेवटचें कीर्तन करून, "आम्ही जातों अपुल्या गांवा। अमुचा रामराम घ्यावा" असा सर्वांचा निरोप घेऊन तुकाराममहाराज निघून गेले. त्यांच्याबरोबर त्यांचे पट्टशिष्य रामेश्वरभट्ट होते. ते ३-४ दिवसांनी महाराजांची गोधडी व टाळ घेऊन परतले. यावरून तुकाराम महाराजांनी, ज्ञानेश्वरांच्याप्रमाणे आपण होऊन देहत्याग करण्याकरितां, इंद्रायणींत किंवा काशीप्रयागकडे जाऊन गंगेमध्ये जलसमाधि घेतली असावी किंवा उत्तरेकडे हिमालयांत ते निघून गेले असावे हेंच अधिक संभवतें. तुकाराम बुवांना स्वप्नांत मंत्रोपदेश करणारे केशव चैतन्य हे ब्राह्मण होते; त्यांचे पट्टशिष्य रामेश्वरभट्ट हेहि ब्राह्मण होते. देहविषयकहि अहंभाव ज्यांच्या ठिकाणी राहिला नव्हता, अशा या भगवत्भक्तांच्या मनांत जाति-विषयक अहंकार शिल्लक राहिला असेल हें संभवत नाही. तुकारामबुवांची शिष्या बहिणाबाई हिच्या मतें रामेश्वरभट्ट हा योगी व तुकारामबुवापेक्षां वयाने पुष्कळच मोठा होता. इ. सन १६१० पूर्वीच आळंदीला नाथ-संप्रदाय स्वीकारून अयाचित वृत्तीने तो रहात असे. तुकारामबुवांचें शिष्यत्व स्वीकारणाऱ्या या वृद्ध विरक्त गृहस्थाला बुवांची हत्या करून काय मिळणार होतें ? बुवांचे प्रतिस्पर्धी म्हणून प्रसिद्ध असलेले मंबाजीबुवा यांना तर बुवांनी विठोबाची पूजाअर्चा करण्यास ठेविलें होतें व इ. स. १६५०/५१ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी मंबाजीस जमीन इनाम दिलेली दिसते.

तुकारामबुवावर श्रीशिवाजी महाराजांची अत्यंत भक्ति होती हें प्रसिद्ध आहे. बुवांच्या प्रयाणकालाच्या सुमारास म्हणजे इ. स.१६५० पर्यंत देहू, लोहगांव व पुणें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भागांत शिवाजीच्या सनदा व अंमल अव्याहत चालत असल्याचें प्रसिद्ध इतिहास-संशोधक श्री. वेंद्रे यांनी वरील रामेश्वरभट्ट व मंबाजीबुवा यांच्या हकीकतीसहित दाखविलें आहे. बुवांची कोणी दुष्टाने खरोखरच हत्या केली असती तर शिवाजीच्या अंमलांत ती पचली नसती. आणि पचली असेल तर त्याच्या अंमलावर तो मोठा कलंकच म्हणावा लागेल. पण वस्तुस्थिति तशी नाही. समर्थ रामदासांनीहि हिमालयांत यात्रा करीत असतां स्वतःचा कडेलोट करण्याचा प्रयत्न केला पण श्रीरामाने त्यांना वाचविलें असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे. यावरून सत्पुरुषांनी आपण होऊन केलेल्या देहत्यागाच्या प्राचीन परंपरेला अनुसरून तुकाराम बुवांनीहि सदेह स्वर्गवास केला असें निःसंशय वाटतें.

‘जीवनाच्या गाभाऱ्यांत’

★

जीवनाच्या गाभाऱ्यांत
कोणी घातली फुंकर
मालविली मानव्याची
ज्योत प्रशांत सुंदर

जीवनाच्या गाभाऱ्यांत
हासल्या पुष्प–राशी
कोणी दिली उधळून
आज पूजा एकाएकी

जीवनाच्या गाभाऱ्यांत
होतें कलेचें नर्तन
आसुरांच्या तांडवांत
गेले झंकार विरून

जीवनाच्या गाभाऱ्यांत
प्रीतिरसाचा ओलावा
रसरसल्या ज्वालांनी
आज कोणी सुकविला

जीवनाच्या गाभाऱ्यांत
होतें गायन मंजुळ
आज उठविले कोणी
आर्त स्वरांचे कल्लोळ

जीवनाच्या गाभाऱ्यांत
स्थापूं राम-लक्ष्मण
नवदीपांच्या तेजांत
विरं द्या हो विश्व तम !

माया सरदेसाई

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य आणि संकेत

भवानीशंकर श्री. पंडित

★

'सहितस्य भावः साहित्यम्' अशी साहित्याची व्याख्या आहे. जीवनांतील निरनिराळ्या क्षेत्रांत मनुष्याच्या बरोबरीनें वावरणारा जो भाव तोच साहित्य. आणि साहित्याचा इतिहास म्हणजे तरी काय ? मनुष्याचे भाव, विचार आणि चित्तवृत्ति यांच्या विकासाचाच तो इतिहास आहे. साहित्य हें कांहीं साध्य नाहीं. तें केवळ एक साधन आहे. जुन्या कल्पनेप्रमाणे सांगावयाचें झालें तर, धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करण्याचीं जीं अनेक साधनें आहेत; किंवा नव्या समजुतीप्रमाणे बोलावयाचें झालें तर, मानव्याचें मांगल्य, राष्ट्राचें कल्याण, समाजाची सेवा, कुटुंबाचें पालन व व्यक्तींचें हित साधण्याचीं जीं असंख्य साधनें आहेत, त्यांपैकीं साहित्य हें एक साधन आहे. चित्राचें माध्यम ज्याप्रमाणे रंग, संगीताचें माध्यम ज्याप्रमाणे स्वर, त्याप्रमाणे भाषा साहित्याचें माध्यम आहे. भाषा म्हणजे मनुष्यांच्या विशिष्ट समुदायांत सतत व्यवहारानें, आपसांतील सलोख्यानें अथवा एकमेकांच्या समजुतीनें उत्पन्न झालेला संकेत आहे. आणि भाषेचा इतिहास म्हणजे तरी काय ? मौखिक अथवा लिखित साहित्यांत मनुष्याचे भाव, विचार आणि चित्तवृत्ति यांच्या संकेताचे जे भिन्न भिन्न प्रकार आढळतात, त्यांच्या विकासाचाच तो इतिहास आहे. तेव्हां साहित्यांतील भाव, विकार व चित्तवृत्ति यांचा भाषेच्या द्वारां संकेताशी संबंध येत असतो हें अगदी स्पष्ट आहे. प्रस्तुत त्या संबंधाचाच विचार करावयाचा असून ललित साहित्याचा आस्वाद घेत असतांना जो एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद अनुभवास येतो, त्याच्या प्राप्तीस जशीं इतर अनेक कारणें आहेत, तसें संकेत हेंहि एक कारण आहे, किंबहुना तेंच आदिकारण आहे, हें या लेखांत दाखविण्याचा हेतु आहे.

साहित्याच्या आस्वादनापासून आनंद कां होतो याविषयींची मीमांसा अनेक विद्वान रसिकांनी निरनिराळ्या प्रकारें केली आहे. त्या सर्वांचा आशय देण्यापूर्वीं कांहीं पौरस्त्य व पाश्चात्य साहित्यशास्त्रवेत्त्यांनी साहित्याच्या ज्या निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत, त्याहि येथे संकलित स्वरूपांत विचारांत घेणें आवश्यक आहे. कारण त्यांच्यांतहि साहित्यापासून प्राप्त होणाऱ्या आनंदाची कमीअधिक मीमांसा ग्रथित झाली आहे.

संकलित स्वरूपांत त्या व्याख्या अशा;—रमणीय अर्थाचे जे प्रतिपादक शब्द तेंच काव्य असें जगन्नाथ म्हणतो. (काव्य या शब्दाला आतां मराठी साहित्याच्या क्षेत्रांत 'एक पद्यबद्ध ललित साहित्याचा प्रकार' असा आकुंचित अर्थ आलेला आहे. परंतु संस्कृत साहित्यशास्त्रांत 'काव्य' म्हणजेच 'साहित्य' असा व्यापक अर्थ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. तेव्हा या साऱ्या व्याख्या साहित्यासंबंधींच आहेत हें सांगण्याची आवश्यकता नाही.) विश्वनाथ रसात्मक वाक्याला काव्य असें नांव देतो. वर्डस्वर्थच्या मते भावाविष्कृति म्हणजे काव्य होय. आनंदवर्धनाने व्यंगार्थाला म्हणजे ध्वनीला काव्य म्हटलें आहे. वामन रीतीला महत्त्व देतो. आर्नोल्ड म्हणतो की, 'काव्य म्हणजे संस्कृतीची टीका!' कार्लाइलला 'संगीतात्मक भाव' हाच काव्याच्या स्वरूपाचा वाटतो. कोणी रचनेला, कोणी शब्दाला, तर कोणी प्रसाद, माधुर्य आणि ओज या गुणांनाच महत्त्व देतात. कोणी कोणी अलंकार हेंच काव्याचें सर्वस्व आहे असें मानतात. या साऱ्यांच्या मतांत तथ्य आहे. परंतु संपूर्ण सत्य नाही हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

साहित्यांत वक्रोक्तीला म्हणजे अलंकारांना महत्त्व आहे, याच मताचें अनुमोदन इंग्रजी भाषेंतील पुढील अवतरणांत आहे;—

Straight is the line of duty and Curve is the line of beauty

परंतु वक्रोक्तीच कशाला? स्वभावोक्तीने सुद्धां सौंदर्याचा साक्षात्कार होऊन आनंद होतो हें कुणाच्या अनुभवाचें नाही? "Alas! the poor-fellow is no more" या साध्या वाक्यांत कोणता अलंकार आहे? किंवा रुग्णीच्या 'इश्श' या उद्गारांत कोणती वक्रोक्ति आहे? किंवा रघुनाथ पंडिताच्या—

म्हातारी उडतां न येच तिजला माता मदीया अशी
कांता काय वदूं नवप्रसव ते साता दिसांची तशी
पाता या उभयांस मी मज विधी घातास योजीतसे
हातांमाजि नृपा! तुझ्या गवसलों आतां करावें कसें?

या सर्वश्रुत श्लोकांत कोणता अलंकार आहे? परंतु यांच्यापासून आनंदाची प्राप्ति होतेच ना? मग अमुक एका कारणानेच आनंद अनुभवास येतो हा हेका तरी धरण्याचें कारण काय? तात्पर्य, काव्याच्या या भिन्न भिन्न व्याख्यांत ग्रथित केलेल्या तत्त्वांपासून आनंद प्राप्त होतो या म्हणण्यांत तथ्य असलें, तरी संपूर्ण सत्य मात्र नाही.

आपल्याकडे कै. न. चिं. केळकर व कै. वा. म. जोशी यांनी साहित्याच्या आनंदाच्या केलेल्या मीमांसा प्रसिद्ध आहेत. त्यांचा सारांश थोडक्यांत सांगतां येईल. तो असाः कै. केळकरांचें म्हणणें असें की, एकादें नाटक पाहत असतांना मनुष्य आपली भूमिका न सोडतांनाच रंगभूमीवरील भूमिकेंत आपली भूमिका संक्रमित करतो. या तादात्म्याने त्याला आनंद होतो. या तादात्म्यास त्यांनी 'सविकल्प समाधि' हें नांव दिलें आहे. साहित्याच्या आनंदाची ही केळकरप्रणीत उपपत्ति कै. जोशी यांना पूर्णतया मान्य नाही. ते म्हणतात की ही उपपत्ति केवळ नाटकापुरतीच सीमित आहे. कविता, कथा, कादंबरी, निबंध इत्यादिकांना ती लावतां येत नाही. शिवाय नाटकांत अनेक भूमिका असतात. तेव्हां प्रेक्षक कोणत्या भूमिकेशी समरस होतो? कां सर्वच भूमिकांशी तन्मय होतो? नाटकांतील दृश्य प्रसंग नाटककाराची अलौकिक प्रतिभा, नटाचें अभिनयनैपुण्य इत्यादिकांशी तो तादात्म्य पावत नाही काय? तेव्हा केळकरांची उपपत्ति ही एकतर्फी आहे असें ते म्हणतात. आपल्याकडे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शोकान्तिकांची प्रथा नव्हती. इंग्रजीवाङ्मयाचे परिशीलनाने आपले नाटककार शोकांतिका लिहूं लागले. त्यापासून आनंद कां होतो या विषयीं विवेचन करतांना जोशी यांनी अरिस्टॉटलचें 'कॅथर्सिस्'चें (catharsis) तत्त्व पुढें मांडलें आहे. मनुष्याच्या अंतःकरणांत मूळांतच दुःखें कुचंबलेलीं असतात. डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुप्रवाहाने त्यांना बाहेरची वाट मिळाली म्हणजे त्याचें अंतःकरण हलकें होऊन त्याला आनंद वाटतो असें त्याचें म्हणणें आहे. मनुष्याला पश्चात्तापानंतर जें समाधान वाटतें त्याची उपपत्ति अशीच बसवतां येईल. उदात्तापासून होणाऱ्या आनंदाची मीमांसा करतांना जोशी यांनी मनुष्याच्या ठिकाणीं असणाऱ्या 'अहं'मुळे त्याला आनंद होतो असें सांगितलें आहे. एकादें लहान मूल भर पावसांत छत्री घेऊन रस्त्यावर उभें राहतें कारण त्याच्या मनांतील अहं जागृत होऊन त्यास म्हणत असतो की, पहा, मी किती निर्भय आहें. अशा पावसास सुद्धा मी भीक घालीत नाही,— आणि म्हणून त्याला आनंद वाटतो. या विषयासंबंधीं प्रा. ना. सी. फडके यांचें मत असें आहे की, मनुष्याला प्रत्यक्ष जीवनांत ज्या उणीवा व अडीअडचणी भासतात, त्या साऱ्यांची अप्रत्यक्ष पूर्ति साहित्यांत कल्पनेने होते, आणि म्हणून त्यास साहित्यापासून आनंद प्राप्त होतो. काव्याच्या निरनिराळया उपपत्तींतहि तथ्य आहे. परंतु संपूर्ण सत्य नाही. मला वाटतें, आपल्या मनावर विशिष्ट संकेतांचे जे संस्कार झालेले असतात, त्यामुळे साहित्यापासून आनंद होतो. अर्थात् तो केवळ त्यामुळेच होतो असें मात्र मी म्हणत नाही. परंतु साहित्यापासून आनंद होण्याचें तेंहि एक फार मोठें प्रभावी कारण आहे असें मी म्हणतों. माझी ही उपपत्ती बरोबर आहे असें मी म्हणत नाही किंवा ती सर्वांना पटलीच पाहिजे असाहि माझा आग्रह नाही. केवळ एक निराळा दृष्टिकोण म्हणून मी ती पुढे मांडत आहें.

परंतु माझ्या उपपत्तीचें स्पष्टीकरण करण्यापूर्वी संस्कृत साहित्यशास्त्रांत 'संकेत' हा पारिभाषिक शब्द दोन निरनिराळया अर्थांनी आला आहे, या विषयीं थोडेसें विवेचन करणें आवश्यक आहे. संस्कृत साहित्यशास्त्रांत 'संकेत' हा शब्द पारिभाषिक आहे. संस्कृत साहित्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या रसिकांना त्यांतील 'कविसमय', व 'कविसंकेत' हे शब्द ठाऊक असतील. त्यासंबंधी संस्कृत साहित्यशास्त्रांत सविस्तर विवेचन नाही. जें अल्प विवेचन आहे, तें असें;—निसर्गांत विद्यमान नसलेल्या अशा गोष्टी आपल्या प्राचीन कवींनी कल्पिल्या होत्या. त्या आपल्या साहित्यशास्त्रकारांनी संकलित केल्या आहेत. ह्या कल्पित गोष्टींना 'कविसमय' किंवा 'कविसंकेत' म्हणतात. उदाहरणार्थ, कीर्तीचा रंग धवल आहे, पापाचा रंग काळा आहे, वैराग्याचा रंग भगवा आहे व समृद्धीचा रंग हिरवा आहे; किंवा एकाद्या तरुणीने जर अशोकावर आपल्या पायांचा प्रहार केला अथवा बकुळावर मदिरेची चूळ टाकिली, तर त्यांना फुलें येतात; किंवा चकोर चंद्राकडे जमीनीवरूनच टक लावतो आणि त्याची चंद्रकला डोळ्यांनी प्राशन करतो, अथवा चातक फक्त आकाशांतून वरच्यावर पडणारेच पावसाचे थेंब पितो. अशा प्रकारचे अनेक संकेत संस्कृत साहित्यशास्त्रांत आहेत आणि ते काल्पनिक आहेत. परंतु कै. चिं. वि. वैद्य यांनी या संबंधी आपला एक अनुभव नमूद केला आहे. तो असा की, हंस उन्हाळयांत मानस सरोवराकडे जातात आणि थंडीत दक्षिणेकडे परततात हा जो संकेत आहे, तो चक्षुर्वै सत्यम् आहे. परंतु येथे या कविसंकेतांच्या सत्यासत्याची शहानिशा करणें अप्रस्तुत आहे. मला येथे एवढेंच नमूद करावयाचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे की, मला जो 'संकेत' अभिप्रेत आहे, तो हा कविसंकेत नाही. माझा 'संकेत' यापेक्षां निराळा आहे.

संस्कृत साहित्य शास्त्रांत 'संकेत' हा शब्द आणखी एका अर्थानें प्रयुक्त झाला आहे. कोणत्याहि शब्दाच्या मूळ अर्थाला संस्कृतांत 'संकेत' हा शब्द आहे. उदाहरणार्थ, 'कुशल' या शब्दाचा प्रचलित अर्थ 'निपुण' असा आहे. परंतु त्याचा मूळ अर्थ अगदी वेगळा आहे. 'कुश' या नांवाच्या गवताचें टोक अत्यंत अणकुचिदार असतें. तें बोंचलें तर रक्त निघतें. तेव्हां त्याला उपटतांना अतिशय काळजी घ्यावी लागते. तेव्हां अशा रोतानें अतिशय काळजीनें जीं माणसें 'कुश' उपटीत, त्यांना 'कुशल' म्हणत असत. त्याचा 'निपुण' हा अर्थ त्यानंतरचा आहे. परंतु मला अभिप्रेत असलेला 'संकेत' हा शब्द या अर्थानेहि मी योजित नाही.

मला अभिप्रेत असलेला 'संकेत' या शब्दाचा अर्थ अगदी साधा, सरळ व रोजच्या व्यवहारांतला आहे. माझ्या मतानुसार 'संकेत' म्हणजे विशिष्ट शब्द किंवा विशिष्ट शब्दप्रयोग अथवा संपूर्ण वाक्य कानांवर पडतांच श्रोत्याच्या मनांत ज्या अर्थाची ठाम अशी खूणगांठ बांधलेली असते तो अर्थ. हा अर्थ अर्थातच एखाद्या विशिष्ट शब्दाशी संबद्ध असेल, किंवा त्याच्या मागच्या कल्पनेशी संलग्न असेल त्या 'संकेता'चें स्वरूप शाब्दिक, अर्थासंबंधी, काल्पनिक, सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, अथवा इतर अनेक प्रकाराचे असूं शकेल.

मनुष्यानें आपल्या जीवनाचा जरा सूक्ष्म व खोल विचार केला, तर त्याला असें आढळेल की आपलें सारें जीवनच विशिष्ट संकेतांनी क्रमबद्ध आहे. अंतःकरणावरील संस्करणामुळे हे संकेत आपल्या चिरपरिचयाचे असतात. आणि विशिष्ट परिस्थितींत त्यांची स्पष्ट अभिव्यक्ति झाली म्हणजे मनुष्यास विशेष आनंद होतो.

मनुष्याचे विचार, विकार, भावना व कल्पना यांना प्रकट करण्याचें साधन जी भाषा तीच मुळीं संकेताच्या स्वरूपाची आहे. मनुष्याचा वाग्व्यवहार हा परस्परांतील संकेतांमुळेच चालतो. ते संकेत जर समजले नाहीत, तर व्यवहार होणार नाही. भाषा हा मनुष्या-मनुष्यांचा आपसांतला संकेत आहे. जगांत एकच भाषा नाही, भिन्न भिन्न भाषा आहेत ही गोष्ट या सिद्धांताच्या पुराव्यादाखल पुढे करतां येईल. किंवा भाषा ही ईश्वरदत्त नाही, ती मनुष्यनिर्मित आहे या सिद्धांताचा पाठपुरावा करावयाचा झाल्यास पारशांना आपली मूळ भाषा येत नाही, ते गुजराथी भाषेतून आपला व्यवहार पार पाडतात हें सर्वांच्या परिचयाचें उदाहरण पुढे करतां येईल; आणि जेथे भाषा पांगळी पडते, तेथे मनुष्याला अभिनयाच्या द्वारां आपलें मनोगत व्यक्त करावें लागतें हें सत्य कुणास ठाऊक नाही? आजच्या युगांतल्या भाषा समृद्ध व संपन्न असूनहि त्यांना नेत्रपल्लवी, करपल्लवी, मुद्राभिनय इत्यादिकांचें साहाय्य मागावें लागतें ही गोष्ट दृष्टिआड करतां येण्यासारखी नाही.

जेथे भाषाच मुळीं अस्तित्वांत नाही, तेथे मनुष्य केवळ दृक्संकेतांनी किंवा हातवाऱ्यांनी आपल्या मनांतला आशय प्रगट करतो. त्या संकेतांच्या द्वारा त्याचा भाव आपल्या लक्षांत येतो. अशा परिस्थितींत भाषा नसतांनाहि आपणांस अर्थ कळतो आणि कधी कधी आनंदहि होतो. तो आनंद केवळ अर्थामुळे होत नसून मुख्यतः संकेतामुळे होतो असें मला म्हणावयाचें आहे. संकेत हा मूळांत असतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थ हा नंतर येतो. तेव्हां संकेत हाच आनंदाचा कंद आहे असें मला सुचवायचें आहे. माझें म्हणणें स्पष्ट करण्यासाठी एक उदाहरण घेतों. एकाद्या चंचल युवतीकडे पाहून एकाद्या फाकड्या रंगेल गड्याने डावा डोळा किंचित् वाकडा केला, शीळ घातली व हातरुमाल फडफडावला तर त्यांतून सूचक असा अर्थ येवढाच निघेल की, कदाचित् तीं उभयतां प्रेमिक व प्रेयसी असावींत किंवा, त्या दोघांनाहि शील नसावें व ते एकमेकांना आमंत्रण देत असावेत. सूचक अर्थ हा निश्चित असेलच असें नाही. परंतु डावा डोळा मोडणें आणि शीळ घालणें हे प्रेम प्रकट करण्याचे दोन निश्चित संकेत आहेत. तें लक्षांत येऊन मनुष्यास आनंद होतो.

अभिनयांतील मूक संकेताबाबत हें तत्त्व जितकें खरें आहे, तितकेंच तें भाषिक संकेताबाबतहि खरें आहे. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी वाक्यामध्यें योजलेल्या शब्दांचे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व व्यंग्यार्थ किंवा ध्वनि असे तीन प्रकार कल्पिले आहेत. उदाहरणार्थ, तो नदीवर राहतो, या वाक्याचा अर्थ 'तो नदीच्या कांठीं राहतो' असा लक्ष्यार्थ घेतां. परंतु वाच्यार्थ व लक्ष्यार्थ यांची प्रतीति झाल्यावर देखील या वाक्यांतील 'नदी' या शब्दापासून जास्त असा व्यंग्यार्थाची प्रतीति होते. हा व्यंग्यार्थ प्रतीतीस आणून देणारी जी शब्दशक्ति तिला 'व्यंजना' म्हणतात, आणि व्यंग्यार्थाच्या अपेक्षेने त्या शब्दाला 'व्यंजक' म्हणतात. 'तो नदीवर राहतो' या वाक्यापासून तेथील वातावरणाचें अस्तित्व प्रतीत होतें. आणि त्यावरून तो यात्रेकरूं-कडून दक्षिणा वसूल करणारा एखादा पंडा असावा, किंवा मच्छीमारी करणारा एखादा कोळी असावा, किंवा कपडे धुणारा एखादा धोबी असावा, किंवा पाणी भरणारा एखादा भिस्ती असावा असे अनेक सूचक अर्थ मनांत उद्भवतात. मी जो 'संकेत' हा शब्द वापरतों, तो या व्यंग्यार्थापलीकडचा आहे. व्यंग्यार्थ निव्वळ सूचक असतो. त्यांत निश्चिति नसते. त्यापासून आनंद होतो हें खरें. परंतु 'संकेता'चा अर्थ हा मूलगामी व निश्चित असतो. आणि त्यापासून विशेष आनंद होतो असें मला म्हणावयाचें आहे.

माझें म्हणणें अधिक स्पष्ट करण्यासाठी मी कविवर्य चंद्रशेखर यांच्या 'काय हो! चमत्कार' या कथाकाव्यांतील पुढील सरसरमणीय आर्या घेतों;—

किन्नर मिथुनासम तीं द्राक्षीच्या रम्य मंडपाखालीं
कांही गुंजन करितां अदृश्य तेथेंच दृष्टिला झालीं।

या कथाकाव्याचें कथानक थोडक्यांत असें आहे;— धनाजी या नांवाचा एक शेतकरी असतो. जिऊ या नांवाची त्याला एकुलती एक सुंदर मुलगी असते. ती वयांत आली, तरी तो तिच्या लग्नाची फारशी काळजी घेत नाही. त्याच्या शेतावर शिवबा घायाळ या नांवाचा एक तरुण कामकरी असतो. त्याचें व जिऊचें मेतकूट जमतें. धनाजीला हें आवडत नाही आणि एक दिवस तर त्या दोघांच्या प्रेमाचा कळसच त्याच्या दृष्टीस पडतो. वरील आर्येंत चंद्रशेखरांनी कलात्मक संयमाने जिऊ व शिवबा घायाळ यांचा एकांत सूचित केला आहे. तीं दोघेहि किन्नराच्या जोडप्याप्रमाणे परस्परांशी बोलतां बोलतां एकदम द्राक्षीच्या आड नाहीशी झालीं, या वर्णनांत व्यंग्यार्थ आहे. त्या दोघांचें तेथे मीलन झाले हें त्यांत चंद्रशेखरांनी सुचविलें आहे. या सूचक अर्थाने आनंद होतो यांत शंका नाही. परंतु वरील आर्येंत ज्या शब्दांची योजना केली आहे, त्या शब्दांमागे जे संकेत आहेत, ते लक्षांत आले, म्हणजे अधिक आनंद होतो असें माझें म्हणणें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'किन्नर' म्हणतांच आपल्या मनांत रंगील्या, रसील्या, स्वैराचारी व आनंदी जीवांचा संकेत उत्पन्न होतो, 'मिथुन' म्हणतांच जिऊ व शिवबा यांनी पुढे केलेल्या 'मैथुना'चा संकेत मनांत उभा राहतो. 'मियुना' बद्दल त्याच अर्थाचा द्योतक 'युगल' हा शब्द तेथे योजला असता, तर अर्धाअधिक मजा खलास झाला असता. उपमेने संकेताचा आनंद द्विगुणित झाला आहे. पुढे 'द्राक्षी'चा उल्लेख आहे. तो मनांत द्राक्षापासून बनवलेल्या मदिरेचा आणि यौवनांतील उन्मादाचा संकेत साकार करतो. 'रम्य' म्हणतांच जिऊ व शिवबा तेथे रमले हें संकेत-चित्र डोळ्यांपुढे उभें राहतें. 'मंडपा'चा निर्देश भावी विवाहसमारंभाचा संकेत प्रदर्शित करतो, 'गुंजन' म्हणतांच भृंग आणि कलिका समोर दिसूं लागतात आणि प्रणयी युगलाच्या गुलगुलु बोलण्याचा संकेत स्मरणांत जागृत होतो, आणि 'अदृश्य' म्हणतांच एकांताचा संकेत मनःश्चक्षूंपुढे ठळकपणें दिसूं लागतो. जिऊ व शिवबा या दोघां प्रणयी जीवांचें तेथे मीलन झालें या सूचक व्यंग्यार्थापेक्षा प्रत्येक शब्दामागे जो संकेत आहे तो कसा अधिक आनंददायक आहे हें आतापर्यंतच्या विवेचना-वरून स्पष्ट झालें असावें असें वाटतें.

माझा मुद्दा ठळक रीतीने ठसावा यासाठी आणखी तीन उदाहरणें घेतों. सामराज या प्राचीन मराठी कवीने आपल्या 'रुक्मिणीहरण' या काव्याच्या पहिल्या संगीत स्वतःचें उतार वय झाल्याचें व्यंग्यार्थाने सूचित केलें आहे. ज्यांत ती सूचना आहे, ते दोन चरण असे;—

आयुःपयाचा अति गोड प्याला
हळूहळू काळबिडाल प्याला

या दोन चरणांतील व्यंग्यार्थ इतकाच कीं, कवि म्हातारा झाला. त्याचा मरणकाळ जवळ आला. परंतु आयुष्यावर दुधाच्या पेल्याचें रूपक करतांच जीवित हें दुधा-प्रमाणेंच पवित्र, निर्मळ व निरोगी आहे; आणि मृत्यूवर बोक्याचें रूपक बसवतांच बोका हा डोळे मिटून चोरपावलाने येतो आणि चोरून मारून दूध पिऊन चाहूल लागूं न देतांच निघून जातो या गोष्टींचे जे संकेत मनांत आकारास येतात त्यांच्या-मुळे अधिक आनंद होतो असें मी म्हणतों.

इंग्रजी वाङ्मयांत बेन्‌जॉन् या नांवाचा शेक्सपिअरचा समकालीन एक कवि होऊन गेला. त्याच्या एका कवितेंतील पुढील चार ओळी पहा. प्रेमिक हा प्रेयसीचा निरोप घेत आहे. त्या दोघांनी एकमेकांना डोळे भरून कितीहि पाहिलें तरी त्याची तृप्ति होत नाही. तेव्हा प्रेयसी देत असलेल्या पेयाचा पेला हातांत घेतांना प्रेमिक म्हणतो;—

Drink to me only with thine eyes
And I will pledge with mine
Or leave a kiss but in the cup
And I will not look for the wine

इथे प्रेमिक प्रेयसीला असें सांगतो कीं तूं मला डोळे भरून पाहतां पाहतां डोळ्यांनी गिळून टाक. तूं मला देत असलेलें पेय सरस आहे किंवा नाही याचा विचार करण्याचें मला कारण नाही. मात्र तूं तें मला उष्टवून दे. येथे

Or leave a kiss but in the cup

 या तिसऱ्या ओळींत प्रेयसीने पेय उष्टें करावें येवढाच व्यंग्यार्थ आहे, आणि तो

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिसऱ्या ओळींतील व्यंजक शब्दांनी सूचित केला आहे. परंतु येथे प्रेयसीचें उष्टें पेय प्रेमिकानें पिणें हें प्रेमाचें लक्षण आहे हा जो सामाजिक संकेत आहे त्यामुळे आनंद होतो. हाच संकेत सर वॉल्टर स्कॉट याच्या 'लॉकिनवार' या कवितेतील

The bride kissed the goblet
the knight took it up,
He quaffed off the wine
and he threw down the cup

या दोन ओळींत आहे.

शेवटचें उदाहरण कै० लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'मी तुझी मावशी तुला न्यावयां आलें' या कवितेतून घेतों. लक्ष्मीबाईंनी ही कविता लिहिली त्यावेळीं मुलींचें लग्न लहानपणींच करून तिच्यावर संसाराची जबाबदारी टाकण्याची चाल आपल्या समाजांत रूढ होती. तिच्यावर हसत खेळत टीका करतांना लक्ष्मीबाई आपल्या ओळखींच्या एका विवाहित मुलीस माहेरीं नेतांना म्हणतात;—

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे !
तूं उभी ! लागले कुठे कुठे तव डोळे !
ही खडखड खडखड करिते गाडी दूर
हें धडधड उडतें इकडे तवही ऊर
तूं प्रसन्न आता क्षणें खिन्न तूं होसी
मेघांत गवसला चंद्रच दुसरा दिसशी !
तूं साधी अल्लड पोर । लाडके !
गुरुजनें कल्पिली थोर । लाडके !
तुज कशास हा संसार । लाडके !
हा दोन दिवस तरि टळो म्हणोनी; झालें—
मन अधीर गेलें माहेरां तव गेलें.

या कवितेंत 'भरली घागर', 'शिरावर' व 'बाले' म्हणतांच एका अल्पवयाच्या मुलीवर संसाराचें ओझें टाकल्याचें सूचित होतें. 'तूं उभी !' यांत तिला कामापायीं सवड सांपडत नाहीं; आणि 'डोळे लागले' यांत ती माहेरीं जाण्यास उत्सुक आहे हे अर्थ सूचित होतात; परंतु 'आगगाडीच्या खडखडाटाच्या' उल्लेखाने व मुलीच्या छातीच्या धडधडण्याच्या उल्लेखाने मनांत जो संकेत उभा राहतो, तो, ती मुलगी आपल्या माहेरीं जाण्यास अधीर झाली आहे या गोष्टीचा. त्याचप्रमाणें 'तूं प्रसन्न आता क्षणें खिन्न तूं' या निर्देशाने आगगाडीने कोणीतरी, वडील किंवा भाऊ, आपणांस माहेरी नेण्यास आलें असावें म्हणून ती आनंदाने टांगा आला कीं काय या कल्पनेने फाटकाकडे नजर टाकते. परंतु टांगा न थांबतांच पुढे निघून जातो त्यामुळे ती निराश होते हा जो संकेत आपल्या मनांत उभा राहतो, तो आगगाडीच्या निर्देशाने. हा संकेत अलिकडल्या यांत्रिक युगांतला आहे. तात्पर्य, संकेत हा व्यंग्यार्थापेक्षा अगोदरचा असून त्याच्यामुळे जो आनंद प्राप्त होतो, तो अधिक असतो.

येथे व्यंग्यार्थ म्हणजेच ध्वनि आणि मला अभिप्रेत असणारा जो संकेत, त्यांच्यांत ठळक अशी सीमारेषा काढून दाखवणें आवश्यक आहे. संकेतामुळेच शब्द अनुप्राणित होतो. संकेत नसेल, तर शब्दाचें अस्तित्वच नष्ट होईल. किंबहुना शब्द आणि संकेत यांचें पार्वतीपरमेश्वराप्रमाणे एकजीविरत्व आहे. विशिष्ट शब्दामागे

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विशिष्ट संकेत असतो. आणि तो अगदी स्पष्ट व निश्चित असतो. उदाहरणार्थ, श्री. बोरकरांच्या कवितेचा हा चरण पहा;—

गडद निळे गडद निळे जलद जलद आले. या चरणांतील 'गडद निळे' व 'जलद' या शब्दांत पावसाळी ढगांचा जो संकेत आहे तो स्पष्ट आहे. 'जलद' याबद्दल 'मेघ' किंवा 'ढग' हा त्याच अर्थाचा शब्द येथे चालणार नाही. पुन्हा संकेत हा परंपरेने किंवा परिचयाने अंतःकरणावर संस्कारित झालेला असतो. 'कालचा गाण्याचा कार्यक्रम म्हणजे कुंभारवाड्यांतील बैठक वाटली' यांतून व्यंग्यार्थ किंवा ध्वनि इतकाच निघेल कीं, ' कालचें गाणें बरें झालें नाही. ' परंतु 'कुंभारवाड्यांतील बैठक' या शब्दप्रयोगाने 'कालच्या कार्यक्रमांतील गवयाचा आवाज हा गाढवाच्या आवाजाप्रमाणे कर्णकर्कश होता व ऐकणारे श्रोतेहि कुंभाराच्या दर्जाचे होते' हा जो संकेत मनांत उत्पन्न होतो, तो जर तो शब्दप्रयोग काढला तर होणार नाही. 'त्या प्राध्यापकांची मेल एकदा कां सुरू झाली म्हणजे मग घंटी वाजेतो थांबण्याचें नांव नको' या वाक्यांतून 'तो प्राध्यापक भरभर बोलतो' येवढाच ध्वनि निघेल. परंतु मेल ज्याप्रमाणे थांबत नाही, त्याप्रमाणे तो न थांबतां भरभर बोलतो' हा जो संकेत मनांत निर्माण होतो, त्यासाठी आगगाडीच्या थांबण्याचा संस्कार मनावर होणें व त्याशीं परिचित असणें आवश्यक आहे.

ध्वनीचा संबंध शब्दाच्या अर्थाशीं आहे. शब्दांत संकेत अनुप्राणित झाल्यावर मग त्याला अर्थ प्राप्त होतो. पण अर्थ हा संकेताप्रमाणें निश्चित नसतो. एकाच अर्थाचे द्योतक असे अनेक शब्द असतात. पण एका शब्दाला एकच संकेत असतो. तो ठाम असतो. ध्वनीचा प्रामुख्याने अर्थाशीं संबंध असल्यामुळे त्या अर्थाचे द्योतक असे शब्द असले कीं त्याचें काम भागतें. परंतु संकेताला विशिष्ट शब्दच लागतो. संकेताचें स्थान अगोदरचें आहे आणि अर्थाचें नंतरचें. ध्वनीनें सूचित होणारा अर्थ हा तात्कालिक असतो. त्यासाठी चिरसंस्कारांची आवश्यकता नाही. तो अर्थ अनपेक्षित असूं शकतो. संकेताप्रमाणे तो अपेक्षित असलाच पाहिजे असें नाही. ध्वनीमुळे फार तर निरनिराळे अर्थ सूचित होऊन क्षणभर चमत्कृति वाटेल. परंतु संकेतामुळे निश्चित अर्थ लक्षांत येऊन आनंद होईल. ध्वनींत आणि वाचकांत सुसंवादित्व असेलच असें नाही. निरनिराळ्या अर्थांनी त्याला चमत्कार वाटला, तरी तो संदेहांत व संभ्रमांत पडेल. संकेतांत आणि वाचकांत नेहमीच सुसंवादित्व आढळेल. येथपर्यंत संकेत व ध्वनि यांतील अंतर जितकें सुस्पष्ट करतां येईल तितकें स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ते आणखी नीट रीतीने ध्यानीं यावें यासाठी कै. गडकरी यांच्या एका वाक्याचें उदाहरण घेतों;—

अर्ध्या डावांतून लक्ष्मी उठून गेली, आणि हातीं कवड्या आल्या.

या वाक्यांत ध्वनि आहे. तो इतकाच कीं, आयुष्यांत भरभराटीचा काळ येत होता, तोंच दारिद्र्य आलें आणि भीक मागण्याचें नशिबीं आलें. परंतु या वाक्यांत 'लक्ष्मी' आणि 'कवड्या' या शब्दांमागें 'श्रीमंती'चे आणि 'दारिद्र्या'चे जे संकेत आहेत, ते, जर ते शब्द काढून टाकले तर नष्ट होतील, आणि आनंद वाटणार नाही. तात्पर्य, साहित्यापासून प्राप्त होणाऱ्या आनंदाचें संकेत हें आदिकारण असून त्यामुळे साहित्याची सरसता, सुंदरता व सुकुमारता वृद्धिंगत होते यांत शंका नाही. प्राचीन संकेत हे आनंददायक असले, तरी कित्येकदां चर्वितचर्वणामुळे ते जीर्ण व शीर्ण वाटतात. तेव्हा आजच्या जीवनांतून साहित्यिकांनी नवे नवे संकेत निर्माण करावे आणि साहित्य समृद्ध व संपन्न करावें.———

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुनिबंध

कल्पनेचं सुख

शांताराम

★

जेव्हा कधी मी प्रवासाला निघतों, प्रवास जवळचा असो की दूरचा असो, बरोबर बरींचशीं पुस्तकं घेतल्याशिवाय मला चैन पडत नाही. शक्य तों कमी सामान प्रवासांत बरोबर घेण्याची रेल्वेची सूचना मी इतर बाबतींत पाळतों, पण माझी ट्रंक किंवा बिछाना जड होईल इतकीं पुस्तकं कोणच्याहि प्रवासांत माझ्या जवळ असतातच. त्यांतला विक्षिप्त भाग असा की माझ्याच्यानं हीं पुस्तकं बहुधा वाचून होत नाहीत. पुस्तकांना बहुधा नुसता प्रवास घडतो; मला मात्र वाचन घडत नाही. तरीहि प्रत्येक नव्या प्रवासाच्या वेळीं पुस्तकांचा गठ्ठा जवळ घेतल्याशिवाय मी बाहेर पडत नाही. ज्यांचं वाचन माझ्याच्यानं होणार नाही हें मला माहित असतं तीं पुस्तकं मी बरोबर घेतों कशाला ? वाचण्याच्या कल्पनेसाठी. चालत्या गाडीच्या खिडकीशीं आपण बसलों आहोंत, बाहेरचा देखावा भराभर बदलत आहे, डब्यांतले लोक आपआपल्या गप्पांत, छंदांत गुंग झाले आहेत आणि आपण वाचत आहोंत; एखाद्या थंड हवेच्या ठिकाणीं किंवा सौंदर्यस्थळीं भटकून भटकून थकल्यावर निवांतपणें वाचतां वाचतां आपला डोळा लागला आहे; एखाद्या परगावांतल्या आप्तेष्टांच्या घरांत त्यांच्याशीं हास्यविनोद केल्यावर आपण थोडा वेळ एकटेच बसून पुस्तकाची संगत करीत आहोंत; या सगळ्या कल्पना मला आवडतात आणि तेवढ्यासाठीच मी पुस्तकांची नेआण स्वतःबरोबर करीत असतों; कल्पनेसाठी.

माझ्या एका मित्रानं एक लहानसा शय्या-दीप (Bed-Lamp) तयार केला आहे. आपल्या पलंगावर मच्छरदाणींत पडल्या पडल्या वाचतां यावं, डोळे जड झाले की कड बदलवून उशाखालचा दिवा विझवतां यावा अशी त्यानं सोय करून घेतली आहे. एकदा मच्छरदाणींत शिरल्यावर दिवा लावायला किंवा मालवायला पलंगाखाली उतरण्याची देखील त्याची इच्छा नाही. अशा ऐषआरामी माणसाकडून वाचन किती होत असेल हें स्पष्टच आहे. पण मला त्याच्या कल्पनेचा अर्थ कळतो आणि कौतुकहि वाटतं. नाही तरी वाचनापेक्षा वाचण्याच्या कल्पनेलाच त्याच्या लेखीं अधिक महत्व आहे.

मी किंवा माझा मित्र यांचंच उदाहरण घ्यायला हवं असं नाही. जी गोष्ट माझ्या बाबतींत किंवा माझ्या मित्राच्या बाबतींत खरी आहे ती कुणालाहि लागूं पडेल—कोणच्याहि बाबतींत लागूं पडेल. एखाद्या विशिष्ट वस्तुस्थितीपेक्षा तिची कल्पनाच अधिक आकर्षक असते. प्रवासाच्या अखेरीपेक्षा आरंभ आणि त्याहिपेक्षा प्रवासाची कल्पनाच अधिक मोहक असते हा अनुभव नेहमीचाच आहे. म्हणूनच आभास, कल्पना, ध्येय, स्वप्न इत्यादींचा आपल्या मनाला मोठा आधार वाटतो. हवेंतील किल्ले, पुष्कळदा वाळूच्या किल्ल्यापेक्षा अधिक टिकतात; कधी कधी हवेंतील किल्ले दगडविटांच्या तटबंदीपेक्षा जास्त मजबूत ठरतात. मन आणि मनोरे या दोन शब्दांचा कांही संबंध नसला तरी मनाच्या मनोऱ्याइतके प्रत्यक्षांतील

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मजले शोभिवंत नसतात; टिकाऊ नसतात; आनंददायी नसतात. म्हणूनच कल्पनेला सुखाच्या राज्यांत अग्रपूजेचा मान मिळतो. या दृष्टीनं रोमिओ–ज्युलिएटच्या कथेतला एक मार्मिक संदर्भ लक्षांत ठेवण्यासारखा आहे. शेक्सपिअरनं आपल्या या नाटकाच्या आरंभीं असं दाखवलं आहे की प्रत्यक्ष प्रेमांत पडण्यापूर्वी रोमिओ प्रेमाच्या कल्पनेच्या प्रेमांत पडला होता. आपल्या त्या कल्पनेला त्यानं रोझॅलिन असं नांव दिलं असलं तरी तें नांव देखील एक स्वप्नच होतं; ती रोझॅलिन देखील कल्पनाच होती. आपण तिच्या प्रेमांत पडलों आहोंत आणि त्या प्रेमाच्या साफल्या-शिवाय समाधान नाही या कल्पनेंत—असमाधानाच्या कल्पनेंत त्याला जें सुख मिळालं तें पुढे कधीच मिळालं नाही. ती कल्पना जसजशी ज्युलिएटच्या रूपांत साकार होत गेली तसतशी त्याची कथा दुःखमय होत गेली.

मी, माझा मित्र, रोमिओ आणि त्याचं प्रेम या गोष्टींचा परस्पर संबंध काय असा प्रश्न उद्भवणं साहजिक आहे. तो स्पष्ट करायला माझ्या आणखी एका मित्राचं उदाहरण मला द्यावं लागेल. प्रत्येक माणसाला कधी कधी येतो तसा मला एकदा संसाराचा वैताग आला आणि त्या झटक्यांत त्याला मी म्हणालों, " तूं सुखी आहेस बाबा. तुझं लग्न झालं नसल्यामुळे तूं मुक्त आहेस. तुझ्यामागे कसली काळजी नाही की खटखट नाही. खावं, प्यावं आणि झोपीं जावं असं तुझं आयुष्य आहे. माझं जर ऐकशील तर लग्नाच्या भानगडींत चुकून पडूं नकोस." मला वाटलं माझा उपदेश माझ्या त्या मित्राला पटेल व तो माझे आभार मानेल. झालं मात्र थेट उलटं. माझा तो मित्र माझ्यावर भयंकर रागावला. कांही दिवस तर त्यानं माझ्याशीं बोलणं टाकून दिलं. "आपण लग्न करून घेतलं आणि मला शहाणपण सांगतो. म्हणे लग्न करूं नकोस. करीन नक्की करीन." त्यानं लग्न केलं आणि मी सुलग्नाच्या अक्षता टाकायला अबोला सोडला. आता कधीकधी तोहि संसाराविषयी त्राग्यानं बोलतो. माझा उपदेश त्याला पूर्वी पटला नाही हें बरोबरच होतं. त्यानं लग्न नाही करायचं तर काय कल्पनेवरच जगायचं ?

मला स्वतःला आभास आवडतात, कल्पना आवडतात, मनांचे मांडे आवडतात. पण कल्पना आणि वस्तुस्थिति यांच्या परस्पर संबंधाविषयी माझीं मतं अव्यवहारी नाहीत. पुष्कळ लोकांचं मत असं दिसतं की कल्पना आणि जड वस्तु यांचा नैसर्गिक विरोध आहे. मला असं वाटत नाही; पटत नाही. पुष्कळांच्या मतें कल्पना म्हणजे दारिद्र्याला आलेला फेस; अभावानं ओढलेलं पांघरुण. माझ्या कल्पना अशा प्रकारच्या नाहीत. हिरव्यागार चमेलीच्या झाडाला फुलांचा बहर यावा तशी संपन्न जीवनाला येणारी आकांक्षांची, इच्छा-स्वप्नांची भरती म्हणजे कल्पना अशी माझी समजूत आहे. सुखांत लोळल्यानंतर त्यांचा त्याग करून साध्या जीवनाची तरफदारी करणाऱ्या टॉलस्टायची भूमिका मला समजूं शकते. आयुष्याचा रस भोगल्यानंतर वानप्रस्थाचा मार्ग सांगणाऱ्या आश्रमव्यवस्थेचं मर्म मला कळूं शकतं. पण कल्पनेच्या सूक्ष्म जगाचं भौतिक भरभराटीच्या जड तत्वाशीं जुळूंच शकत नाही असं जेव्हा सांगण्यांत येतं तेव्हा माझं मन साशंक होतं. अशा विचारांत एक तर फसवणूक तरी आहे किंवा अतिशयोक्ति तरी आहे.

ज्याला कला, वाङ्मय इत्यादि कल्पनेवर आधारलेल्या अंगांचा छंद असेल त्यानं व्यवहाराकडे पाठ फिरवावी असं म्हणतात. पाठ फिरवावी असं म्हणण्याऐवजी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कानाडोळा करावा असं म्हटलं तर माझी हरकत नाही. चांगलं जडजूड जेवण झाल्याशिवाय ज्याचं पोट भरत नाही त्याला तरल कल्पना पचत नाहीत असं म्हणतात. त्यांतला स्वीकारणीय भाग एवढाच की माणसानं इतकं खाऊं नये की त्याला सुस्ती येईल, व्यवहाराच्या इतकं मागे धावूं नये की कल्पनेच्या सौंदर्याला तो मुकेल. पण कल्पनेला बहर यायचा असेल तर तिला सुस्थितीचं अधिष्ठान हवं. शमीच्या पानांचं कल्पना वर्षातून एकदाच सोनं करूं शकते; एरवी तीं पानंहि इतर पालापाचोळ्यासारखींच. कवींनी कल्पना खावी, प्यावी, ल्यावी असा गैरसमज कवि नसणाऱ्यांनी सहेतुक पसरवला आहे आणि दुर्दैवानं पुष्कळ त्या समजुतीला बळी पडत आले आहेत. एखाद्याचं दारिद्र्य, कष्ट इत्यादि पूर्व-जन्मीच्या कर्मांचीं फळ आहेत, तें सगळं त्याच्या कपाळीं लिहिलेलंच असतं हें तत्त्वज्ञान जितकं मतलबी आणि शोषणशील आहे तेवढंच कल्पना आणि दारिद्र्य यांची सांगड घालणं हेतुमूलक आहे असा माझा समज आहे.

अनेक दरिद्री कलावंतांनी कल्पनेचीं सौंदर्यसाम्राज्यं उभीं केलीं आहेत हें मला मान्य आहे; पण त्याचा अर्थ असा नव्हे की सुखाच्या अभावाशिवाय कल्पनेला बहर येतच नाही. उलट राष्ट्रांचा इतिहास पाहिला—मग तो पुरातन ग्रीसचा असो, प्राचीन हिंदुस्थानचा असो की पहिल्या एलिझाबेथच्या इंग्लंडचा असो,—तर असंच दिसून येईल की भौतिक वैभव आणि कल्पनेची संपन्नता दूधसायीसारखीं एकमेकांशीं अगदी एकजीव झालीं होतीं. कल्पनेला ऐहिक ऐश्वर्याचा आधार आणखी एका कारणासाठी हवा असतो. पुष्कळशा कल्पनाजन्य कृतींत जो दुःखाचा भाग असतो, जें किडकेंपण असतं त्याचं कारण समाजांतील दारिद्र्य, कलावंताचं दारिद्र्य, कवींचं दारिद्र्य, तत्त्ववेत्त्याचं दारिद्र्य, शास्त्रज्ञांचं दारिद्र्य. दरिद्री माणसाच्या मनांतहि कल्पनेसारखं कांहीं तरी स्फुरतं—फुरफुरतं—पण त्याला मी कल्पना समजत नाही. कदान्नावर वाढलेल्या मुलांच्या अंगावर, पोटावर सूज येत असते तिला काय बाळसं म्हणायचं ? रोगटपणाची सूज निराळी आणि आरोग्याचा गुटगुटीतपणा निराळा. सुस्थित संपन्न वैयक्तिक—सामाजिक जीवनाची कांति म्हणजे कल्पना अशी माझी समजूत आहे.

कल्पनाप्रिय, कलाप्रिय लोकांचं उदाहरण म्हणून काश्मिरी जनतेचं उदाहरण घेतां येईल. तिथं निसर्गाचं अफाट सौंदर्य पसरलेलं आहे. रूप, रस, गंधाची अगणित कारंजीं तिथं सृष्टीनं उडवलीं आहेत. संध्याकाळीं सूर्यास्ताच्या रंगानं न्हालेलीं तिथलीं बर्फाच्छादित गिरिशिखरं पाहिलीं की मेरूपर्वताची कल्पना कुणालाहि सुचेल. तिथले नगाधिराज पाहिले, उंच उंच देवदार न्याहाळले, जलसमृद्धीचं दर्शन घेतलं, फळाफुलांचा बहर दृष्टीखालून घातला की कविकुलगुरु कालिदास काश्मिरचाच असावा अशी खात्री वाटते. पण या सौंदर्याचा उपयोग न करतां, प्रचंड जलप्रवाहांचा उपयोग न करतां, अगणित धातूंनी समृद्ध असणारे पर्वत न फोडतां केवळ त्यांच्याकडे पाहत बसणाऱ्या काश्मिरी लोकांचं जीवन दरिद्री आहे, खुरटं झालं आहे. काश्मिरी लोकांच्या कलेमध्ये जो तोचतोपणा आहे, जी गतानुगतिकता आहे, जी गिचमिड आहे ती संपन्न काश्मिरांत कधीच राहिली नसती; राहणार नाही. काश्मीरच्या सृष्टींत जें अगण्य धन साठलेलं आहे तें तिथल्या जनतेंत वाटलं गेलं तर तिथली कला आहे त्यापेक्षां अधिक बहरेल, तिचा सहस्र करांनी विकास होईल; तिच्यांत नवनवीनता येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणूनच मी किंवा माझा मित्र कल्पनेच्या सुखासाठी सुस्थितीचा आधार मिळवूं लागला तर मला त्यांत विसंगत अथवा विपरीत कांही दिसत नाही. कल्पनेच्या सुखालाहि जड आधिष्ठान हवें अशी माझी खात्री आहे. म्हणूनच मी जसा भोगवादी आहे तसाच कल्पनावादी आहे; जितका जडवादी आहे तितकाच सूक्ष्मवादी आहे; साहित्याचा काल्पनिक अर्थ मला जितका पटतो तितकीच साहित्याची आर्थिक कल्पनाहि मला समजते. या माझ्या वृत्तींत दुहेरी वीण असली तरी दुटप्पीपणा नाही या विषयी मला निश्चिती वाटते. दुटप्पीपणानं मी फक्त एकदाच वागलों. त्या मित्राला लग्न न करण्याचा सल्ला दिला तेव्हा मी मानभावीपणा केला, दुटप्पीपणा दाखविला आणि माझ्या त्या मित्रानं माझ्याशी कांही दिवस अबोला केला हें ठीकच होतं.

अंधाराला डोळा निघे

★

अंधाराला डोळा निघे
विलक्षण लाल लाल
त्याच्या लाल किरणांत
माझें उजळ कपाळ

अशा लाल लाटेंतून
पाठी ओणव्या धांवती
त्यांना पहाड गिधाडें
खाली वाकूनी वेचती

अंधाराच्या कपारींत
कसेसें कोरडे हांसें
टप्टप गळती खाली
सुंदरींचे देह ठसे

काळे कुळकुळीत तेल
प्यालेले मजबूत वासे
जळतात सावकाश
त्यांत उभे जुने खासे

काळा काळा तळहात
लाल भाग्य रेषा धावे
तिच्या आगींतून सैन्य—
पंक्ती घेई हेलकावे

अंधाराला डोळा निघे
विलक्षण लाल लाल
त्याच्या लाल किरणांत
माझें उजळ कपाळ

—शरच्चंद्र मुक्तिबोध.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कमळा

अरविंद मंगरूळकर

★

रसास्वाद

'फुलांची ओंजळ' या कवितासंग्रहाची जर वैजयंतीशी तुलना केली तर तींतल्या 'कमळा' या कवितेला त्या वैजयंतीमधील कौस्तुभमणीचीच उपमा द्यावी लागेल. प्रस्तुत कवितेमधील खोल भावसघनता (lyricism) आणि ओसंडून राहिलेली अभिजात चारुता (classical grace) इतकी ठसठशीत आहे कीं, या गुणांमुळे ती आख्यानक काव्याच्या (narrative poetry) वर्गांत समाविष्ट करणें एखाद्याला कठीणच वाटावें. विषयासक्त संभाजीने केलेली थोरातांच्या भोळ्या-भाळ्या कमळेची दारुण वंचना आणि त्यामुळें व प्रखर शीलाभिमानाच्या प्रेरणेमुळे कमळेने एका रम्य शरद्रात्रीं शिवनेरीच्या बुरुजावरून करून घेतलेला आपला कडेलोट ही करुण कहाणी या कवितेचा गाभा आहे. प्रस्तुत ऐतिहासिक कथा अगदीच साधी व सरळ आहे. अशा क्रूर वीरांना बळी पडलेल्या अगणित कन्यकांच्या बाबतींत इतिहास हा बेदाद आहे; त्याने त्यांची नुसती नोंदहि केली नाही. परंतु Bee- सारख्या एका सहृदय कवीने ती कथा आपल्या प्रतिभेच्या मुशींत घालतांच तींतून त्याने आपल्या शीलविषयक प्रखर तत्त्वाचें तेजस्वी विश्व उभें केलें; कल्पनेला नाट्यमयतेचे अंकुर फोडले; कालचक्र उलट फिरवून शिवकालापर्यंत हटविलें आणि तो काळ मूर्तिमंत रेखाटला; निसर्गवर्णनांच्या बहुमोल रत्नांची पखरण केली; आणि इतिहासाच्या जीर्ण व घुणा लागलेल्या पानांतून एक रम्योदात्त मराठ-मोळी रमणी "निकषावरच्या सोन्याच्या ठळक रेषेप्रमाणे" साकार केली!

'कमळा' या कवितेचा आरंभ अत्यंत नाट्यमय आहे. दुसऱ्या एखाद्या कवीने संभाजीच्या मृगयेचें आणि त्याने केलेल्या 'कमळेच्याहि मृगयेचें' प्रदीर्घ, तपशीलवार व क्वचित् शृंगारिक वर्णन करून त्या प्रसंगाची रया अगदीच घालवून टाकिली असती. पण Bee कवींनी हा सर्व प्रसंग भूतकालांतल्या घटनेप्रमाणे गृहीत करून, कमळेच्या स्मृतिमंजूषेंतला कल्पून संयमाने व गोड ध्वन्यर्थाने तो flash back च्या पद्धतीने सांगितला आहे. अप्रत्यक्ष निवेदनापेक्षा यांत वाचकाला अधिक जवळीक वाटते, हें स्वाभाविक आहे. कवितेचा आरंभ कसा रम्य आहे, पाहा. शरदृतूचें मंद, गहिरें चांदणें पडलें आहे, "चंद्रकिरण उंचावरून गिरिदरींत घसरून पडतांना त्यांचा चुरा-चुरा होत आहे," अरण्यांतले काळेकभिन्न ताशीव कडे स्तब्ध खडे आहेत, वाराहि खिळल्यासारखा झाला आहे, आणि या गूढभव्य लोकोत्तर दृश्याचें मनःपूत अवलोकन करण्यासाठीं कीं काय चंद्राची कोर

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीलांबरांत चढत आहे! या शारदीय वातावरणांत एका गर्द अपरात्रीं आपल्या कृष्णरात्रीप्रमाणेंच असलेला केशकलाप पाठीवर मोकळा टाकून "लावण्याची किशोरगंगाच असलेली एक चिंताकुल नीलदेह श्यामा" शिवनेरीच्या गवाक्षांत आपल्या आयुष्यांतल्या एका 'घातक मोहक दिवसाची' उदास आठवण काढीत बसली होती!--कवितेचा हा आरंभ स्कॉटच्या एखाद्या मध्ययुगीन कादंबरीसारखाच रम्याद्भुत (romantic) आहे; आणि या पार्श्वभूमीवर कमळेचें Bee कवींनें रेखाटलेलें वर्णन तर जडावाच्या कामाप्रमाणे तरल आणि नेत्रदीपक आहे.

"मुसावला नीलिमा तोच हा नीलदेह रमणी,
निळ्या सारणीमधें वाहतें मोत्याचें पाणी!"

कमळेच्या अंगकांतीचें हें अद्भुत वर्णन आणि भोंवतालच्या अपरात्रीचें भव्य, सुनील वातावरण हें कुशल चित्रकाराने कल्पमाने काढिलेल्या व विविध रंगांचे तकतकीत थर असलेल्या एखाद्या विशाल तैलचित्राप्रमाणेंच भासतें.

शिवनेरीमध्ये कमळा किती दिवस बंदिवासांत होती, कोणास ठाऊक! —आणि तशी ती किती दिवस राहणार होती, तें तरी कोणास ठाऊक! परंतु यावेळीं ती खचित उदास, निराश आणि चिंताकुल झाली होती. शूर संभाजीने केलेली दारुण वंचना तिच्या काळजाचे लचके तोडीत होती; आणि आपल्याला लोक आता केवळ संभाजीची राख म्हणणार, या तीव्र कल्पनेने "पाक" कुळांतल्या त्या कमळेच्या घायाळ हृदयावर मीठशिंपण चालविलें होतें. "पाक, अव्याजसरल, सरसंवसंताशिरोभूषण, तमालदलसन्निभाभिरामा कमळा",—पण आज ती हीनदीन झाली होती! संभाजीविषयींच्या तिच्या भावना संमिश्र स्वरूपाच्या होत्या, कारण संभाजीवर तिचें प्रेम होतें; पण त्याचीं वचनें, त्याचें प्रेम, त्याचे दाखले हीं सर्व मद्याच्या आणि वासनेच्या चपकांत पार बुडून गेलीं, याची तिला चीड आली होती. आणि कमळेचें भ्रष्ट रानपांखरूं शीलाच्या या आंतल्या धगधगत्या ज्योतीला आज बुजून गेलें होतें! रखेलीचें जिणें आणि "चहाड मुख" आज तिच्या भाळीं आलें होतें! "पवित्रतेचें डंफण" मिरविण्याचा आता तिला काय अधिकार! पण या सर्वांत तिला एकच दिलासा—आधार होता कीं देह कलंकित झाला तरी तिचें मन शुद्ध होतें आणि त्यामुळे जगाने कांही म्हटलें तरी तिला आपल्या आईच्या पदराखालीं थारा होतासें वाटलें. म्हणूनच ती तळतळून म्हणते कीं,

"म्हणोन जन, पण म्हणूं नको गे तूं माझे आई!
'कुळबुडवी कारटी कशाला जन्माला येई!'"

पण—पण अशा कलंकित देहाची शुद्ध मनापासून मुक्तता नाहीं तोपर्यंत ती काय करणार होती! आणि देहावांचून असलेल्या तिच्या केवळ निर्दोष मनाची तिच्या आईला ग्वाही तरी कशी पटावी! या भयंकर विचाराचा कडकडून दंश होतांक्षणींच तिचा अखेरचा आधार तुटला! आईहि नाही, म्हणजे कांहीच नाही! आणि मग तीव्र उद्वेगाने

"भावी ललना वदोत नच कीं कमलेने लपुन
चित्तशुद्धिच्या ढालेखालीं वाचविले प्राण!"

असें म्हणून तिने आपली कथा आणि जीविताची परवड एकदमच संपविली! आईच्या पदराचा दुवा पडलेली कमळा शिवनेरीच्या गिरिदरीने आपल्या वत्सल उदरांत घेतली!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Bee कवींच्याच शब्दांनीं वर्णन करावयाचें तर कमळा ही " गुणांच्या स्खलनानें निर्माण झालेली साकार मनुजताच " आहे. संभाजीवर तिचें प्रेम होतें, पण विधिविरहित प्रेम तिला नको होतें. शीलाचा तिला, अग्नीच्या तेजाचा, तसा अभिमान होता. समाजाला तिने एक वेळ झिडकारलें असतें, पण आईची मायापाखर दुरावणार, याने ती हवालदिल झाली ! कमळेच्या शोलाला अशी प्रेमाची लोभसवाणी झालर असल्यामुळे तें रणरणीत उन्हासारखें न वाटतां शीतल शरच्चंद्रिकेप्रमाणें वाटतें. जाज्वल्य शील आणि अनिर्बंध प्रेम यांच्या अतिरिक्त कल्पनांपासून तिचें मन दूर होतें. याचमुळे कमळा ही 'दिव्य' न वाटतां 'मानवी' वाटते. तिजविषयीं आत्मीयता वाटते, कारण ती आपल्यांतली आहे. असें मानवी व्यक्तित्व अनुभवितांना, त्याचीं सुखदुःखें पाहतांना वाचकाचें मन उदासतें, पण विसांवतेंहि.

'कमळा' ही कविता अत्यंत जवळच्या वाटेने अंतिम बिंदूला जाणाऱ्या लघुकथेप्रमाणें आहे; आणि याला साजेशीच Bee कवींची शैलीहि आटीव आणि " लघुसंदेशपदा " आहे. संभाजीची व कमळेची " बेताल " प्रथमभेट व तिची शृंगारभावना त्यांनी किती मोजक्या, सूचक व संयत शब्दांनी व्यक्त केली आहे ! तितक्याच थोड्या शब्दांनी कमळेचा भ्रंश, तीव्र उद्वेग व अनुतापहि सुचविला आहे ! Bee कवींच्या भाषेचा खोचदारपणा, सामर्थ्य, वेचकपणा आणि वातावरण उभें करण्याची शक्ति हे गुण या कवितेंत कळसास पोहोंचले आहेत. बुंधी, अवलख, उत्संखळ, नूर, चहाड, हेळणें, पाक, राख, डंफण इत्यादि शिवकालीन जुने शब्द आणि अंबेची साक्ष, निळी सारणी, रानपांखरूं, रातीं कमळें, नीलिमा मुग्धवर्णी अशासारख्या कलामय व प्रतिमामय शब्दसंहति, तसेंच सूक्ष्म अनुप्रास वातावरणाचा किती परिपोष करितात, तें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. कवीची विशेषण-सौंदर्यदृष्टिहि " तमालदलसन्निभाभिरामा, सरसवसंतशिरोभूषण, चहाड मुख " इत्यादि स्थळीं सुंदरपणें प्रत्ययास येते.

ध्वन्यर्थाचीं जीं कांहीं स्थळें या कवितेंत आहेत त्यांतील कमळेच्या अंताचें स्थळ फार सुंदर व श्रेष्ठ आहे. आत्मनाशाचा कमळेने मनाशीं निश्चय केल्यावर कवीने समग्र वर्णन न करतां केवळ

" क्षणैक हलली शरच्चंद्रिका पुनश्च साहितवन,
क्षिप्र अनंतीं नितांत विश्वप्राण होय लीन. "

एवढेंच म्हटलें आहे. कमळेचो भीषण- रौद्र अखेर पाहतांच क्षणमात्र शरच्चंद्रिका सर्व वनासह जणूं थरारली !—आणि नंतर पुन्हा सर्व शान्त—शान्त झालें! निसर्गाच्या अंगावरहि जणूं क्षणभर रोमांच फुलले ! सारंगीच्या वरच्या तातीवर गज फिरवितांच खालच्या अनेक तरफांचे मधुर संकुल स्वर घुमूं लागावे, त्याप्रमाणे या स्थळीं ध्वन्यर्थाचे अनेक निनाद मनाचा वेध घेतात. व्यक्तापेक्षां अव्यक्त ध्वनि हृदयंगम ठरावे, बोलल्यापेक्षा न बोललेले भाव खोल असावे, हें काव्याचें ऐश्वर्य आहे

[पाहा—Heard melodies are sweet.
But those unheard are sweeter—John Keats]

कमळेची वंचना आणि आत्मघात ही इतिहासांतील एक दुर्दैवी घटना आहे, पण Bee कवींच्या प्रतिभेंत ती विद्युल्लतेची झळाळ झाली आहे ! आणि स्वतः कमळा ही उन्हांत क्षणभर चमकणाऱ्या, म्यानांतून उपसलेल्या कट्यारीच्या धारेप्रमाणें तेजस्वी, प्रखर आणि आकर्षक बनली आहे ! तिच्या दीप्तीने दिपलेलें वाचकाचें मन तिच्या अंताने जसें विषण्ण होतें तसेंच कवीच्या निर्दोष सौंदर्यदृष्टीने हरखून जातें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सावली

वि. स. खांडेकर

★

सावली रागावली आणि देहाला म्हणाली, "किती किती दुष्ट आहेस रे तूं. सकाळ असो वा संध्याकाळ असो, मी सारखी तुझी सोबत करतें. एखाद्या कुत्र्या-प्रमाणें तुझ्या पायांभोवती मी नेहमी घुटमळतें. केव्हा पुढं, केव्हा मागं. रात्रींसुद्धा माझ्या सेवेंत कधी खंड पडत नाही. तुला खोटं वाटत असेल तर ऐन मध्यरात्रीं दिवा लावून पहा.

"मी तुझ्यावर इतकं प्रेम करतें. पण तूं मात्र ? सावली माझ्यावर अवलंबून आहे म्हणून ज्याला त्याला तूं सांगत सुटतोस. शोभतं का रे हें तुला ? तें कांही नाही. तुझं माझं नातं बरोबरीचं आहे, हें तुला मान्य असलं तरच मी तुझ्याबरोबर राहीन. नाहीतर माझा मार्ग मला मोकळा आहे."

देहाने तिला जवळ ओढून घेतलें, प्रेमाने कुरवाळलें आणि तो तिला म्हणाला, "वेडी आहेस तूं छाये ! हें जग कांही मीं निर्माण केलं नाही. ज्यानं मला जन्माला घातलं, त्यानंच तुलाहि जन्म दिला. त्याच्या नियमांचं उल्लंघन या जगांत कोणीहि करूं शकत नाही.

"आठवतं तुला ? एकदा तूं नि मी समुद्र पहायला गेलों होतों. समुद्राच्या लाटा नाचत नाचत पुढे येत होत्या. तुला नि मला वाटलं, त्या अशाच पुढं येतील आणि आपल्याला बुडवून टाकतील. आपण दोघं पळत पळत दूर गेलों. लांबून धडधडत्या छातीनं पाहूं लागलों.

"पण त्या लाटांनी कांही आपला पाठलाग केला नाही. त्या थोड्या पुढं पुढं आल्या आणि मग मुकाट्यानं मागं मागं जाऊं लागल्या. त्यावेळीं माझ्या मनांत कोणती कल्पना आली होती सांगूं ? मला वाटलं, सागर ही एक सुंदर सतार आहे. हें जग निर्माण करणारी शक्ति ही सतार अखंड वाजवीत आहे. नाचत, डोलत, उचंबळत पुढं येणाऱ्या लाटा ही त्या सतारीची एक लयबद्ध गत आहे. सारं जग उंच उंच मधुर स्वरांनी भरून टाकणारी ! नाचत, डोलत, उचंबळत, मागं मागं जाणाऱ्या लाटा ही त्या सतारीची दुसरी लयबद्ध गत आहे. सारं जग मंद मंद मधुर स्वरांनी भरून टाकणारी !"

"तुझं हें काव्य नकोय मला. मला माझा अधिकार हवा आहे. बोल, तुझं माझं नातं बरोबरीचं आहे, हें तुला मान्य आहे की नाही ?"

"नाही."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"कशावरून?"

"सत्याला साक्षीदार लागत नाहीत."

सावली संतापली. "मी स्वतंत्र होणार, मी स्वतंत्र होणार, मी स्वतंत्र होणार!" ती रागारागाने पुटपुटली.

देह उत्तरला, "उद्या दोन वेळां मी तुझी परीक्षा घेईन. मध्यान्हीं--सूर्य अगदी डोक्यावर येईल तेव्हा, आणि मध्यरात्रीं—सारं जग निद्रेच्या कुशींत झोपलेलं असेल तेव्हा. तीन तीन हांका मारीन मी तुला प्रत्येक वेळीं. त्या हाकांना तूं साद दिलीस तर तूं स्वतंत्र आहेस, हें मी कबूल करीन."

दुपार झाली. धरणी तापूं लागली. सूर्य अगदी डोक्यावर आला. उन्हांत उभें राहून देहाने हांक मारली, "छाये, छाये छाये—"

कुणीहि ओ दिली नाही.

मध्यरात्र झाली. सारें जग भ्यालेल्या बालकाप्रमाणें तोंडावर अंधाराचें पांघरूण घेऊन गुडुप झोंपी गेलें होतें. दिवा न लावतां देहाने हांक मारली, "छाये, छाये, छाये—"

कुणीहि ओ दिली नाही.

विजयी देहाने निद्रेची आराधना सुरू केली. पण कांहीं केल्या तिची कृपादृष्टि त्याच्यावर वळेना. त्याला वाटलें, आनंदाने बेहोष झाल्यामुळे आज आपल्याला झोंप येत नसावी. या कुशीवरून त्या कुशीवर तो तळमळत राहिला.

एकदम त्याला एक आवाज ऐकूं आला. अगदी खोल खोल पाताळांतून कुणीतरी बोलत असावें. त्या मधुर पण गंभीर स्वराच्या स्पर्शाने देह पुलकित होऊन गेला.

तो स्वर उद्गारला, "तूं सुद्धा सावली आहेस."

रागाने आणि भीतीने देह थरथरूं लागला. तो आक्रोशत उद्गारला, "नाही नाही, नाही!"

त्या स्वराचें मंद स्मित त्याला ऐकूं आलें.

देह किंचाळला, "मी सावली आहे? कुणाची? कुणाची सावली आहें मी?"

"माझी." तो स्वर हंसत म्हणाला. "उपभोगाच्या प्रत्येक क्षणीं तुला वाटतं, मी सुखी आहें. पण दुसऱ्याच क्षणीं तुझी अतृप्ति जागृत होते. तूं स्वतंत्र असतास तर हा भास तुला झाला नसता. हा मोहाचा अनुभव झाला. मृत्यूच्या क्षणीं तर तूं —"

देहाला तें विचित्र भयंकर बोलणें पुढें ऐकवेना. थरथरत, धडपडत तो उठला. त्यानें दिवा लावला. आता त्याला थोडा धीर आला. तो हसूं लागला.

त्याने मागे वळून पाहिलें. भिंतीवर सावली हसत होती.

ती विजयी स्वराने उद्गारली, "पैज मी जिंकली. मी स्वतंत्र आहे, तुझ्या बरोबरीची आहे."

देहाने मुकाट्याने मान डोलावली.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या वाङ्मयीन जीवनाचा श्रीगणेशा

दोन आठवणी ★ १

मला वाटतें तें इ. स. १८९६ किंवा ९७ साल असेल. त्यावर्षी उमरावतीस श्रीछत्रपति-महाराजांचा सार्वजनिक रीतीने जन्मोत्सव साजरा करण्यांत आला. आमच्या गांवीं अशा प्रकारचा हा पहिलाच उत्सव असल्यामुळे सर्व लोकांनी तो फार उत्साहाने व आनंदाने पार पाडला. गांवांतले शेठ-सावकार, व्यापारी, त्याकाळीं फार वजनदार गणला जाणारा वकील व डॉक्टरवर्ग, हौशी सज्जन, शाळामास्तर, सर्व दर्जांचे विद्यार्थी, मुसलमान व इतर जमाती, व स्त्री समाज—झाडून सर्व एकत्र जमले, व "इंद्रभुवन" थिएटर गच्च भरलें. या उत्सवाकरता डॉक्टर मुंजे व लिमये नागपुराहून मुद्दाम आले होते. भाऊसाहेब दुराणी व शामराव देशपांडे—जे बिचारे आज स्मृतिशेष झाले आहेत—हे त्या उत्सवाचे मुख्य चालक अध्वर्यु होते; व दोघांनीहि मला सांगून ठेवलें होतें, " तुला शिवाजीच्या चरित्रावर बोलावयाचें आहे." त्याप्रमाणे मी तयारींतच होतों. माझे एक मास्तर म्हणाले, "पुष्कळ माणसें पाहिलीं म्हणजे बोलणारा घाबरतो. तूं कोणाकडे पाहूंच नकोस." एक सज्जन हितैषी मला म्हणाले, " सभेंत हातापायांना कापरें भरतें, बोबडी वळते; असें झालें तर पडद्यांत परत ये." काय व कसें होईल या विचारांतच मी पडलों. शेवटीं तो क्षण आला ! शिवाजी महाराजांच्या जन्माचा पोवाडा संपला. अध्यक्ष कै. तात्यासाहेब मुधोळकर होते. त्यांनी, "आता विद्यार्थ्यांतर्फे बाबा खापर्डे बोलतील," असें सांगितलें, आणि मी "स्टेज"वर गेलों. भाषणाला प्रारंभ केला. तोंड सुकलें नाही, कंप सुटला नाही, आपण कांही धाष्ट्र्य करतों आहों असेंहि वाटलें नाही. बोलतांना एक वाक्य अशा अर्थाचें बोललों की, श्रीछत्रपति केवळ दख्खनचे नेते नव्हते; ते सर्व हिंदुस्थानचे उद्धारक होते; व बंगाल व मद्रास यांनी त्यांचे असेच उत्सव करावयाला पाहिजेत. या वाक्याला अध्यक्ष तात्यासाहेबांनी टाळ्या वाजवल्या. सर्व थिएटरभर त्याचें अनुकरण झालें; आणि मला जो उत्साह वाटला त्याचें मला आजहि स्पष्ट स्मरण आहे. कै. ती. दादासाहेब हे तात्यासाहेबांच्या शेजारींच बसले होते. पण त्यांच्याकडे पहाण्याचें मला धैर्य झालें नाही. टाळ्यांचा हा माझा पहिला अनुभव, व हें माझें अगदी पहिलें भाषण.

यापूर्वी मी येथील (उमरावतीच्या) बालवक्तृत्वोत्तेजक सभेंत खोलकुटे मास्तरांनी लिहून दिलेलें एक भाषण पाठ करून बोललों होतों. तेव्हा टाळ्या, आणि माझ्या विषयांत मला पहिलें बक्षीसहि मिळालें होतें. पण त्याचें मला वर सांगितलेल्या प्रसंगाइतकें महत्व वाटलें नाही. टाळ्या सर्वच मुलांना वाजवीत, आणि पहिलीं बक्षिसें इतर विषयांत दुसऱ्यांनाहि मिळालींच होतीं.

 लोकमान्यांच्या आज्ञेवरून मी व माझे बंधु कविभूषण बळवंतराव खापर्डे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्यांनी १९१९ इ० सालीं 'उदय' वर्तमानपत्र सुरू केलें. पहिला संपादक मचि होतों. पहिल्या अंकाकरितां इतर सर्व मजकुराची जुळवाजुळव केली. कोणता मजकूर कोठे छापावयाचा हें ठरवलें. आता प्रश्न उरला काय तो अग्रलेखाचा ! काय लिहावें ? मोठा प्रश्न पडला. परीक्षेचे पेपर लिहिण्याचा अनुभव होता. पण वर्तमान पत्र ! एक सबंध दिवस करून विचार केला. पण, 'काय लिहावें!' या प्रश्नापलीकडे अग्रलेख सरकेना. वर्तमानपत्र-तोहि पहिलाच अंक—प्रसिद्ध व्हावयाचा, आणि लेख नाही ! शेवटीं वैतागलों. सुखाचा जीव उगाच दुःखांत घालून घेतला असें वाटलें, व काय होईल तें होवो, येईल तें व सुचेल तसें खरडावयाचें, असा निश्चय करून, खोलीचीं दारें बंद करून घेतलीं, आणि लिहावयाला बसलों. येईल तें व सुचेल तसें खरडावयाचें हा निर्धार कायमच होता. पण चिंता वाटे. कारण पहिलाच अंक; जो तो कौतुकाने वाचणार. 'इंप्रेशन्' झालें पाहिजे ना ! कागदावर लेखणी ठेवली, देवाचें नांव घेतलें आणि जणूं कांही आपण लेख लिहित नसून व्याख्यानच देत आहों अशी कल्पना केली. मागचा पुढचा विचार न करतां मनांत येईल ते, सुचेल त्या क्रमाने, आठवतील त्या शब्दांत लिहित सुटलों. बोटें दुखूं लागलीं, विचार संपेनात, आणि लिहिणें थांबेना. बरें, 'मजकूर' हि थोडा नको होता. पहिलाच लेख निदान तीन कॉलम तरी झाला पाहिजे, असें पूर्वीच ठरलें होतें. पण कॉलम्‌मध्ये किती मजकूर बसेल, हें कोठे ठाऊक होतें ! लिही लिही लिहिलें, कागद संपले, पेन्सिल झिजली. मनातलें सर्व लिहून संपेना; व मजकूर पुरेसा झाला कीं नाही अजमास लागेना. अखेर येथेच कोठेतरी लेख थांबवावा व बामणगांवकरांना दाखवावा, असें मनाशीं ठरवलें. घड्याळ पाहिलें, तो आपण तीन तास लिहीत आहों असें आढळलें. कागदाच्या पुरचुंड्या घेऊन खोलीबाहेर पडलों. आताचे 'श्री', तेव्हाचे 'मिस्टर' नारायणराव बामणगांवकर शोधून काढले. त्यांना लेखनाचा अनुभव होता. त्यांना मी लिहिलेले कागद दाखवले, आणि विचारले, "आता हा मजकूर किती कॉलम झाला?" त्यांनी कागद खालवर करून तपासले. थोडा विचारमग्न चेहरा केला व म्हणाले "एक कॉलम". माझ्या उरांत धस्स झालें. एका कॉलमला तीन तास, तर तीन कॉलमला किती ? हें त्रैराशिक सोडवणें कठीण नव्हतें. मी अक्षरशः हताश झालों. आपण भलत्या पिचकारींत सापडलों असें वाटलें.

कंपॉझिटरला बोलावलें; त्याच्याजवळ कागद दिले, व त्याला म्हटलें, "एवढा मजकूर 'कंपोज्' करा; तोपर्यंत आधिक लिहून देतों." त्याने ते कागद पाहिले व म्हणाला, "एवढा मजकूर पुरेल." मीं विचारलें, "हा मजकूर किती कॉलम भरेल ?" तो म्हणाला, "अजमासें सहा." मला हायसें झालें. आता उलट प्रश्न आला. काय वगळावयाचें ह्याचा ! पण मला अगदी सोपें उत्तर सुचलें. मी त्या कंपॉझिटरला सांगितलें, "प्रारंभापासून तीन कॉलम जुळवा. वर्तमानपत्राला मजकूर पुरेसा झाला म्हणजे उरेल तो वगळा" !!

ठरल्याप्रमाणे नेमलेल्या तारखेस "उदय"चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. पुष्कळ वर्तमानपत्रांना "भेट" म्हणून तो पाठवला तसा "केसरी"लाहि पाठवला. त्यावर "केसरी"चा अभिप्राय फार अनुकूल आला; व अग्रलेख "बाणेदार" आहे, असा त्यांत शेरा होता. आपल्याला लिहितां येतें, एवढेंच नव्हे तर "बाणेदार" लिहितां येतें, हें ते दिवशीं मला कळलें.

बाळकृष्ण गणेश ऊर्फ बाबासाहेब खापर्डे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

★

मी इ. स. १९०९ सालीं लिहूं लागलों. लहानपणापासून काव्य व तत्त्वज्ञान ह्यांविषयीं मला अत्यंत आवड होती. व आपणाहि कविता करावी अशी अत्यंत प्रबल इच्छा माझ्या अंतःकरणांत अनेक दिवस—नव्हे कांहीं वर्षें—घोळत होती. माझा एक त्यावेळचा लहानपणाचा स्नेही अति कर्णमधुर पण बहुधा अर्थ-विहीन अशी कविता करी, आणि त्याच्या कविता ऐकून तर आपल्याला कविता करतां येत नाहींत म्हणून मला अतिशय वाईट वाटे. पुष्कळ वेळां अशा मनोवृत्तींत असतांना मी देवाला व दैवाला रागानें व निराशेनें दोष देत असे. पण जसजशा त्या स्नेह्याच्या अधिकाधिक कविता ऐकण्यांत आल्या, जसजसे उत्कट निराशेचे आणि मनोभंगाचे प्रसंग अनेक येऊन गेले तसतशी अर्थात कविता लिहिण्याची उत्कंठा अधिकाधिक तीव्र आणि दुस्सह आणि अर्थात अधिकाधिक दुःखदायकहि होत गेली. अखेरीस सारखें वजन वर राहिल्यानें मोठमोठ्या इमारती देखील शेवटीं ढासळतात, तसें कांहीं होऊन छंदोबद्ध वाणीचें प्रतिबंधक असें माझ्या मनांतलें अगर मेंदूतलें कांहीं तुटून पडलें म्हणा. अगर फार यत्न करतां करतां खिळखिळें होऊन एखादें उत्तमपैकी कुलूप देखील उघडून जातें. तसें कांहीं माझ्यांत कांहीं झालें म्हणा, काय असेल तें मला सांगतां येत नाहीं; पण एके दिवशीं एलिचपूर मुक्कामीं ता. ७–७–१९०९ रोजीं सकाळीं विचारांत गढून गेलों असतां उत्कंठेचा भार असह्य होऊनच की काय एकदम एखादें कपाट उघडावें तसें माझ्या मनांत एक कपाट उघडलें आणि आपण कविता करावीच—आपण करणारच—आपल्याला कविता करतां येणारच—किंबहुना आलीच—आपल्याला कविता सुचूं लागली—आतां लिहिली मात्र पाहिजे अशी कांहीं तरी एक भावना उत्पन्न होऊन मी शाळेच्या अभ्यासापैकीच एक वही घेतली व लागलीच काव्याची आज सुरुवात म्हणून त्यावर परमेश्वर स्मरणपर व परमेश्वराचा धावा केल्यासारखी बारा पंधरा ओळींची एक गद्य प्रस्तावना लिहिली. तेच दिवशीं संध्याकाळीं "काव्यारंभीं नमन" म्हणून पांच सहा श्लोकांची नांवाप्रमाणें कविता करूं लागण्यापूर्वी आरंभीं प्रभुवंदन म्हणून एक कविता सुरू करून मला वाटतें दुसरेच दिवशीं मी पुरी केली. "अभिनव काव्यमाले"च्या तिसऱ्या भागांत श्री. रा. रा. नरसोपंत केळकर यांनी मजविषयीं लिहितांना म्हटल्या-प्रमाणें ही माझी अगदी पहिली कविता होय आणि ह्या कवितेनंतर दुसरे तिसरेच दिवशीं सुरू केलेलें माझें दुसरें कवन म्हणजे प्रस्तुतचें काव्य होय. प्रभुचरणांचें वंदन ही वेगळी कविता न मानतां तें केवळ पहिलें मंगल मानल्यास ही माझी पहिलीच कविता होय. असो. मला कांहीं त्या दिवशीं काव्याची अलौकिक स्फूर्ति आली किंवा अमुक दिवशीं अशा अशा रीतीनें माझी प्रतिभा "जागृत झाली" किंवा मला असा हा लोकोत्तर चमत्कार घडून मी एकदम असामान्य, जगांत विरळाच आढळून येणारा अजब महाकवि बनलों असें भासविण्याचा प्रस्तुत काव्याच्या प्रारंभाचा इतिहास इतका बारकाईनें लिहिण्यांत माझा हेतु नाहीं किंवा मला काव्याची स्फूर्ति आली, किंवा माझी प्रतिभा जागृत झालेली आहे किंवा मी महाकवि आहे असें मी म्हणतहि नाहीं. पण या दिवशींच्या त्या क्षणापासून माझ्या कविता कशाहि असोत माझ्या मनाची तरी एक मोठी उत्कट इच्छा, एक मोठी आस पुरली आहे आणि पुरत आहे आणि म्हणून तो दिवस व तो क्षण मला

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रिय आहे आणि असें आहे म्हणूनच हें काव्य कांही अलौकिक स्फूर्तीने निर्माण झालें आहे असें दाखविण्याकरिता नव्हे तर केवळ मला स्वतःला तो क्षण प्रिय आहे आणि मंगल वाटतो म्हणूनच केवळ माझ्या काव्यप्रयत्नाच्या ह्या अगदी पहिल्याच प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत येथे मी त्याच प्रेमाने व आनंदाने निर्देश करून ठेवला आहे.*

—कविभूषण बळवंत गणेश ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे.

नुसती गंमत

★

संस्थानें भारतांत विलीन होण्यापूर्वीची गोष्ट. एका संस्थानांत एक अंमलदार होते. त्यांचा हुद्दा होता गुरांच्या कोंडवाड्याचे इन्स्पेक्टर. पगार अवघा ३५ रुपये. परंतु काम करण्यास उत्साह यावा म्हणून राजेसाहेबांनी अशी योजना केली की, जितकीं गुरें पकडण्यांत येतील त्यांच्या चराईच्या खर्चाच्या प्रमाणांत या अधिकाऱ्यांना भत्ता मिळावा.

विलीनीकरणानंतर सरकारी अंमलदार तपासणीसाठी तेथे गेले. रजिस्टर तपासून पाहतां—१ मोटर ट्रक चालान केलेली दिसली. तीन दिवसांचा १०० घोड्यांच्या चराईचा खर्च दंड म्हणून वसुली अशी नोंद त्यांना सांपडली. गुरांच्या कोंडवाड्यांत मोटर आली कशी व त्यानिमित्त १०० घोड्यांचा खर्च कसा वसूल केला हें त्या अधिकाऱ्याला कळेना. त्याचा तपशील विचारतां इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले—

"ही ट्रक कोंडवाड्यासमोर बंद पडली. रहदारीला अडथळा म्हणून चालान केली व तीन दिवस बंद होती म्हणून ३० हॉर्स पॉवरच्या इंजिनाच्या हिशेबाने तीन दिवसाचे साधारणपणें १०० हॉर्स पॉवरचा म्हणजे १०० घोडे चरतील असा खर्च काढला व तो जमा केला आहे. माझा भत्ता मला मिळाला पाहिजे साहेब—".

★

नागपूरला एकदा संशोधकांची कसली तरी परिषद भरली होती. तींत द. वा. पोतदार वगैरे विद्वान मंडळी होती. खासगी भाषणांत 'बाप' या शब्दाबद्दल चर्चा चालली होती. एकाने—अंबाम् पालयति सः अंबापः व त्याचा पुढे बाप असा अपभ्रंश झाला असावा असें सुचविलें. इतक्यांत श्री. पोतदार म्हणाले,

"मग तात या शब्दाची व्युत्पत्ति सांगा." आमच्या नागपूरचे एक साहित्यिक तात्बडतोब उद्गारले,

"ताम् तनोति सः — " (म्हणजे आईला ताणतो तो—असा अभिप्रेत अर्थ).

---

*"काव्यकान्तार" या काव्याच्या इ. १९१८ सालीं पूर्वखंड म्हणून प्रकाशित झालेल्या पहिल्या पांच प्रकरणांच्या प्रस्तावनेंतील उतारा.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारतरंग ★ ४ ★ चिकित्सक

★

परवा मी मामा वरेरकरांचें ' माझा नाटकी संसार ' हें पुस्तक वाचीत होतों. त्यांत मामांनी आपल्या 'कुंजविहारी' या पहिल्या नाटकासंबंधीचे अनेक अनुभव नोंदलेले आहेत. त्यांपैकीचा एक अनुभव मला विशेष चिन्त्य वाटला. गुरूच्या म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या दर्शनार्थ मामा वरेरकर एकदा मुद्दाम खामगांव मुक्कामीं गेले. श्रीपाद कृष्णांच्या घरीं जाण्याच्या वेळीं मामांनी आपल्याबरोबर स्वदेशहितचिंतक मंडळींतले कृष्णराव गोरे यांना घेतले होते. गुरूचें तें पहिलेंच दर्शन होतें. गुरूला पाहतांच मामांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें. गुरूचीं नाटकें आपल्याला कां आवडतात, यासंबंधी मामांनी आपलीं कारणें, एकाग्र चुरचुरीत विद्यार्थ्याप्रमाणे, भराभर सांगून टाकलीं. त्यानंतर साहजिकच आपलें नाटक गुरूंना ऐकवावें अशी त्यांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. मामांनी आपल्याबरोबर आपल्या नाटकाची चोपडी आणलेली नव्हती; त्यामुळे त्यांनी आपल्या नाटकाचा तपशीलवार गोषवारा गुरूंना सांगितला. यावेळीं गुरूंची मुद्रा नेहमीप्रमाणे गंभीरच राहिली. नंतर कृष्णरावांनी नाटकांतलीं पदें म्हणून दाखविलीं आणि, मामा वरेरकर सांगतात, "तीं पदं ऐकल्यावर मात्र त्यांचा चेहरा एकदम खुलला. अंतरीची वृत्ति लपवून ठेवण्याचा संयम त्यांना त्यावेळीं राखतां आला नाही. त्यांनी मुक्तकंठाने पदांची तारीफ केली···कांही कांही पदं त्यांनी पुन्हा पुन्हा म्हणवून घेतलीं आणि लगेच तीं त्यांनी स्वतः म्हणून दाखविलीं त्यावेळीं मी थक्क झालों···त्या बैठकींत तरी मला असं वाटलं की नाटकाच्या इतर रचनेपेक्षा नाटकांतल्या पद्यरचनेबद्दल आणि संगीताबद्दलच त्यांचा कटाक्ष जास्त तीव्रतेचा असावा···माझी नाटकाची चोपडी वाचण्याबद्दल त्यांनी फारशी उत्सुकता दाखविली नाही."

प्रसंग लहानसाच पण अर्थपूर्ण आहे. नाटकांत महत्त्व कशाचें—कथानकाचें ?—व्यक्तिदर्शनाचें ? की पदांच्या चालींचें ?—या प्रश्नासंबंधीची श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची भूमिका या प्रसंगांत प्रकट झालेली आहे. श्रीपाद कृष्णांनी आपल्या शिष्याच्या पहिल्याच नाटकाचें संविधानक जाणून घेण्याविषयी वा त्यासंबंधी कांही विधायक सूचना करण्याविषयी फारशी आस्था दाखविली नाही. शिष्याच्या नाटकांतील पदांच्या आकर्षक चाली ऐकल्यानंतर मात्र त्यांची कळी खुलली आणि त्या चाली कोठून आणल्या यासंबंधी त्यांनी अत्यंत उत्कंठेने चौकशी केली. नाटकांतील नाट्यवस्तूसंबंधी उदासीनता आणि त्यांतील पदांसंबंधी—नव्हे, त्या पदांच्या चालीसंबंधी मात्र विलक्षण आत्मीयता, ही श्रीपाद कृष्णांची संगीतपक्षपाती आणि नाट्यदुष्ट भूमिका मराठी रंगभूमीच्या विकासाला बाधक ठरली. आधी एखादी

 चित्तवेधक चाल शोधून आणायची आणि मग तिच्यांत पदांतील अपेक्षित अर्थ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कसाबसा कोंबायचा–असा नाटकांतील पदरचनेसंबंधीचा अजब खाक्या श्रीपाद कृष्णांच्या वेळेपासून सुरू झाला. पदें नाट्यवस्तूशीं एकजीव झाली पाहिजेत. त्यांनी संविधानकाशी संगति आणि संदर्भ सांभाळला पाहिजे. ही पदरचनेसंबंधीची सयुक्तिक आणि समर्पक वृत्ति श्रीपाद कृष्णांच्या वेळेपासूनच नष्ट होत चालली. कथानक नव्हे, व्यक्तिदर्शन नव्हे, पदेंहि नव्हेत, तर पदांच्या चाली हें नाटकांचें, नाटकांच्या हमखास यशस्वितेचें सर्वस्व होऊन बसलें. नाट्यतंत्राची उपेक्षा करून, संगीताला डोक्यावर घेण्याची ही श्रीपाद कृष्णांची वृत्ति याचाविषयींच्या देवलांच्या वृत्तीशीं ताडून पाहिली म्हणजे देवलांची नाट्यदृष्टि कशी शाबूत होती हें पटकन ध्यानांत येतें. देवलांच्या 'संशयकल्लोळ' या नाटकासंबंधींची ती गोष्ट आहे 'संशयकल्लोळ' नाटकांत कांही गायकी चालीचीं पदें घातलीं तर तें गायक पात्रांकरिता सोयीचें होईल, असें जेव्हा देवलांना सुचविण्यांत आलें तेव्हा त्यांनी स्वच्छच सांगितलें की, "पदांकडे लोक माझीं पदें म्हणून पाहणार आहेत. वाटेल त्या अवघड चालीवर मला पद करतां येणार नाही असें नाही. परंतु ऱ्हस्वदीर्घांच्या ओढाताणीसाठी क्लिष्ट शब्द घालून पदाचा सांगाडा कसा तरी मी करणार नाही." पदांतील नाट्यानुकूल अर्थाचें सौंदर्य आणि स्वारस्य चालीच्या नादीं लागून बिघडूं न देण्याबद्दलची ही देवलांची दक्षता निस्संशय त्यांच्या अभिजात नाट्यनिष्ठेला शोभून दिसण्यासारखी आहे. दुर्दैवाने देवलांना कोल्हटकरांप्रमाणे शिष्यपरिवार मिळूं शकला नाही आणि त्यामुळे त्यांच्या निरोगी नाट्यदृष्टीच्या विकासाला मराठी रंगभूमीवर वाव मिळाला नाही.

★ ५ ★

कवीचें जीवन आणि कवीचें काव्य यांत अन्योन्यसंबंध असतो असें म्हणतात; असावा, अशी सारेजण अपेक्षाहि बाळगतात. अर्थात् ही अपेक्षा पूर्ण न करणारा एखादा दुसरा कवि आज सापडणें शक्य आहे. आपल्या कवितेच्या पदापदांतून आणि मात्रेमात्रेंतून मानवतेचा मंत्र जपणारा आजचा एखादा कवि मानवामानवांत, मित्रामित्रांत, जाणूनबुजून, भेद करतांना आढळण्यासारखा आहे. मिळालेल्या स्वातंत्र्याचा आधल्या क्षणाला अधिक्षेप करणारा कवि लागलीच दुसऱ्या क्षणाला, स्वातंत्र्याच्या स्तुतीने सळसळलेली कविता लिहूं शकतो, या चमत्काराचा साक्षात्कार आजच्या काळीं होण्यासारखा आहे. पण असले कवी कवीच नव्हेत. त्यांची गोष्ट आपण सोडून देऊं. आपल्या भल्याबुऱ्या व्यक्तित्वाशीं इमानदार राहणाऱ्या कवींसंबंधीच लिहूं. केशवसुत हा असाच एक इमानदार कवि होता. म्हणूनच तर त्यांच्या व्यक्तित्वाच्या विविध पैलूंचा त्यांच्या काव्यावर स्पष्ट ठसा उमटला. त्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांचा त्यांच्या कवितांच्या स्वरूपावर आणि आशयावर पुष्कळच परिणाम झाला. केशवसुतांच्या लहानपणच्या एकलकोंड्या आणि एककल्ली वृत्तीचें वर्णन करतांना त्यांचे बंधु श्री. सी. कं. दामले सांगतात, "कोठे तरी एकटेच बसावे; एकटेच फिरावे, असा थोडा एककल्ली, मुग्ध, एकलकोंडा आणि वरवर पाहणारांस तरी मुखदुर्बळ भासणारा स्वभाव बाळपणापासूनच त्यांच्या अंगीं दृग्गोचर होऊं लागला होता." त्यांच्या दुर्मुखलेपणाबद्दल त्यांच्या शिक्षकाने त्यांना हटकलें होतें. त्यांना आपल्या 'किरकिऱ्या' स्वभावाची जाणीव होती. पुस्तकी विद्येतील प्राविण्या-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

–वरून बुद्धिमत्ता मोजणें योग्य असेल तर केशवसुतांची बुद्धिमत्ता अगदीच सामान्य दर्जाची होती असें दिसतें; कारण ते मॅट्रिकची परीक्षा तिसऱ्या खेपेला वयाच्या २४ व्या वर्षी उत्तीर्ण होऊं शकले! खडतर जीवनयात्रेमुळे त्यांची मूळची उदासीन वृत्ति अधिकच तीव्र बनली. उभ्या जन्मांत त्यांना ३०—३५ रुपयांपेक्षा जास्त पगार मिळाला नाही. पत्नीच्या कुरूपतेनेहि त्यांच्या उदासीनतेंत भर टाकलेली असणें शक्य आहे. खेळकरपणा आणि दिलदारपणा केशवसुतांना मुळी माहितच नव्हता. ते सदान्‌कदा आपल्याच दुःखांत चूर असत. एकदा त्यांच्या सर्व नातेवाईकांनी मिळून फोटो काढण्याचें ठरविलें. त्यांत सामील होण्याची केशवसुतांनाहि विनंती करण्यांत आली. 'काय करायचें आम्हाला फोटो काढून!' असें म्हणून त्यांनी ती विनंती धिटकारून लावली. आपली वैयक्तिक उदासीनता क्षणभर बाजूला सारून, आपल्या प्रेमळ नातेवाईकांच्या आनंदांत सहभागी होण्याइतका मनाचा दिलदारपणा आणि खेळकरपणा ते दाखवूं शकले नाहीत. केशवसुतांच्या व्यक्तित्वाचे हे आणि यासारखेच इतर अनेक विशेष लक्षांत घेऊन त्यांचें काव्य वाचलें पाहिजे. तें तसें वाचलें म्हणजेच त्यांच्या काव्यांतील गुणावगुणांची यथार्थ मीमांसा करणें शक्य होईल. केशवसुतांच्या वेळेपासूनची मराठी कविता ही लोकविन्मुख होत गेली; आणि केशवसुतांनाच आधुनिक मराठी कवितेचा जनक होण्याचें श्रेय देण्यांत आलें. लोकविन्मुख मराठी कवितेच्या आद्यप्रेरकत्वाचा मान केशवसुतांसारख्या एकलकोंड्या कवीस मिळावा हें एका दृष्टीने योग्यच झालें. 'तुतारी' ही केशवसुतांची एक उत्कृष्ट कविता समजली जाते. केशवसुतांच्या संतापी आणि एकलकोंडी स्वभावाचें या कवितेंत उदात्तीकरण झालें आहे असें समजून जर ही कविता वाचली तर तिचें यथार्थ मूल्यमापन होण्यास अधिक मदत मिळूं शकेल. मला म्हणायचें हें की केशवसुतांचें जीवन, त्यांचा स्वभाव—या गोष्टी लक्षांत घेऊन त्यांच्या कवितांचें कांहीसें निष्ठुर परीक्षण व्हावयास पाहिजे. तारतम्य सोडून त्यांचा आणि त्यांच्या कवित्वाचा नसता गौरव करण्यांत कांही मतलब नाही. दुर्दैवाने आज आपल्या मराठींत केशवसुतांचे असे अनेक अंधभक्त आहेत की ते केशवसुतांचें न्याय्य महत्त्वमापन घडवून आणणें अशक्य करून सोडीत आहेत. याचें एक लहानसें उदाहरण येथे देण्यासारखें आहे. संस्कृत आणि गणित हे विषय कच्चे असल्यामुळेच केशवसुतांना दोनतीन वेळा मॅट्रिकच्या परीक्षेंत यश आलें नाही, अशी त्यांच्या बंधूंची स्पष्ट साक्ष आहे, आणि "५ कवी"चे संपादक आणि केशवसुतांचे एक भक्त श्री. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी मात्र 'संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास गाढ असावा' असा केशवसुतांच्या संस्कृताध्ययनासंबंधी एक नवा आणि अपूर्व शोध लावला आहे! तेव्हा तात्पर्य काय की केशवसुतांवर त्यांच्या भगतगणांनी जें मोठेपण लादलेलें आहे तें नीट न्याहाळून त्यांतील सत्यांश तेवढा ग्रहण करण्यास आपण शिकलें पाहिजे.

काय असेल तें असो, केशवसुतांचें नांव घेतलें की मला लगलीच विदर्भातील कविश्रेष्ठ अनिल यांचें हटकून स्मरण होतें. केशवसुतांनी वीस वर्षांच्या दीर्घ कालावधींत फक्त १३२ कविता लिहिल्या. याचा अर्थ असा की त्यांच्या कविता-लेखनाचा वेग बराच मंद होता. अनिलांच्या काव्यलेखनाच्या बाबतींत सुद्धा आपणांस असाच कांहीसा प्रकार दिसून येतो. एका संपूर्ण वर्षातून त्यांची एखाद दुसरीच

 कविता आपण नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली पाहतों. तीहि, आजच्या सर्वसाधारण

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितेप्रमाणे असते बोटभरच, पण तिच्यांतील विशाल अर्थगांभीर्य वाचकाला स्तिमित करून सोडणारें असतें. माझ्या एका साहित्यिक मित्राला तर केशवसुत आणि अनिल यांच्या जोडीला ज्ञानेश्वरांचा अवश्य उल्लेख करावासा वाटतो. कारण तो म्हणतो. "मराठी भाषेंत नांव घेण्यासारखे बंडखोर वृत्तीचे तीनच कवि होऊन गेले. एक ज्ञानेश्वर, दुसरे केशवसुत आणि तिसरे अनिल. 'त्री'नी बव्या बंडवाल्यांत पहिला म्हणून ज्ञानेश्वरांचा गौरव केलेला आहेच. केशवसुतांची काव्यप्रांतांतील बंड-खोरी किंवा अधिक प्रतिष्ठित शब्द वापरावयाचा म्हणजे केशवसुतांचें काव्यक्षेत्रांतील क्रांतिकारकत्व हें पोरासोरांना सुद्धा आता परिचित झालेलें आहे. कारण शाळाकॉलेजच्या, विशेषतः कॉलेजच्या मराठी वाङ्मयाच्या प्रश्नपत्रिकेंतून यासंबंधीचा प्रश्न ही एक नित्याची बाब होऊन बसली आहे. अनिलांनी तर 'बंड' या नांवाची प्रत्यक्ष कविताच लिहिलेली आहे!" केशवसुत आणि अनिल यांना केवळ बंडखोरीच्या साम्याच्या आधारावर ज्ञानेश्वरांच्या पंक्तीला नेऊन बसविण्याची माझ्या साहित्यिक मित्राची ही विचारसरणी इतर अनेक रसिकांना मान्य होणार नाही, हें खरें; पण तसें करण्यांत केशवसुत आणि अनिल यांच्या काव्यांचें माहात्म्य पटवून देण्याचा जो त्याचा सद्धेतु प्रकट झाला आहे त्याकडे लक्ष देऊन त्यांतील अतिरेकाकडे आणि अविवेकाकडे कांहीशा उदार आणि खेळकर वृत्तीनेंच आपण पाहिलेलें बरें!

जीवन लहरी

★

–१–

गातों मी अभिमानें
माझीं सगळीं गाणीं
गातांना आज इथे
डोळे येती भरुनी
मैफलींत गोंधळुनी
क्षणभर मी थांबतसे
देवा रे, तुझ्याविना
रंग इथे भरत नसे!

–२–

सुंदर हें विश्व इथे
देवाचें काव्य गमे
ऐकण्यांत काव्य असे
माझें मन नित्य रमे
काव्य असें ऐकुनिया
वाटे मजला जगतीं
देवाचें महाकाव्य
अमुची कविता नुसती!

—योगेश्वर अभ्यंकर.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकऱ्यांच्या दोन गूढ कविता

श्री. मा. कुलकर्णी

★

गडकऱ्यांच्या गूढगुंजनात्मक कवितांत दोनच कविता मी प्रमुख मानतों. खऱ्या अर्थानें ज्यांना 'गूढ' म्हणतां येईल अशा याच कविता आहेत. कारण दुर्बोध असला तरी त्यांना अर्थ आहे व तो कांहीशा सुसंगत रीतीनें प्रयत्नांतीं कां होईना लावतां येण्यासारखा आहे.

फुटकी तपेली

गोविंदाग्रजांच्या गूढगुंजनात्मक कवितांपैकी ही एक आहे. दुर्बोध प्रतीकांची योजना केल्यामुळे तसेंच चमत्कारिक व क्वचित निरर्थक शब्द वापरल्यामुळे ही कविता अधिक दुर्बोध झाली आहे. एरव्ही हींत आलेलें तत्त्वज्ञान अद्वैतमताला अनुसरूनच असून वेदांतांच्या पारिभाषेशीं परिचित असणाराला तें फारसें दुर्बोध वाटणार नाहीं. एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की हे कवीचे अनुभवाचे बोल नसून केवळ शाब्दिक ज्ञान मात्र आहे. आणि म्हणूनच तत्त्वज्ञान समजावण्याच्या दृष्टीनें अथवा त्याचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें ही कविता प्रभावी ठरूं शकत नाहीं.

ही कविता प्रथम १९१५ जुलैच्या 'मनोरंजनांत' प्रसिद्ध झाली. कवितेच्या सुरवातीस कवीनें अशी टीप दिली आहे—'आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतोच'. याचा सरळ अर्थ इतकाच की मायेच्या योगानें आत्मज्ञान दुरावूं लागलें म्हणजे जीवात्मा व्याकुळ झाल्याशिवाय राहात नाहीं.

या कवितेंत 'फुटकी तपेली' हें अपूर्ण ज्ञानाचें प्रतीक आहे असें श्री. रा. श. वाळिंब्यांना वाटतें, तर 'फुटकी तपेली' म्हणजे 'माया' आहे असें श्री. रा. ग. हर्षे म्हणतात. परंतु यांपैकीं कोणताहि अर्थ घेतला तरी तो संपूर्ण कवितेंत लागूं पडत नाहीं. 'मायेची तपेली नको, ब्रह्मांडाची तपेली करा' आणि पुढे, 'सर्वस्वाची तपेली करा' असें कवि सांगत आहे. तेव्हा वाळिंबे किंवा हर्षे यांचा अर्थ या तीन्ही ठिकाणीं लागूं होण्यासारखा नाहीं. हीं तीन स्थळें लक्षांत घेतलीं असतां **तपेली** म्हणजे **ज्ञानप्राप्तीचें साधन** एवढाच अर्थ घेणें युक्त वाटतें. पहिल्या प्रथम ज्या तपेलीचा कवि धिक्कार करीत आहे ती मायेची आहे. एकंदर कवितेचा आशय लक्षांत घेतला असतां 'माया' म्हणजे 'प्रकृति' असा अर्थ कवीला अभिप्रेत नसून अविद्या अथवा 'अज्ञान' एवढाच मर्यादित अर्थ घ्यावयाचा आहे, असें वाटतें. असें मानलें तरच मायेची तपेली नको ब्रह्मांडाची तपेली करा' असें म्हणण्यांतील अर्थसंगति लागणें शक्य आहे. असा अर्थ न घेतल्यामुळेच, "या मायेच्या तपेलीऐवजीं अखिल ब्रह्मांडाची तपेली करा या त्यांच्या म्हणण्यांत कांहीच अर्थ दिसत नाहीं.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारण ब्रम्हांडसुद्धा मायेनेच उत्पन्न केलें असल्यामुळे त्याला तेवढी खरी तपेली समजणें चूक आहे" असें श्री. हर्षे यांना म्हणावें लागलें आहे. श्री. बाळिंब्यांनी ही अडचण लक्षांतच घेतल्यासारखें दिसत नाहीं. 'फुटकी तपेली' म्हणजे 'अपूर्ण ज्ञान' हा त्यांचा अर्थहि उपरोक्त तीन्ही ठिकाणीं लागू होण्यासारखा नाही. शिवाय 'फुटकी तपेली' म्हणजे जर अपूर्ण ज्ञान तर नुसती तपेली म्हणजे ज्ञान हें ओघानेच येतें. असें झालें म्हणजे 'माझी ओळख म्हणजे आत्मज्ञान' हें जें दुसरें प्रतीक आणि जें त्या तपेलींतील पाणी त्याची वाट काय ? म्हणूनच तपेली म्हणजे ज्ञानप्राप्तीचें साधन एवढाच अर्थ मीं वर केला आहे. हा अर्थ लक्षांत घेऊन या कवितेचा सरळ अर्थ पुढीलप्रमाणें होईल.

चिरकाळापासून जीवाला आत्मज्ञानाची तृष्णा लागली आहे. जीवात्म्याचा आत्मप्राप्तीच्या मार्गावरचा हा प्रवास फार दूरचा व खडतर आहे. आपण ज्याला अनंत म्हणू अशीं कैक अनंतं त्याला जायचं आहे. ज्या विश्वाचं ज्ञान करून घ्यायचं आहे अथवा ज्याचं आक्रमण करायचं आहे तें विश्व विस्ताराच्या दृष्टीने इतकं विशाल आहे की त्याच्यापुढे ज्याला आपण विश्व समजतों तें अणूसम ठरेल. तसेंच काळाच्या दृष्टीने तें इतकें अनंत आहे की ज्याला आपण 'काळ' म्हणतों तो त्याच्या एका क्षणांत जिरून जाईल. अशा या विश्वाच्या मागून मला जायचें आहे. त्याचं आक्रमण करून त्याच्या पुढे जायचं आहे, किंबहुना आदि व अंत यांना व्यापून उरायचं आहे. भावार्थ हा की विश्वाचं स्वरूप जाणून घेऊन त्याच्या पलीकडे—त्याला व्यापून उरलेलं जें परब्रह्म त्याला जाणायचं आहे. आणि त्याला जाणायचं म्हणजे त्याच्या इतकंच आपणहि व्यापक व्हायचं.

या प्रवासांतला कायदा मोठा कडक असल्याचं कवि सांगतो. हा कडक कायदा कोणता ? तर एखादं जरी पाऊल चुकलं तरी पहिल्यापासून पुन्हा धावावं लागतं. आपल्याच भोवती फिरावयाचें असल्यामुळे 'मार्ग कुठुनि मग सरावयाचा' असें कवि म्हणतो. याचा अर्थ असा की या ज्ञानप्राप्तीच्या बाबतींत यत्किंचितहि प्रमाद घडला तर आपण जेथे होतों तेथेच राहूं. ज्ञानाला चूक कशी सहन होणार ? आत्मज्ञान म्हणजे स्वतःचं ज्ञान असल्यामुळे आपल्याच भोवतीं फिरणें हा प्रयोगहि सार्थच ठरतो.

या प्रवासाच्या सुरवातीला पुष्कळ सोबत असते, परंतु पुढे हे सारे 'मी' मरतात. मरून माझ्याच ठायीं जगतात आणि माझीच सोबत मला उरते. यांत उल्लेखिलेले 'कितीक मी' म्हणजे हर्षे म्हणतात त्याप्रमाणे कित्येक जीवात्मे नसून ज्याला वामनराव जोशांनी एके ठिकाणीं 'सोंगाडे आत्मे' असें म्हटलें आहे ते सोंगाडे आत्मेच होत. निरनिराळ्या वृत्तीलाच आपण 'मी' समजत असतों. हें अज्ञानामुळे होतें. स्वतःचं ज्ञान होऊं लागलं म्हणजे मग हे अनेक 'मी' नाहीसे होतात आणि खरा 'मी'च काय उरतों. स्वतः गडकऱ्यांनीच याच कवितेंत याच्या पुढच्याच कडव्यांत 'खोटे मी' असा शब्द प्रयोग केला आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

'माझें मीपण फारच मोठें, अथवा मज जाणाया मीच विलक्षण' अशा वाक्यांचा अर्थ 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' 'सर्वं खलुं इदं ब्रह्म' इत्यादि सिद्धांत लक्षांत घेतल्यास कोणाच्याहि सहज ध्यानांत येईल. त्याचप्रमाणे 'नसतें परकें' म्हणजे मिथ्या जग त्यालाच आपण जाणतों. परंतु 'सत्' असा जो 'मी' म्हणजे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आत्मा त्याला जाणतं नाही. मात्र एकदा स्वतःला ओळखलं की इतर जें जग तें आपोआप लुप्त होतं इत्यादि अर्थहि अद्वैतमताला पूर्णपणें सुसंगत असून तोहि सहज लक्षांत येणारा आहे.

असा हा 'मी' तसा तो प्रवास असल्यामुळे मायेची ही 'तपेली' मला नको. ती माझ्या उपयोगी पडायची नाही असें कवि म्हणतो. हिच्यामुळे प्रवासांत खंड पडतो. हिच्यामुळेच आभासात्मक जग दिसायला लागतं व त्यांतच मी गुरफटून जातों, म्हणून ही मायेची फुटकी तपेली नको. माया म्हणजे अविद्या अथवा अज्ञान हा अर्थ कसा बरोबर आहे हें येथे लक्षांत घेण्यासारखें आहे. अज्ञानामुळेच जग सत्य भासतें हें स्पष्ट आहे.

यापुढे मायेची तपेली सोडून ब्रह्मांडाची तपेली करा असें कवि सांगत आहे. म्हणजे ब्रह्मांडालाच ज्ञानप्राप्तीचं साधन करा असं कवीला म्हणायचं आहे. रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैतवादाकडे कवि येथे वळल्यासारखा दिसतो. किंवा असें न मानतांहि 'ब्रह्मांडाची करा तपेली' याचा अर्थ सुसंगत रीतीने लावतां येण्यासारखा आहे. 'मया ततमिदं सर्वं' इत्यादि ठिकाणीं मीच या जगाला व्यापलं आहे, जग हें माझंच रूप आहे असं गीतेंत भगवंतानं सांगितलं आहे. याचप्रमाणें सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं किंबहुना चराचर सृष्टीच्या ठिकाणीं स्वतःलाच पाहावं असा उपदेश सर्व संतांनी केला आहे. हें विवेचन लक्षांत घेतलं असतां ब्रह्मांडाचाच तपेली म्हणजे ज्ञानप्राप्तीचं साधन करा असं म्हणण्यांत स्वारस्य आहे हें कळून घेईल. 'माझी ओळख पाणि तिच्यांतिल' असें म्हणून हाच अर्थ कवीने सूचित केला आहे.

पुढे ब्रह्मांडाची व्यापकता म्हणजे खरोखरीं परमात्मस्वरूपाचीच व्यापकताच वर्णिली आहे. ती, शब्दावडंबर सोडल्यास सरळच आहे. आत्मज्ञानाची विचित्रता जी वर्णिली आहे तीहि योग्यच आहे. आत्मज्ञान मुळांत होतेंच, मध्यंतरीं मायेच्या आवरणामुळे तें नष्ट झाल्यागत भासलें आणि नव्याने ज्ञान मिळवायचें आहे असें वाटलें परंतु हें नव्याने ज्ञान मिळाल्याबरोबर तें नवें नसून जुनें होतें असें कळून येतें. याच अर्थाने 'जुनी ओळख मग नवीस आणी' असें कवीने म्हटलें आहे. स्वरूपाचं ज्ञान झाल्यावर स्वतःहून भिन्न असें कांही उरतच नाही म्हणून—

'तपेलीसही जाळिं भरवीन
प्रवासामहि जाळिं जिरवीन
नको मला ही असली मेली'

असें कवीने म्हटलें आहे.

शेवटीं सर्वस्वाची तपेली करा म्हणजेच सर्वस्व हेंच सर्वस्वाला जाणण्याचं साधन होय असें म्हटलें आहे. साधनहि तेंच, त्यांतील पाणीहि तेंच, हीच त्रिपुटीरहित अद्वैताची अवस्था. हिचें वर्णन शब्दांत करणें अशक्य असल्यामुळे—

प्रकार ध्या हा मनिं एकंदर
आगि–खुगी ओळखा क्या है अंदर

असें शेवटीं म्हटलें आहे.

या कवितेंतील तत्वज्ञानपर अर्थाचा अशा रीतीने उलगडा करतां येत असला व त्यांत सुसंगतीहि दाखवितां येत असली तरी त्यासाठी बुद्धीला विलक्षण ताण
९७१ द्यावा लागतो, हें स्पष्ट आहे. आणि त्यामुळेच सर्वसामान्य वाचकांच्या आवाक्याबाहेर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो अर्थ जातो. म्हणूनच हिला दुर्बोध म्हणावें लागतें. शिवाय प्रारंभींच म्हटल्याप्रमाणे दुर्बोध प्रतीकांच्या योगें आणि भाषाचमत्कृतिमुळे या अर्थाच्या दुर्बोधतेंत भर पडली आहे. म्हणूनच या कवितेची गणना गूढगुंजनात्मक कवितांत होते.

कलगीचें गाणें

अर्थाच्या दृष्टीने अत्यंत दुर्बोध समजली जाणारी अशी ही कविता आहे. 'कलगी' हा शब्द तुर्की 'कल्गी'= शिखर या शब्दापासून व्युत्पादिला जातो. एक प्रकारचा तुरा असा त्याचा अर्थ असून लावणीच्या एका प्रकाराला तें नांव प्राप्त झालें आहे. दुर्बोध वाटणारा एखादा सवाल एका पक्षाने पद्यांतून टाकायचा व त्याचा जबाब दुसऱ्या पक्षाने द्यायचा असा हा कलगी तुऱ्याचा प्रकार महाराष्ट्राला परिचित आहे. प्रस्तुत कवितेमध्येहि असाच एक दुर्बोध वाटणारा सवाल कवीने टाकला असून त्याच्यावर तुरा करण्याचें आव्हान दिलें आहे. शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास व आवड याच्या मुळाशीं आहे.

हें या कवितेचें बाह्यांग झालें. अंतरंगाकडे दृष्टि टाकली असतांना, क्षणभर बुद्धीला बुचकळयांत टाकण्यासारखें तें आहे यांत शंका उरत नाही. तथापि अद्वैत तत्वज्ञानाशीं ज्याचा परिचय आहे त्याला याहि कवितेच्या अर्थाचा उलगडा करणें फारसें कठीण वाटूं नये. 'फुटकी तपेली' या कवितेंत जे तत्वज्ञानपर विचार आले आहेत तेच निराळ्या रंगांत आणि निराळ्या ढंगांत या कवितेंत आले आहेत.

या कवितेच्या सकृद्दर्शनीं लक्षांत येणाऱ्या अर्थाचा सारांश असा—

'एक वेळ जी फार आवडती होती व जिचे नाना सूर चित्ताला आनंद देत असत, ती सारंगी मी हातांत घेऊन बसलों होतों. तिचे सूर मनाचा खेद घालवितील अशी आशा मला वाटत होती. परंतु भोवताली ढोल, नगारे यांनी गर्दी केली. त्यांत सारंगीचा सूर जमेना. अशांत कृष्ण मेघांनी आकाशांत गर्दी केली. ते मस्तकांत शिरले. बाहेर धुकें पसरलें. काळोखाचें राज्य झालें. त्या दाट तमाच्या तेजांत नाही-पणाचा गिरि दिसायला लागला. त्या गिरिशिखरावर एकीकडे बाहेर असें मंजुळ गाण्याचे सूर धरून एक बाळ बसल्यासारखें वाटे. मेघांच्या नादाने त्या गाण्याचा क्षणांत विसर पडत होता. सारंगीचे सूर जमेनात म्हणून संतापाने त्या सारंगीचा मीं चुराडा केला आणि मग तो नाहीपणाचा डोंगर अधाशाने पाहात बसलों. मधून मधून त्या बाळाच्या गाण्याचाहि भास होत होता. इतक्यांत आकाशांत वीज कडाडली. धुकें पळालें. मेघ जळाले. मेघाशिवायच वृष्टि झाली. खरेपणाच्या पावसाने काळोखा धुवून गेला. दाट तमाचें तेज झालें. सारंगी जशीच्या तशी हातांत होती. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बाळाच्या गाण्याचा सूर स्पष्ट ऐकूं येऊं लागला. सारंगी छेडल्याबरोबर पहिल्याहून गोड असा एकच सूर बाहेर पडला. डोंगर विरला. बाळ पुढे येऊन बसलें. वृद्ध वधूचें बाल वराशीं लग्न झालें. माझी सारंगी तुझ्या गाण्याला साथ करील असें त्या मुलाला म्हणतांच त्याने आपलें गाणें बंद केलें. शेवटीं, ही सारंगी तूंच धर असें म्हटल्यावर मात्र बाळ गाऊं लागलें. त्या गाण्याचें विष अंगीं भिनलें. मी मेलों. माझ्या प्रेतावर बसलों. चोहोंकडे गाणेंच भरलें. तुम्ही आणि आम्ही जिरलों. सर्वांचें गाणें झालें. या सवालावर तोच तुरा करूं शकेल, जो खराखुरा आणि पुरापुरा वेडा असेल.'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील सारांश दुर्बोध वाटल्यास नवल नाही. कारण त्यांत प्रतीक योजना आहे. सारंगी म्हणजे काय ? तें बाळ कोण ? त्याचें गाणें कसलें ? वृद्ध वधु आणि बाल वर यांच्या लग्नाचा काय प्रकार आहे ? इत्यादि गोष्टींचा उलगडा झाल्याशिवाय या कवितेंतील अर्थाचें आकलन होणार नाही.

श्री. हर्षे यांनी या बाबतींत बसविलेलें रूपक असें:—

सारंगी=देहविशिष्ट अहंकार बुद्धि. वृद्धवधु=माया. बाल वर=परब्रह्म. गाणें=चिरंतनाचा निदिध्यास. ढोल नगारे=षड्रिपु. हें रूपक एकंदर कवितेचा विचार केला असतां सर्वच ठिकाणीं लागू पडण्यासारखें नाही. उदाहरणार्थ, सारंगी म्हणजे देहविशिष्ट अहंकार बुद्धि हा अर्थ,

'सुरा बरोबर--विरला डोंगर—शिखर तळाबर—नाहींचें नाही झालें' येथे मुळीच लागू पडत नाही. तसेंच खरेपणाचा पाऊस पडल्यानंतर सारंगी हातीं असते. याहि घटनेशीं सारंगीचा वरील अर्थ विरोधी आहे.

"जपलीं जीतें जिवापरी, सारंगी ही तूंच धरी"

या ओळीवरून हर्षे यांना त्यांचा अर्थ सुचला असावा. पण तो बरोबर नाही वृद्ध वधु म्हणजे माया व बाल वर म्हणजे परब्रह्म हा अर्थहि गैरलागू आहे. माया आणि परब्रह्म यांचें लग्न होतें म्हणजे काय होतें ? त्याचप्रमाणे गाणें म्हणजे चिरंतनाचा निदिध्यास हा त्याचा अर्थ, 'चहूंकडे गाणें भरलें' या ओळीपासून तों ' करिशिल मग गाणें गाणें ! ' या ओळीपर्यंत मुळीच लागू पडण्यासारखा नाही.

श्री. रा. शं. वाळिंबे यांनी या कवितेचा अर्थ लागत नसल्याचें सांगितलें आहे. असो.

या सर्व प्रतीकांचा उलगडा येणेप्रमाणें:—सारंगी=आत्मजिज्ञासा. गाणें=आत्मज्ञान. वृद्धवधु=बुद्धि. बालवर=बोध. या स्पष्टीकरणाच्या अनुरोधाने एकंदर कवितेचा अर्थ पुढीलप्रमाणे लावतां येईल.

मनुष्याच्या ठिकाणीं स्वभावतःच आत्मजिज्ञासा असते. आपण कोण ? कुठून आलों ? व कुठे जावयाचें आहे ? इत्यादि प्रश्न आपल्या मनांत मधून मधून उत्पन्न होतात. ही आत्मजिज्ञासा म्हणजेच सारंगी व तिचे सूर म्हणजेच हे प्रश्न. काळांतराने ही आत्मजिज्ञासा लुप्तप्राय होते. अशाच स्थितींत कवि–अथवा साधक–स्वतःविषयीं विचार करीत असतां मनांतील नाना प्रवृत्ति आणि नाना विचार, विकार यांची गर्दी होते आणि चित्ताची एकतानता भंग पावते. त्यामुळे ही आत्मजिज्ञासा तशीच जिरते. भोवतालच्या जगांतहि अशीच धामधूम चाललेली असते. अनेक व्यावहारिक प्रश्न, व्यावहारिक चिंता व्यावहारिक संकटें यांचा बाहेर तसा आंतहि गोंधळ चाललेला असतो. त्यामुळे कांही सुचेनासें होतें. जिकडे तिकडे काळोखाचें म्हणजे अज्ञानाचें राज्य पसरतें. या अज्ञानामुळेच जें मुळांत नाही असें—मिथ्या जग सत्यत्वाने भासायला लागतें. आणि अज्ञानजन्य सुखदुःखे हीहि भासमान व्हायला लागतात. अशाहि अवस्थेंत विश्वाच्या पलीकडे कांही तरी आहे याची जाणीव आपणाला असते. तथापि मधून मधून सांसारिक व्यापामुळे ती जाणीवहि लोपल्यागत होते, अशा अवस्थेंत आत्मजिज्ञासेला अवसर कुठून ? मायावी जगांतच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपणाहि गुरफटून जातों. इथे सर्वत्र कोलाहल दिसतो. सुसंवाद कुठेच दिसत नाही. अखेरचा प्रयत्न म्हणून आपण कोण ? याचा विचार करावा तो त्याची भीति वाटायला लागते व हा नाद आपण कायमचा सोडून देतों; आणि मग अंधपणाने या मिथ्या जगांतच गुरफटून जातो. अशा दारुण निराशेच्या काळीं परमेश्वराकडून कांहींस आश्वासन मिळालं तर निश्चयाचं बळ प्राप्त होतं आणि मग अज्ञानांधःकार दूर व्हायला लागतो. सत्याच ज्ञान होऊ लागल्याबरोबर जगाचं मिथ्यापण प्रत्ययाला यायला लागतं. परमेश्वराच्या स्वरूपाचं ज्ञान व्हावं अशी उत्कंठा पुन्हा लागते. हळूहळू बुद्धीला बोध व्हायला लागतो. हा आत्मबोध पूर्णपणाने ठसण्यासाठी 'मी तूं' पणाची जाणीव नाहीशी व्हावी लागते. 'मला तुझें ज्ञान होऊ दे' अशी भाषा सुद्धा इथे घातक ठरते. असा विचार मनांत येण्याबरोबर बोध दुरावायला लागतो. म्हणून एवढा सुद्धा निराळेपणा जेव्हा आपण सोडूं तेव्हाच आत्मबोध होईल हा आत्मबोध म्हणजे भिन्नत्वांतील एकपणाच होय. हा आत्मबोध होण्याबरोबर देहबुद्धि नाहीशी होते. जिकडे तिकडे आपलेंच रूप दिसायला लागतें. 'तुम्ही आम्ही' असलें द्वैत नाहींसें होतें व एकच एक तत्व सर्वत्र उरतें. हें जाणण्याला अधिकारहि तसाच लागतो.

साधकाला येणाऱ्या अनुभवाचेंच वर्णन गडकऱ्यांनी प्रतीकांच्या सहाय्याने मांडलें आहे. त्यांतून व्यक्त होणारा अर्थ थोडक्यांत वर स्पष्ट केला आहे कवितेंत आलेल्या विरोधाभासपर वर्णनाचाहि उलगडा वरील स्पष्टीकरणाच्या अनुरोधाने होण्यासारखा आहे. आधीच विषय कठीण. त्यांत चमत्कारिक प्रतीकांचा उपयोग आणि शब्दावडंबर त्यामुळे ही कविता दुर्बोध झाली आहे यांत शंका नाही. तिचा शक्यतों सुसंगत अर्थ लावण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

नुसती गंमत

★

डॉ. श्री. व्यं. केतकर एकदा शारदामंडळाच्या समारंभासाठी आले होते. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी ते कार्यवाहाकडे आपल्या उजव्या हाताची करंगळी दाखवून म्हणाले,

"जरा जाऊन यावं म्हणतों. कुठेशीं सोय आहे—?"

मुख्य पाहुणे म्हणून कार्यवाहांनी त्यांना प्रोफेसर्स कॉमनरूमकडे नेलें. ते म्हणाले—'छे इकडे नको—विद्यार्थी नेहमी जातात तिथेच मी जाणार—' त्यांचा विक्षिप्त स्वभाव माहीत असल्यामुळे दूरच्या संडासाकडे कार्यवाहांनी त्यांना नेले. परत येतांच ते म्हणाले,—

"तशी मला घाई नव्हती. मला एवढेंच बघायचें होतें की, आमच्या वेळेच्या विद्यार्थ्यांच्या आणि हल्लीच्या सह-शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या " भित्ति काव्यांत " कांही फरक झाला आहे कां ?" आणि ते हंसले,

'मग काय आहे आपलं मत ?'—कार्यवाह हंसून म्हणाले,

"असायचं काय ? तरुण पिढी आमच्या वेळची काय, अन् हल्लीची काय, सारखीच."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आईची काळजी

वामन इंगळे

✶

"आई, बघ तुला आज बरं नाही. तूं आज स्वस्थ पडून रहा. मला आज जेवायचं नाही"

इतकें बोलून आईच्या गळ्याभोवती मीं स्कार्फ गुंडाळून तिला खाटेवर झोपाविलें.

"अरे पण तूं बाजारांत जाऊन भाजी घेऊन ये.

"अग पण तुला बरं नाही ना" !

"जारे, थोडसं दुखायला लागलें की लगेच कावराबावरा होतोस, मी कांही मरत नाही एवढ्याने"

आईच्या प्रेमळ आग्रहापुढे मी गप बसलों. जातांना हिरवी शाल आईच्या सर्वांगावर ओढली व जिना उतरून दुचाकी बाहेर काढली.

दुचाकी चिटणीस पार्काच्या बाजूने सरळ घेऊन कॉटनमार्केटकडे निघालों. वर्षांतून चारच महिने कापसाचा पण वर्षभर अव्याहत भाजीचा बाजार भर-णाऱ्या ठिकाणावर, "कॉटनमार्केट" चा आरोप करून भाजीला अन्याय करणाऱ्या या नामाभिधानाची गंमत वाटली.

कॉटनमार्केटांत भाजी घ्यायला येणाऱ्या प्रत्येक माणसाला जीवनांतील धका-धकीचें प्रात्यक्षिक खऱ्या अर्थाने मिळतें. मी दुचाकीसह असल्यामुळे तर जीवनकलह तीव्रतम झाला.

भाजी खरेदी करून वाट काढूं लागलों. एम्प्रेस मिलच्या बाजूने असलेल्या झोपड्यासमोर एक अमानुष दृश्य दिसलें. बराचसा जमाव जमलेला व मध्यभागीं एक आडदांड आपल्या बायकोला तुडवत लाथाडत असलेला. ती त्याची बायकोच होती. कारण तो ज्या स्त्रियांची लाखोली वाहात होता तसल्या स्त्रियांना बायको-शिवाय भारतांतले सर्व प्राणी अपात्र असतात. तो दातओठ खाऊन लाथांचा वर्षाव करीत होता आणि ती पोटाच्या भारावर उठण्याचा प्रयत्न करीत होती. जवळच उभी असलेली एक म्हातारी कळवळ्याने म्हणाली, " अरे, सोडून दे. काळीज दुखावेल तिचें ". तिच्या एकूण बोलण्यावरून जमिनीवर पडलेली बाई आई होणार होती.

क्षणभर सर्व विसरलों. अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यासमोर हिरव्या शालींत गुंडाळलेला आईचा मलूल चेहरा मला दिसूं लागला. पायांना एकदम गति मिळाली.

माझी आई स्वस्थ झोपली होती. अनावर होऊन एकदम आईच्या कुशींत मीं मान खुपसली.

"अरे, काय झालं, मी बरी आहें, किती वेडा रे तूं, म्हणे कॉलेजांत जातोस."

—आणि तिने माझे डोळे पुसले. तो तिचा स्पर्श ! माझें काळीज दुखावलें होतें व तिचें काळीज ओलें झालें होतें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी

तबलावादक बाळासाहेब आठवले

मधुकर श्रीधर मंगरूळकर

★

[केवळ नागपूरचेंच नव्हे तर आमच्या प्रांताचें भूषण असलेल्या निगर्वी, साध्या स्वभावाच्या कुणालाहि अभिमान वाटावा अशा या कलावंताचा परिचय म्हणजे प्रस्तुत लेख होय. —संपादक]

कलावंताच्या आयुष्याचा मागोवा घेतला म्हणजे कुठेना कुठेतरी संगीताचे थोडे तरी पूर्व संस्कार आढळतात. संगीत कलेचा ठेवा सहसा एकदम गवसला असें होत नाही. तो वारसा या नात्यानेच बहुधा येत असतो. पण बाळासाहेब आठवल्यांच्या बाबतींत तरी या नियमाला अपवाद करावा लागेल. नागरी राहणीचा त्यांच्या वडील मंडळींना स्पर्श नव्हता. कष्टाची शेती करावी. घातल्या घामाचें पीकहि भरपूर येई. हल्ली सारखी धरणी तेव्हा रुसत नव्हती. वरुण देवताहि वेळच्या वेळीं प्रसन्न होई. काम करून थकून भागून घरीं आले म्हणजे एखाद्या गुरुवारीं किंवा अशाच कांही तरी निमित्ताने गावांतहि चार पोरें एकत्र जमायचीं आणि भजनी ताफा सुरू होऊन बाळासाहेबांच्या हातांत नेहमी ढोलकें आपलें ठेवलेलें. हाच काय तो त्यांचा वारसा !

श्री. पु. ल. देशपांड्यांच्या 'पुढचें पाऊल' या चित्रपटांतील किसना ढोलकी-वाल्याची आठवण मला बाळासाहेबांकडे पाहून येते. मात्र बाळासाहेब नागपूरला आले, ते किसना सारखे नशीब अजमाविण्यासाठीं नव्हे, तर शिक्षणासाठीं—इंग्रजी पहिल्या वर्गात वयाच्या दहाव्या वर्षी, नांव घालण्यासाठी.

त्यावेळीं नागपूरांत श्रीमंत रघोजीमहाराज भोसल्यांची भजन मंडळी फार प्रसिद्ध होती. महाराज त्यावेळीं स्वतः गात असत. त्यांचे 'मल्हारी देवा मला पावगा' हें भजन ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें होतें. महाराजांच्या मागून इतर मंडळी त्यांची री ओढीत आणि मागोमाग टाळ आणि मृदंगाचा घोष चालत असे. खेड्यांतल्या भजनापेक्षां श्रीमंतांकडच्या या भजनाचा थाट, झोकनोक कांही और होता. बाळासाहेबांना नेहमी वाटायचें की आपल्याला अशा मंडळींत वाजवितां आलें पाहिजे.

त्यावेळीं नागपुरांत नानासाहेब पानसे इंदूरवाले यांचे शिष्य बळिरामपंत पंडे विशेष गाजत होते. भोसले घराण्याचे त्यांचे विशेष संबंध होते. त्यांनी तबलावादनाचे वर्ग चालविले होते. त्यांत बाळासाहेबांनी प्रथम नांव घातलें. पानशांचें घराणें पखवाजाचें ! बळीरामपंत त्यांच्या तालमींत तयार झालेले. पखवाज वाजवून वजनदार झालेल्या हाताने; ते विलक्षण गोडव्याने तबला वाजवीत असत. तबलावादनांत डग्याला एक विशिष्ट अस्तित्व आहे हें पंतांनी आपल्या वादनाने सिद्ध करून दाखविलें होतें. अशा सिद्धहस्त गुरुजींच्या हाताखालीं बाळासाहेबांनी पहिले धडे गिरविले. त्या शिकण्यांतहि सुसंगतता होती म्हणतां ? छे, नांव कशाला ! बळीरामपंतांना

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा " धंदा " असा कधी मानवलाच नाही. शिष्याची आणि गुरूची ठराविक वेळीं भेट झाली तर नशीब. धड शाळेचें शिक्षण नाही, धड तबल्याची मेहनत नाही, अशा स्थितींत बाळासाहेबांनी शिक्षणाला राम राम ठोकला आणि पुण्यामुंबईची वाट धरली. मुंबई पुणे म्हणजे कलावंतांची पंढरीच. श्री. विठ्ठलराव जोगांच्या बरोबर बाळासाहेब नाशकास उतरले. जोगांचे धाकटे बंधु विष्णुपंत हिराबाईच्या कंपनींत होते. एक दिवस हिराबाईचें गाणें होतें. कंपनींत वहीदखाँ साहेब आले होते. सर्व सिद्धता झाली. पण कंपनीचा तबलजी नाटकाचा वार नसल्यामुळे कुठे तरी गेला होता. हिराबाईच्या मातोश्री समोर बसल्या होत्या. त्यांच्याजवळ विठ्ठलराव जोगांनी बाळासाहेबाबद्दल गोष्ट काढली. दुसरा तबलजी नसल्यामुळे काम धकविण्यासाठी बाळासाहेबांना बसविलें आणि थोड्याच वेळांत बाळासाहेबांनी आपली करामत दाखविली. पुण्याला जाणें निर्हेतुकच होतें. हिराबाईच्या आईच्या म्हणण्यावरून ते कंपनींत २० रुपये पगारावर राहिले. मुख्य तबलजी नसला तर कधीमधी वाजवायचें एवढें काम. बाळासाहेबांच्या व्यावसायिक जीवनाला अशा रीतीने सुरवात झाली.

नागपूरचे रसिकश्रेष्ठ श्रीमंत बाबुरावजी देशमुख हे मूळ जळगांव तालुक्यांतले. त्यांच्या वेहावद या गावीं कांही प्रसंगाने रामभाऊ सवाईगंधर्वांचे गाणें ठरलें. त्याकाळीं, गायक आपली वादकमंडळी घेऊन फिरत नसत. कसल्याहि साथींत गाणें रंगवितां आलें पाहिजे ही तयारी ठेवून मुलुखगिरी करायला ते निघत असत. रामभाऊंनी बाळासाहेबांना साथीला घेतलें. रामभाऊंशीं सदा रुष्ट असलेला आवाज त्या रात्रीं प्रथमपासूनच प्रसन्न होता. रामभाऊंच्या, लहरीसारख्या संथ आलापयुक्त गायकीबरोबर बाळासाहेबांची साथ धिमे धिमे चालली होती. रामभाऊ या नवशिक्याला मध्येच हिंमत येण्यासाठी म्हणायचे—

" हां ! ठीक चला है ! बजाव ! खूप मन खेळून वाजव—" त्या रात्रींचें रामभाऊंचें गाणें बाळासाहेबांच्या साथीने रंगलें असें तरी कसें म्हणावें ? पण त्यांनी उचलून धरलें खासच. रामभाऊ प्रसन्न झाले. सवाईगंधर्वच प्रसन्न झाल्यावर कुबेर प्रसन्न होणार नाही असें कसें होईल. बाळासाहेबांना त्या रात्रीची बिदागी खरोखरीच दोन हातांत मावणार नाही अशी मिळाली. राजेरजवाड्यांच्या पदरीं त्या काळीं ५०० रुपये बिदागी तबलावादकाला मिळाली असेल असें मला वाटत नाही. तेव्हापासून बाबुरावांचें कृपाछत्र त्यांना लाभलें. कासव आपल्या पिलाची जोपासना आपल्या नजरेने करीत असतें म्हणतात. तीच कणव श्रीमंत बाबुरावांना बाळासाहेबाबद्दल आहे.

या देणगीमुळे बाळासाहेबांना स्वतःवर एकप्रकारची जबाबदारी आल्यासारखें वाटलें. थोड्या शिदोरीवर इतकी मजल मारली ती ठीक. यापुढची वाट धोक्याची होती. कुणाचें तरी बोट धरून नीट पाऊल न टाकल्यास गर्तेत खोल पडण्याचा संभव होता.

इंदोरला त्या वेळीं धुलीया नांवाचे तबलजी विशेष प्रसिद्ध होते. घोडदौड करून गेल्यानंतर हवेंत जी धूळ उडत राहते, तसा बाज त्यांच्या वाजविण्याचा होता. बोल वाजून गेला तरी जणू टापांची धूळ कर्णपथावर सारखी आघात करीत त्या दिव्य क्षणाची अनंत कालपर्यंत आठवण करून देत असे. असा त्याचा महिमा आणि म्हणून त्यांना धुलीया हें नामाभिधान प्राप्त झालें होतें. गोहरबाईच्या साथीला मी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धुळियावस्तादना गुजरांच्या वाड्यांत ऐकलें होतें. माणूस अत्यंत गुणवान पण तेढा. लवकर मूठ उघडायची नाही. बाळासाहेबांनी त्यांचा गंडा बांधला व कांही कायदे त्यांच्यापासून घेतले. हिराबाईची कंपनी जळगांवलाच सुटली होती. आता नुसती मेहनत. पण प्रथम वाटलें तितकी मूठ गुरुजी उघडत नव्हते, असें त्यांना लवकरच आढळून आलें. कांही दिवसांनी ते मुंबईला आले व एक दिवस अचानक बाळासाहेबांचा हात उस्ताद चाँदखाँच्या कानीं पडला. चाँदखाँ एक सुप्रसिद्ध सारंगिये होते व तबलाहि उत्कृष्ट जाणणारे होते ते म्हणाले—

'बाळा ! बेटा तेरा हात बहोत अच्छा है. मै खुश हूँ. जो कुछ मेरेसे बनेगा मै तुझे दूँगा—'

याच सुमारास त्यांची ओळख महंमद हुसेनखाँशी झाली होती. महंमद हुसेन हे कादरबक्षचे चिरंजीव. बालगंधर्वांनी अमरपदाला पोचविलेले सारंगिये कादरबक्ष. त्यांनीहि अधून मधून बाळासाहेबाला सांगावें. महंमद हुसेन म्हणायचे—

"–जें काही सांगतात तें ऐकून घे. मला मात्र हें भाग्य नाही. म्हाताऱ्याने मला सारंगी घेऊन कधी धडा दिला नाही. दार बंद करून मेहनत चालू असतांना जे पलटे कानावर येतील ते ते घोटून जे कांही हातांत बसले तेवढेच•••"

आणि एक दिवस महंमद हुसेनच्याच आग्रहाने बाळासाहेब त्यांच्याच घरीं राहयला गेले.

कादरबक्ष होते सारंगिये. परंतु त्यांचे बंधु जुगनाखाँ हे सुप्रसिद्ध तबलावादक होते त्यांनी दिल्ली घराण्याचा सगळा बाज हस्तगत केला होता. दिल्लीवाले नथ्थुखाँ नन्हेखाँ यांचे ते पट्टशिष्य. कादरबक्षांच्या सारंगीवादननैपुण्यावरूनच त्यांच्या तबलावादनाची कल्पना करायची. एकदिवस महंमद हुसेन म्हणाले—

"तुम चाचाके पास चलो. वे बडे खुष होंगे. तुम्हारा बडा फायदा होगा—"

चाचाकडे जाणें म्हणजे सोपें नव्हतें. कधी न चढलेल्या माड्या आता चढाव्या लागणार होत्या.

मुंबईला ग्लोब सिनेमाजवळ अशीच एक 'माडी' होती. त्या माडीच्या मालकिणीचें नांव होतें बसंती. काश्मीरांतला हा वसंत मुंबईला फुलला होता. जुगनाखाँचा मुक्काम बहुधा तिथेच असे. बाळासाहेबांचा महंमद हुसेनबरोबर त्या माडींत प्रवेश झाला. आणि नंतर तो बरेच दिवस टिकला. समारंभपूर्वक बाळासाहेबांनी त्यांचा गंडा बांधला. आज बाळासाहेब वाजवितात तो बाज जुगनाखाँचा. कलम नीट बांधलें गेलें तें इथेच. मग त्याचा विस्तार झाला. बसंतीच्या सहवासाने मात्र साथीचें एक नवें अंग त्यांना समजलें. निरनिराळ्या ढंगाने तबला कसा वाजवावा याचें प्रत्यक्ष ज्ञान त्यांना झालें. स्वतंत्र वादनाचा हात तयार झाला आणि साथीला—जसा गाण्याचा रंग तसा साथीच्या तबल्याचा ढंग.

—आणि नंतर त्यांच्या खऱ्या खुऱ्या मुलुखगिरीला सुरुवात झाली. पं. दुर्गा प्रसादच्या शिष्या श्रीमती सरस्वती कुमठेकर त्यावेळीं गाण्यांत आणि नृत्यांत विशेष पुढे येत होत्या. हिराबाई बडोदेकरांच्या साथीला सारंगी वाजविणारे श्रीयुत बाबूराव कुमठेकर यांच्या त्या चुलतभगिनी होत्या. त्यांच्यासमवेत बाळासाहेबांनी सारा उत्तर हिंदुस्थान पायाखाली घातला. सरस्वतीबाईची कीर्ति रामपूर दरबारच्या कानीं गेली होती. तिथे बाळासाहेबांची विशेष तारीफ झाली.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंबईला आल्यावर कुमार मुव्हिटोनमध्ये त्यांनी कांही दिवस काढले. पण स्थैर्य आलें सुलोचना संगीत मंडळींत. सुलोचनाबाई पालकरांच्या आग्रहामुळे बेळगांवला त्यांनी तीन वर्षे कॉन्ट्रक्टने काम केलें. बैठकींत तबडतोब रंग भरण्याची कला बाळासाहेबांनी रंगभूमीवरूनच मिळविली.

कंपनीचा मुक्काम हुबळीला होता. समोरच्याच थिएटरांत गंधर्व कंपनी उतरली होती. रसिकांना प्रश्न पडे, इकडे जाऊं कीं तिकडे जाऊं! सुलोचनाबाईंचें संशय कल्लोळ लागलें होतें. बाई गात होत्या, 'साम्य तिळहि नच दिसत—' आणि बाळासाहेब साथ करीत होते आणि खाँसाहेब अहमदजान तिरकवासाहेब मागून ठेका ऐकत होते. त्या दिवसापासून खाँसाहेबाचे त्यांचे संबंध घनिष्ट झाले आणि बाळासाहेबांनी त्याचा फायदाच करून घेतला.

१९३९–४० साल नागपूरकरांना नाट्याच्या दृष्टीने चांगलें गेलें. श्रीमंत देशमुखांच्या प्रयत्नानेच आपल्या उतरत्या काळीं बालगंधर्व नागपूरला गंधर्व कंपनी घेऊन आले होते. मोहरमांत महंमदजान तबलिया मुट्टीवर गेला. आणि बाबूरावजींच्या शब्दानेच बाळासाहेब तिथे रूजू झाले. पुढेहि राजाराम संगीत मंडळींत नटवर्य लोंढे, मास्तर दिनानाथ वगैरेंची त्यांनी साथ केली.

लढाईच्या दिवसांत सरकारचें Song publicity खातें निघालें. त्यांत ते होते. हें सांगण्याचें कारण कीं त्यामुळे त्यांच्या आयुष्यक्रमाला एक नवीन चालना मिळाली. १००–१५० गाणीं बसवून ही सारी मंडळी मुंबईला "हिज मास्टर्स व्हाईस" कंपनींत ध्वनिमुद्रण करायला गेली. सारी मंडळी नंतर नागपूरला परतली. पण ती बाळासाहेबाविना—कारण जी. एन. जोशांच्या आग्रहामुळे ते रेकॉर्ड कंपनींत नोकरीला राहिले. तीन साडेतीन मिनिटांच्या रेकार्डमध्ये तबलावादकाला आपलें विशेष कसब दाखवावें लागतें. रेकार्ड कंपनी सोडल्यानंतर ते हल्ली नागपूर नभोवाणींत काम करतात.

आयुष्याचीं ऐन उमेदीचीं वर्षें त्यांनी अशा रीतीने गुप्त वातावरणांत खर्च केलीं. त्यामुळे त्यांच्या वादनांत चतुरस्त्रपणा आला आहे. आज त्यांचें कौतुक कोणीहि करील. परंतु लहानपणीं नागपूरला आल्यानंतर थोडक्याच दिवसांत, नानाजी चिमोट्यासारख्या रसिकांनी, राजेलक्ष्मणराव साहेबांच्या हस्तें त्यांना सुवर्ण पदक देऊन गुणगौरव केला होता. राजेसाहेबांचाहि त्यांच्यावर विशेष लोभ होता सीताबर्डीवर श्री. दिनकरराव पटवर्धनांच्या घरीं ग्वाल्हेरचे गायक पं. कृष्णराव पंडित यांचें गाणें झालें होतें. तिथेहि राजे साहेबांनी बाळासाहेबांना आग्रहाने बसविलें होतें. त्यादिवशीं त्यांनी असा रंग भरला की, नंतर लगेच श्रीमंत देशमुखाकडे झालेल्या गाण्याला देखील तेच साथीला होते. त्यांनीं निरनिराळ्या गायकांचीं गाणीं वाजविलीं बच्चा शाळीग्राम तर त्यांच्या साथीवर निहायत खूष असतात. आमच्या प्रभाकरराव जोशांचा कार्यक्रम तर त्यांच्या साथीशिवाय रंगतच नाही. त्यांच्या साथीची मजा ऐकायची असली तर पद्माबाईंची 'साजन नाहीं घर मोहे बिरहा सतावे' ही ठुंबरी ऐकावी. व त्यावर बाळासाहेबांची सव्वत्ती ऐकावी. सहमवेदनेमुळे जणु कांही त्यांचा डग्गा दुःखाने कढ येऊन गदगदत असतो. प्रभाकररावांचें 'नदीया धीरे बहो' असो, किंवा 'हमारी कौन सुने बात जियरा' ही चंद्र कौंसातली द्रुत चीज असो. 'कौंदटला सुमनी' असो किंवा 'प्रभु भजवरी कोपला' असें म्हणून मारलेली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आर्त हांक असो, बाळासाहेबांचा तबला जगू दोन्ही हात जोडून तयार असतो. सेवा करायला! त्यांचा लग्गीबाज मला स्वतःला विशेष प्रिय आहे. धुळजींकडे शिकलेला पूरबबाज, चाटी किंवा किनारीबाज; दिल्लीचा दोनबोटांचा बाज व जुगणाखाँचा मिरटबाज हे तीनहि बाज त्यांनी हस्तगत केल्यामुळे त्याच्या समन्वयाने गाण्याच्या वजनाने वाजणारा त्यांचा स्वतःचा एक विशेष बाज तयार झाला आहे.

एक दिवस नागपूरचे एक प्रसिद्ध पेटीवादक गुणवंतराव जी महालांतील एका पानवाल्याच्या दुकानांतील रेडिओवरून एकाग्र चित्ताने तबला ऐकत होते. ठेका संपला. कलावंताचें नांव पुकारलें गेलें. गुणवंतराव मला म्हणाले, 'मला वाटलं तिरखवाँच नागपूर नभोवाणीवरून······'

मीं म्हटलें, 'काय मास्तर! थट्टा करतां काय बाळासाहेबांची!' 'मी आणि थट्टा!' गुणवंतराव म्हणाले, 'मी थट्टा करीत नसतों. चांगल्याला चांगलें म्हणायला मी कुणाच्या बापाला भीत नाहीं'

बाळासाहेबांच्या वादनाची जात एखाद्या जातिवंत अबलख घोड्यासारखी आहे. साधी कदम टाकेल तरी नखऱ्यांत. मान मुरकत मुरकत तसूतसूंने भूमि आक्रमण करायची आणि इशारा मिळतांच गगनाला गवसणी घालायची तयारी. ते गाणें समजून वाजवितात. हात तयार होईल अशीर मेहनतीने पण बुद्धि तयार व्हावी लागते. ही समज त्यांना पूर्ण आहे. त्यांच्या वाजविण्यांत जो डौल आहे त्याचें श्रेय ते जुगनाखाँला देतात. मेहनतीला बसावें कसें हें देखील ते कटाक्षाने बघत. खांदे उडवूं नयेत. धिरकिट काढतांना, चारी बोटें जुळवून तळहाताच्या गादीने कसा आघात करावा वगैरे साऱ्या गोष्टी काटेकोरपणें पाळल्याशिवाय वाजविण्यांतहि डौल यायचा नाही.

बाळासाहेब डाव्या हाताने तबला वाजवितात. क्रिकेटच्या खेळांत डाव्या हाताचा गोलंदाज फिरकीच्या पद्धतीला जास्त उपयोगी असतो. पण 'धिरकिड' डाव्या हाताने काढणें म्हणजे अत्यंत कठीण काम. आपण डावा हात वापरायला कां सुरवात केली हें त्यांना आज प्रयत्न करूनहि आठवत नाही. खरेंच आहे तें! डाव्या हाताने एखादी वस्तु ठेवली म्हणजे माणूस ती विसरतो, नाही कां?

कवि ज. के. उर्फ बुवा उपाध्ये यांचे फटाके

१

सुप्रसिद्ध कवि जयकृष्ण केशव उर्फ बुवा उपाध्ये आपल्या हजरजबाबीपणा-बद्दल प्रसिद्ध होते. एकदा ते कोल्हापूरला एका मित्राला भेटायला गेले. मित्र घरीं न भेटल्यामुळे, त्यांनी मित्रपत्नीजवळ, आपण रात्रीं भेटायला येऊं असें, त्यांना कळवावयाला सांगितलें होतें.

रात्रीं ठरल्याप्रमाणे बुवा गेले. त्यांचा मित्र आश्चर्यचकित होऊन म्हणाला:—

"वा उपाध्ये कां! आणि गृहस्था, आलास केव्हां—आणि कांही कळवायचं तरी!"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"म्हणजे? वहिनींनी मी येऊन गेल्याचं सांगितलं नाही—?"

"तीं म्हणाली, कुणी पाध्ये की असंच कुणीतरी आलं होतं. पण त्यावरून मला अर्थबोध होईना—"

"असं झालं होय!— म्हणजे पाध्ये नांव सांगितलं आणि 'ऊ' वहिनींच्या डोक्यांतच राहिली वाटतं—"

२

कै. उपाध्ये आणि कविवर्य आनंदराव टेकाडे यांची मैत्री सुप्रसिद्धच होती. श्री. टेकाड्यांनी 'मथुरा' नाटक लिहिलें होतें. त्यांतील एका पदाची ओळ नेहमी म्हणून दाखवून बुवा म्हणत—

"आनंदराव कृष्णप्रेमांत इतके धुंद झाले असतात की त्यांना एखाद्या शद्वाचा अनर्थ कसा होईल हेंहि कळत नाही." ते म्हणून दाखवीत ती ओळ अशी होतीः—

"मुर्ली सदा माधव हा गावा."

शेवटचे दोन शद्व कै. बुवा अशा ठसक्यांत म्हणायचे की मित्र मंडळीचें हंसून पोट दुखत असे आणि याच शद्व पंक्तींचा उपयोग करून त्यांनी कविता लिहिली होती—

"हा गावयास बसला जणुं आ. कृ. टेका—!
डे' रा जणूं —"

३

एक इंग्रजी भाषेचे अभिमानी असलेले गृहस्थ उपाध्ये हजर असलेल्या एका कंपूत मराठी भाषेच्या मर्यादेबद्दल व इंग्रजी भाषेच्या गर्भश्रीमंतीबद्दल बोलत होते. एखादी कल्पना इंग्रजी भाषेत जितकी चांगली व्यक्त करतां येते तीच कल्पना मराठींत—चांगले शद्व नसल्यामुळे—व्यक्त करता येत नाही ही त्यांची मुख्य तक्रार होती. कै. बुवा उपाध्येंना मराठीचा जाज्वल्य अभिमान होता. त्यांना स्वस्थ बसवलें नाही. त्यांनी लगेच आव्हान दिलें—

"असं पहा! तुम्ही सांगा शद्व इंग्रजींतला आणि तसाच मी मराठी सांगतों. कांही-तरीच बोलायचें म्हणजे काय?"

"हे पहा उपाध्ये, इंग्रजीमध्ये Good, Better, Best असे तरतम-वाचक एकाहून एक पायऱ्या चढणारे शद्व आहेत. आहेत तुमच्या मराठींत?"

"हो आहेत तर"! बुवा म्हणाले, "आता तुमच्याच आडनांवाकडं बघा. तुमचें आडनांव आहे "साठे" तुमच्याहून श्रेष्ठ असलेले "साठ्ये" आणि श्रेष्ठतम असलेले "साठये." उगाच मराठीची बदनामी करतां म्हणजे काय!

४

एकदा श्री. आनंदराव टेकाड्यांनी आपली "चांदणी, चमकली, चिमुकली" ही नवीन कविता कै. बुवा उपाध्यांना साभिनय म्हणून दाखविली व त्यावरचा अभिप्राय विचारला. बुवा म्हणाले, मला पहिली ओळच फार आवडली. चांदणी चमकली चिमुकली. आनंदरावा! तूं अगदी चिंचेची चटणी करून टाकलीस—"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिसामाजी

★

दिसामाजी दिस गेले
उलटले ऋतुचक्र
तसा क्षीण होत गेला
तुझा माझा प्रीत-शुक्र

तुझ्या तूं ग संसारांत
आज दंग जाहलीस
पतीसवें बोलायाला
दोन पांखरांचे पीस

तुला उगीच कशाला
म्हणू कांहीवाही असें
तुला देखतांच गडे
तोल माझा सुटलासे

आणि मी हि थाटलेल्या
लगोलग संसारांत
सखी सवें हंसायला
बाळ वाढे कौतुकांत

पण तुवां खांद्यावर
घेतलेला होता बाळ
गालगुच्चा त्याचा घेत
त्याचें पुशिलें कुशळ

ताटातुटीच्या आपुल्या
वाहाणाऱ्या दुःखावर
तुझ्या माझ्या संसाराची
आहे झाकली झालर

आणि पुन्हां पाठमोरे
मार्गी झालों अेकमेक
परि मनः प्रांगणांत
जाग्या स्मृती देत हांक

पण काल अचानक
गर्दीतल्या रस्त्यांवरी
दृष्टभेट होता गडे
झाली होतीस बावरी

तुझ्या घरी माझ्या घरी
नाहीं कशालाच उणें
" तुझेमाझे ' घर ' पण !
उरें बाकी जीवघेणें !

घरकूल रचलेलें
तुझें माझें उधळिलें
आणि आज आपुलाल्या
घरीं जीव चुकलेलें !

—राजा मंगळवेढेकर

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

१९२१ ते १९३५ या कालखंडांतील नागपूरचें सार्वजनिक जीवन

कालसमुद्रांतील रत्नें

वि. ल. उळाभाजे

★

प्रत्येक माणसाने आपलें आत्मचरित्र लिहितों म्हटलें तर एकेका चांगल्या कादंबरीची साहित्यांत भर पडेल, असें कोणत्या एका बड्या माणसाचें वाक्य सर्वश्रुत आहे. ही म्हण अक्षरशः खरी आहे हें, नागपूरचे बॅरिस्टर गोविंद विनायक ऊर्फ भाऊजी देशमुख यांचें 'कालसमुद्रांतील रत्नें' हें पुस्तक वाचून, उत्तम प्रकारें पटतें. अर्थात् कादंबरींत कल्पकतेचा जो भाग असतो तो या ठिकाणीं विचारांत घ्यावयाचा नाही. मनोरंजन व बोध या दृष्टींनीच येथे विचार कर्तव्य आहे. आणि त्या दोन्ही दृष्टींनी हें पुस्तक फार वाचनीय झालें आहे. एकदा पुस्तक हातीं घेतलें कीं तें पूर्ण केल्याशिवाय खाली ठेववत नाही. आणि फार मोठेपणाचें वलय ज्या माणसाच्या भोंवती नाही असाहि माणूस आपल्या कुवतीप्रमाणे पण प्रामाणिकपणें कार्य करीत राहिला तर त्याचें तें कार्य सर्वसामान्य माणसांना कार्यप्रवृत्त करायला कारक ठरूं शकतें, या दृष्टीने या पुस्तकांत भाऊजींनी आपल्या सार्वजनिक कार्याचा जो वृतांत निवेदन केला आहे तो खात्रीने बोधप्रद आहे. अर्थात् हें पुस्तक ज्या कालखंडांतील घटनांवर प्रकाश टाकतें त्या कालखंडांतील घटनांशीं प्रत्यक्ष जवळचा वा दूरचा संबंध ज्यांचा आला असेल त्यांना तर आपण पूर्वी घडलेल्या घटनांचा चित्रपटच पुन्हा पहात आहों असें वाटून तो त्यांत रमून जातो. अशा प्रकारचें पुस्तक लिहून भाऊजींनी जसें आपलें चरित्र लोकांपुढे ठेवलें आहे त्याचप्रमाणें १९२१ ते १९३५ या कालखंडाचा व नागपूरच्या राजकीय व सामाजिक जीवनाचा इतिहास त्रोटक स्वरूपांत सादर केला आहे. सार्वजनिक कार्य करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या या उदाहरणावरून बोध घेऊन जर अशीं आत्मवृत्तपर पुस्तकें लिहिलीं तर इतिहासाचीं उत्कृष्ट साधनें भावी पिढीच्या हातीं दिल्याचें श्रेय त्यांना मिळेल व कोणत्याहि कार्याचें मूल्यमापन करण्याचा एक उत्कृष्ट मार्ग भावी इतिहासकाराला उपलब्ध होईल.

आपल्याकडे आत्मवृत्तें लिहिण्याचा फारसा प्रघात नाही. पण पाश्चात्यांत तो फार आहे. चर्चिल, व्हान पेपन प्रभृतींनी अलिकडच्या काळांत लिहिलेल्या आत्मचरित्रपर लेखांवर व पुस्तकांवर वाचकांच्या कशा उड्या पडतात तें आपण पाहतोंच. मराठींत सामान्यतः दोन प्रकारचीं आत्मचरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. एका प्रकाराचें प्रातिनिधिक म्हणून महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या 'आत्मवृत्ताचा' उल्लेख करतां येईल. या पुस्तकांत स्वतःच्या जीवनाचा व कार्याचा विकास कसकसा होत गेला यावरच मुख्यतः भर दिलेला असतो. त्यामुळे ती व्यक्ति व तिचें कार्य यांची परिपूर्ण कल्पना जरी त्या पुस्तकावरून येत असली, तरी सभोंवारच्या परिस्थितीची कल्पना तितकीशी वाचकाना येत नाही. स्वतःच्या कार्याचा प्रवाह कथन करतांना त्यांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आलेल्या अडचणी वा त्यांना मिळालेला पुरस्कार यांच्या अनुषंगाने सभोंवतालच्या परिस्थितीचा जो ओझरता उल्लेख लेखकाने केला असेल तेवढ्यापुरताच तिचा आपल्याला बोध होतो. मराठींत कांही लेखकांनी रूढ केलेली आत्मचरित्रांची जी दुसरी प्रथा आहे ती म्हणजे व्यक्तिजीवन हें केवळ आधारास घेऊन त्याच्याभोंवती कल्पकतेचें जाळें विणीत जावयाचें, आपल्या अपूर्त आकांक्षांचीं अतिरंजित स्वप्नें त्यांत गुंफावयाचीं व अशा प्रकारें त्याला एखाद्या कल्पित कादंबरीचें स्वरूप द्यावयाचें. यांत एक लाभ आहे व दुसरा तोटाहि आहे. लाभ हा की, प्रसंगाने कोणाचें केलेलें चित्रण दुसऱ्या व्यक्तीला बोंचणारें ठरलें तर ती कादंबरी आहे म्हणून तिच्यांतून सुटका करून घेतां येते. तोटा हा की, लेखकाच्या मनांत असलें तरी लेखकाच्या स्वैर कल्पनाविलासाचा भाग त्यांत किती व ऐतिहासिक सत्याचा भाग किती याची छाननी करणें अशक्य होऊन इतिहासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने तें पुस्तक निरुपयोगी ठरतें. मनोरंजकतेत मात्र ती प्रति-कादंबरीच असते. प्रिन्सिपाल गोविंद चिमणाजी भाटे यांचें 'प्रेम की लौकिक' व दत्तो आप्पाजी तुळजापूरकर यांचें 'माझें रामायण' हीं पुस्तकें या जातीचीं प्रातिनिधिक होत.

परंतु याहून जो तिसरा एक प्रकार विशेषतः इंग्रजींत रूढ आहे तो म्हणजे स्वतःच्या व्यक्तिजीवनावर फार भर न देतां सभोंवतालच्या सामाजिक व राजकीय जीवनाचा विकास कसकसा होत गेला हे मुख्यतः दाखवावयाचें व त्यांच्या अनुषंगाने व्यक्तिजीवनावर प्रकाश टाकीत जावयाचा. कै. सर सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचें 'ए नेशन इन मेकिंग' हें आत्मचरित्रपर पुस्तक या प्रकाराचा उत्कृष्ट नमुना म्हणून सांगतां येईल. पुस्तकाचें नांवच असें दिलें आहे कीं, त्यावरून सुरेंद्रनाथांना स्वतःबद्दल कांही सांगावयाचें आहे असें पहिल्या तडाख्यास वाचकाला वाटत नाही. पुस्तकांतहि 'स्व' चा विस्तार कमीच. बंगालच्या राजकीय जीवनाच्या विकासावर मुख्य भर देऊन आपण त्याला कोठें व किती हातभार लावला याचा धांवता निर्देश मात्र यावयाचा. 'कालसमुद्रांतील रत्नां'चें अवगाहन करतांना मला सुरेंद्रांच्या वरील पुस्तकाच्या जातींत प्रस्तुत पुस्तक बसूं शकेल असें वाटलें. आणि म्हणून मला या प्रकाराचें ज्ञानतः वा सहजतः अवलंबन केल्या-बद्दल भाऊजींना धन्यवाद द्यावेसे वाटतात. मात्र या दोनमध्ये जो महत्वाचा फरक आहे तो हा कीं, या पुस्तकांत भाऊजींचा 'मी' व 'आम्ही' यांची फार दाट छाया पडली आहे. जणूं काय नागपूरांत वा या प्रांतांत या कालखंडांत ज्या काय घटना झाल्या त्यांचा केंद्रबिंदु मीच होतों, असें भासविण्याचा तर लेखकाचा हेतु नाही ना, अशी कुत्सित टीका कांही असहृदयी टीकाकारांकडून या पुस्तकावर होण्याचा त्यामुळे संभव आहे. परंतु ही टीका योग्य ठरणार नाही. फार तर येवढेंच म्हणतां येईल कीं, डॉ. मुंजे, बॅ. अभ्यंकर या दोन प्रखर तेजस्वी ताऱ्यांच्या प्रकाशांत आपलें अस्तित्व स्वाभाविकच लोपून गेल्यामुळे जनदृष्टीला आपल्या कार्याचें वास्तव स्वरूप आणून देण्यासाठीं आपल्या कार्याच्या ठळकपणावर त्यांना थोडा ज्यास्त भर द्यावासा वाटला असेल. कोंडून राहिलेल्या इच्छांचा तो आविष्कार असल्यामुळे कोंडलेल्या पाण्याचा प्रवाह जसा एकदम जोराने बाहेर पडतो तसा कांहीसा प्रकार यांत झाला असला तर तें मनुष्यस्वभावाला फारसें सोडून आहे असें म्हणतां येणार नाही. हा कांही मोठा दोष म्हणतां येणार नाही. 'एकोहि दोषो गुणसंनिपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः।'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कालसमुद्रांतील रत्नां'च्या प्रस्तुत करंडकांत जो कालखंड आला आहे तो भारताच्या जीवनांतला अत्यंत खळबळीचा काळ होता. १९२० ची नागपूरची काँग्रेस झाल्यानंतर राजकीय चळवळीचा जो मनु सुरू झाला तो भारताने आपल्या परकीय राज्यकर्त्यांना दिलेल्या आव्हानाचा—प्रत्यक्ष लढ्याचा होता. १९२१ सालच्या आरंभापासून हिंदुस्थानी प्रजेची वृत्ति अंशतः ' करेंगे या मरेंगे ' अशी झाली होती. सरकारनेंहि प्रत्याघाताची तयारी केली होती. त्या परिस्थितीचें वर्णन करण्याला हातांत लेखणी घेतांना भाऊजींनी 'अरबी समुद्रांतील वादळा'नें प्रारंभ करून जें औचित्य व कलात्मक दृष्टी प्रगट केली ती खरोखरीच कौतुकास्पद आहे. 'हातची गेलेली शिकार' हें या प्रकरणाचें नांवहि त्यांत वर्णन केलेल्या पुढील प्रसंगाने अगदी अन्वर्थक वाटतें. गांधीजींनी प्रस्तुत केलेल्या असहकारितेच्या चळवळीचा परिणाम शहरांत व खेड्यांत सर्वसामान्य लोकांवर कसा झाला; शाळा, कौंसिलें, कोर्टें, व परदेशी माल यांजवरील चतुर्विध बहिष्काराचा उदय व अस्त कसा झाला आणि बहिष्काराच्या पहिल्या गडगडाटाने भ्यालेल्या सरकारने ब्रिटनच्या युवराजांच्या स्वागतावर बहिष्कार पडून जगांत आपली नाचक्की होऊं नये म्हणून राजकीय हक्कांच्या बाबतींत पुढे पाऊल टाकण्यासाठी वाटाघाटी सुरू केल्या व शेवटीं अली बंधूंच्या मुक्ततेची अट गांधीजींनी घातल्यामुळे तो सारा बार कसा वाया गेला, याचें सविस्तर वर्णन या प्रकरणांत आलें आहे. तसेंच चौरीचौऱ्याच्या अकस्मात झालेल्या दंग्याचें निमित्त करून बार्डोलीची करबंदीची चळवळ म. गांधींनी मागें घेतल्यामुळे कांग्रेसच्या चळवळीचे कसे बारा वाजले व तिच्या सामर्थ्याला कशी ओहोटी लागली याचेंहि वर्णन या प्रकरणांत आहे. आतां जनस्मृतींतून गेलेल्या या इतिहासावर प्रकाश टाकून राजकीय नेतृत्वाचे गुणदोष देशाला कसे भोवतात याचें सुंदर चित्रण टीकेने एक अक्षर न लिहितां लेखकानें केलें आहे. १९२२ ला जी प्रांतिक स्वायत्तता आली असती ती पुढे १३ वर्षांनीं म्हणजे १९३५ च्या घटना कायद्याने आली, येवढेंच एक वाक्य त्यांनी लिहिलें आहे. त्या एका वाक्यांत केवढा भावार्थ समावला आहे ! जें १९२१ त झालें त्याचीच पुनरावृत्ति पुढे १९३५ त निघाली. १९३५ च्या राज्यघटनेंतील संघराज्याचा भाग कांग्रेसने फेंटाळला तोहि जिनांच्या विरोधामुळे. त्यानंतर एक तपाने जी राज्यघटना भारतांत चालू झाली ती संघराज्याचीच आहे. फरक एवढाच की, ज्या जीनांच्या विरोधाची कदर करून गांधीजींनी १९३५ च्या राज्यघटनेंतील संघराज्याचा भाग फेंटाळला त्या जिनांनीं शेवटीं भारताचीं शकलें करण्यांत यश मिळविल्यावर हें संघराज्य अस्तित्वांत आलें. जर तेव्हाच ती राज्यघटना लागू झाली असती तर कदाचित् पाकिस्तान होण्याचें टळलें असतें. प्रस्तुत पुस्तकाची कालमर्यादा १९३५ पर्यंतचीच असल्यामुळे त्या प्रसंगाचा उल्लेख यांत आला नसेल. भाऊजींनी ' कालसमुद्रांतील रत्नां 'चा ३ रा करंडा सादर करण्याचें आश्वासन दिलें असल्यामुळे भारताच्या इतिहासांतील या भागावर ते कोणता प्रकाश टाकतात याची त्यांचे वाचक उत्सुकतेने वाट पाहतील.

केवळ शितावरून भाताची परीक्षा करतात त्याप्रमाणें या प्रकरणाचा येथे उल्लेख केला आहे. प्रत्येक प्रकरणाचा इतका विस्तृत परामर्ष घेतां येणें शक्य नाही व जरूरहि नाही. या पुस्तकांतील इतर प्रकरणाचें हें प्रकरण प्रातिनिधिक आहे असें समजण्यास प्रत्यवाय नाही. निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने त्यांनी डॉ. मुंजे, लोकनायक अणे, डॉ. हेडगेवार, बॅ. मोरोपंत अभ्यंकर, पं. मालवीय,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पं. मोतीलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस प्रभृति प्रांतांतील व प्रांताबाहेरील व्यक्तींचें स्वभाव व कार्यचित्रण केलें आहे तें सहृदय आहे. बॅ. अभ्यंकर हे तर त्यांचे बालपणापासूनचे मित्रच होते. त्यांच्याबद्दल ठिकठिकाणीं त्यांनी आदरपूर्वक उल्लेख करावा यांत नवल नाही. परंतु मुंजे–अभ्यंकर वाद-रण या प्रांतांत माजल्यानंतर स्वतः ते अभ्यंकर पक्षीय असताहि डॉ. मुंज्यांच्याबद्दल त्यांनी प्रगट केलेल्या भावना व कांग्रेस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे संबंध कधीच फारसे सुखाचे नसताहि डॉ. हेडगेवारांचा त्यांनी 'लोहपुरुष' या विशेषणाने केलेला उल्लेख व संघ कॉंग्रेस आरोप करते त्याप्रमाणे जातीय नाही हें थोडक्यांत पण परिणामकारक रीतीने पटवून देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न व संघावर शस्त्र धरण्यांत सरकारची कशी चूक होत आहे हें दाखवून देण्याचा त्यांचा प्रयत्न या गोष्टी त्यांनी आपल्या राजकीय पक्ष-निष्ठेचा परिणाम ग्रंथ लिहिताना ऐतिहासिक सत्यावर होऊं दिलेला नाही याच्या द्योतक आहेत. या एका गुणामुळे ग्रंथकार कोणाहि विवेकी वाचकाच्या आदरास पात्र होतो व इतिहासाचीं साधनें या दृष्टीने या ग्रंथाची किंमत फार वरची ठरते.

व्यक्तींप्रमाणेंच निरनिराळ्या प्रसंगांच्या अनुरोधाने त्यांनी राजकीय व सामाजिक प्रश्नांवर जीं मते प्रगट केलीं आहेत त्यांवरून समाजस्थितीचें जसें दर्शन घडतें तसें त्यांचें व्यक्तिदर्शनहि घडतें. विशेषतः 'नागपूरची हिंदुसभा', व 'इंद्र धनुष्य' हीं प्रकरणें त्या दृष्टीने जास्त महत्वाचीं आहेत. हिंदु लोकांना अन्याय झाला तरी त्याचा सामूहिक प्रतिकार करण्याला वा सामूहिक विचार करायलाहि ते कसे अनुत्सुक असतात; तर मुसलमानांची सामुदायिक भावना अशा वेळीं कशी जागृत होऊन उठते याचे त्यांनी गणेश पेठेंतील गणपतीच्या सवाद्य मिरवणुकीच्या प्रश्नावर झालेल्या भांडणाच्या निमित्ताने केलेलें वर्णन फार बोधप्रद झालें आहे. 'मला काय त्याचें !' ही हिंदूंची मनोवृत्ती जी त्याना लहान सहान गोष्टींच्या बाबतींत बाधक ठरली, तिचेंच पर्यवसान शेवटीं त्यांना पाकिस्तानची कडु गोळी गिळावी लागण्यांत झालें. हिंदुसभाविषयक प्रकरणांत त्यांनी नागपुरांतील एका अत्यंत महत्वाच्या चळवळीचें वर्णन केलें आहे. त्या प्रकरणांत प्रगट झालेलीं, हिंसा-अहिंसा वादाबद्दल त्यांची एका खेडुताशी झालेल्या संभाषणाच्या रूपाने स्पष्ट झालेली व 'चरका कीं सुदर्शन' यांत चरख्याचें वैयर्थ प्रगट करतांना त्यानी प्रगट केलेलीं मतें पाहिल्यावर गोळा बेरीज करून जर कोणता एक निष्कर्ष काढतां येत असेल तर तो हा कीं, ते ज्या कॉंग्रेसमध्ये नांदले तेथें त्यांचें खरें स्थान नव्हतें. त्यांचें खरें स्थान हिंदु सभेंत होतें. त्यामुळे स्वतःचीं मतें व प्रवृत्ती यांना अनुसरून कार्य करण्याची संधि न मिळाल्याने एरव्हीं त्यांच्या हातून घडलें असतें अशा उपयुक्त कार्याला हा प्रांत आंचवला आहे. पण मग हें विचित्र शय्यामैत्रक त्यांच्या बाबतींत कसें घडलें ? याचें उत्तर एकच संभवतें. त्यांची व कै. बॅ. मोरोपंत अभ्यंकर यांची बाळपणापासूनची दृढ मैत्री ! छोट्या व मोठ्या मत्स्यांच्या सान्निकतेचा एक स्वाभाविक परिणाम मोठ्या मत्स्याच्या पोटांत छोटा मत्स्य गडप होण्यांत होतो म्हणतात. अभ्यंकरांचें प्रभावी व्यक्तिमत्व, आपलें म्हणणें लोकांच्या माथीं मारण्यासाठी आकाश पाताळ एक केल्यागत वागण्याची त्यांची प्रवृत्ति व सभोंवतालच्या लोकांना आपल्या खिशांत कोंबून वागण्याचें धोरण यांमुळे त्यांच्या आसमंतांतील माणसें त्यांच्या इच्छेविरुद्ध बोलायला कचरत असत. अशा स्थितींत मृदु व ऋजु स्वभावाचे सरळमार्गी भाऊजी देशमुख मोरोपंतांच्या विरोधांत उभे राहण्याला कचरले असले तर तें अस्वाभाविक मानतां येत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

*आकाश-नौका

श्री. बुधे यांच्या प्रतिभेचा आकाश नौकेंतील विहार 'हिमशिखरां'तील त्यांच्या बहुतेक सर्वच वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे हें आरंभीच सांगून ठेवलेलें बरें ! सुहृन्मित्र आराधे यांच्या प्रस्तावनेची जोड देऊन जेव्हा त्यांनी मराठी वाचकांना हिमशिखरांचें दर्शन करविलें तेव्हाच मराठी वाङ्मयांत त्यांना आपला एक विशिष्ट वाङ्मयीन संप्रदाय रूढ करावयाचा आहे अशी माझ्यासारख्या वाचकांची समजूत झाली होती. नीळसर आकाशाच्या मनोहर पार्श्वभूमीवर हिमशिखरांचा देखावा फार दुरून पाहणारालासुद्धा मोह पाडल्याशिवाय राहात नाही. सर्वच वातावरणांत एक प्रकारची संमोहनीय अद्भुतता आढळते. सूर्यकिरणांच्या नृत्यामुळे एक प्रकारची डोळ्यांना दिपविणारी तकाकी त्यावर पसरलेली असते. तसा प्रकार हिमशिखरांच्या दर्शनामुळे झाला. काव्यरत्नावलीकारांनी सत्काव्य नवीन वाटण्याचें कारण रचनाकौशल्यच होय असें एकदा ठासून सांगितलें आहे. तरीपण गूढगंभीरतेची तेजोवलयें निर्माण करणारीं हिमशिखरें टीकाकारांच्या चर्चेचा विषय होण्यास त्यांतील मौलिक गुणच कारण होते हें नमूद करणें इष्ट आहे. आकाशनौकेच्या शेवटल्या पांच सहा पानांत रसिक टीकाकारांनीं कशा निरनिराळ्या दृष्टिकोनांतून श्री. बुधे यांच्या हिमशिखरांकडे पाहिलें आहे हें प्रकाशकांनी नमूद करण्यांत मोठें औचित्य दाखविलें आहे यांत शंका नाही.

परंतु हिमशिखरांहून तत्वतः वेगळा आणि निराळ्याच भूमिकेवरून केलेला हा आकाश-नौकेचा विहार वाचतांना क्षणोक्षणीं असा भास होतो कीं जगन्नाथाला रतिभावाने आळवणारी हिमशिखरांतली प्रेयसी वेगळी आणि आकाशनौकेंतील विहंगमावलोकन सृष्टि निर्माण करणारी प्रतिभा वेगळी ! वास्तविक पाहिलें तर सर्वस्वाचीं गद्य गाणीं लिहिणाऱ्या कविभूषण खापर्डे यांच्या लेखनकालापासून आजतागायत पुष्कळांनी गद्यगाणीं लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला पण गद्य काव्यांच्या स्वैर आणि शिथिल गुणधर्मामुळे तीं पूर्वी कधी लोकप्रिय झालीं नाहीत आणि यापुढेहि तीं लोकप्रिय होण्याचा संभव दिसत नाही. तसेंच त्यांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान देण्याचा प्रयत्न सुद्धा कोणी केलेला दिसत नाही. श्री. बुधे यांच्या कृतींना या दृष्टीने महत्व आहे तें याच कारणामुळे !

कविहृदयांतील भावना जेव्हा काव्यरचनेच्या साऱ्या सीमा ओलांडून धाड् धाड् कोसळणाऱ्या प्रचंड प्रपाताप्रमाणे उफाळून धावायला लागतात तेव्हा अशा स्वैर गद्यांतच त्या अधिक स्पष्ट व सहज रीतीने शोभतील असें म्हणणाऱ्यांचा एक वर्ग आज मराठी वाङ्मयांत नांदत आहे. 'हिमशिखरें' व 'आकाशनौका' हीं दोन्हीं पुस्तकें या मताच्या पुष्टीला उपयोगी पडतील. त्यांतल्या त्यांत आकाश नौकेंतील या तेवीसहि विहारांत जीवनांतल्या निरनिराळ्या अंग-प्रत्यंगांचें विविध दर्शन एका विशिष्ट पद्धतीने घडविण्यात आलेलें आहे. काव्य, संगीत, नाट्य, यौवन, स्त्रीत्व, जीवन, राष्ट्रवाद, नेतृत्व, नीतिशास्त्र, विज्ञान, शिक्षण, धर्म, क्रांति, राजनीति, समाजवाद, कीर्ति, मानवता, इत्यादि अनेक विषयांवर व तदनुषंगिक उपप्रश्नांवर कवीने आपलीं मतें स्वैर गद्यांत मांडलीं आहेत. हिमशिखरांतल्या प्रेयसीचें जग—जीव, जगत् आणि जगन्नाथ या त्रयींचें—म्हणजे गूढतेचें जग आहे. उलट या

* कवि श्री. क्रान्तदर्शी बुधे; प्रकाशक—वीणाप्रकाशन नागपूर, किंमत रु. १॥.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विहारांत सामान्य माणसाच्या प्रमेयांना स्पर्श करण्याची कवीच्या मनाची तयारी म्हणजे प्रगतीचें एक पुढचें पाऊल होय.

पण गूढतेचा मूळचा आभास अधिक गूढ करण्याकरिता निरनिराळ्या गडद भावछटा जास्त भडक करण्याचा श्री. बुधे यांचा जुना हव्यास याहि पुस्तकांत कायम आहे. इतकेंच नव्हे तर कित्येक विहारांत त्यांचा अतिरेकहि करण्यांत आला आहे. उदाहरणादाखल "विज्ञान म्हणजे अर्धवट पूर्त झालेली जिज्ञासा" हें गद्यकाव्य देतां येईल. भावछटांच्या संमिश्र वलयांनी आकर्षकता आणतां येते पण अतिरेकामुळे कधी कधी त्यांत कलाहीनताहि येते. अशीं उदाहरणें या पुस्तकांत आहेत.

आकाशांत स्वैर हिंडताना गरुडाच्या व्यापक नजरेला विस्तृत भूप्रदेश दिसतो पण सृष्टीच्या अंतरंगांत अगर जीवनाच्या अगदी आंतल्या थरांत प्रवेश करणें कठीण असतें किंबहुना तो गरुडाच्या दृष्टिक्षेपाचा धर्मच नव्हे. तसला प्रकार या विहारांचा आहे. दृष्टीसमोर येणाऱ्या प्रत्येक प्रमेयाचा मुखवटा पाहून आपल्या संग्रहीं असणारे निरनिराळे साज त्या प्रमेयावर चढवून आपल्या मनाचें समाधान करून घेण्याची नादी कलाप्रिय भूमिका लेखकाने पुष्कळ वेळा हौशीने पुन:पुनः वापरली आहे.

एरव्ही कवीच्या प्रतिभेने निर्माण केलेली पारंपरिक रूपकें जर जातिधर्मांतर्गत सहजतेने परिपूर्ण असलीं तर काव्याच्या वाचन श्रवणांत एक प्रकारची अवीट गोडी वाटते. पण अशी सहजसुंदरता नसली म्हणजे सर्व शरीरभर हिंदी पद्धतीचीं वस्त्र-भूषणें परिधान करणाऱ्या पण पाश्चात्य पद्धतीची केशरचना करणाऱ्या नवयुवतीच्या दर्शनाने जें रुचिवैचित्र्य भासमान होतें त्याची आठवण कुठे कुठे आल्याशिवाय रहात नाही. त्यांत समाधानाची बाब एवढीच की आपल्या हातांतली कुऱ्हाड समोर दिसणाऱ्या झाडावर चालविण्यासारखा प्रकार या ठिकाणी झालेला नाही ही समाधानाची गोष्ट होय.

पान ६१ वरील नास्तिक–मंदिर, पान ६३ वरील अल्प सत्यांचें आघात सौंदर्य, पान २० वरील 'अमृतकुंड' किंवा पान ७ वरील 'प्रसवाकांक्षी विधवा' हे दाखले पुन:पुनः वाचण्या सारखे आहेत. " वंचनेच्या हेतुगोटी जें जन्माला येतें तें सत्याची नांदी कसें ठरणार ! " असा प्रश्न निर्माण होताच सत्यापलापाची अगर सत्य निर्माण होण्यापूर्वीच्या एखाद्या असत् अवस्थेची कल्पना मनापुढे उभी राहते.

यासारखे वादग्रस्त प्रश्न रंगवितांना प्रतीकविषय झालेल्या विविध जीवनांगांना आलेला अतिरंजितपणा जर पाहायचा झाला तर पान २५ वरील स्त्रीच्या जीवनावरचें रूपक पुनः पुनः वाचावें. एकामागून एक चढत्या रूपकांची गर्दी झाल्याने स्त्रीच्या श्रेष्ठत्वाची पुढची चर्चा धर्मोपदेशकाच्या प्रचारकी थाटासारखी रसहीन झालेली आहे. मराठी काव्यांत तर स्त्रीविषयक गीतें या असल्या वक्तृत्वपूर्ण व्याख्यानापेक्षा अधिक सरस आहेत. तीच गोष्ट " राष्ट्रवाद म्हणजे पाखरांना खिळ-विणारें प्रासाद शिखर " यांतील पान ३३ वरल्या स्वगत भाषणाची आहे. शेवटीं शेवटीं तर त्यांत उघड व्याख्यानच तयार झालें आहे. निरनिराळ्या विषयांवर आपले विचार काव्यमय शब्दांत व्यक्त करतांना त्यांत प्रचारकी तंत्रांचा नकळत अंतर्भाव होऊं नये म्हणून कलावंतांना एका विशिष्ट पातळीपर्यंत संयम पाळावा लागतो. या दृष्टीने श्री. बुधे यांचे समता, धर्म व शिक्षण या विषयांवरले विचार तावून सुलाखून घ्यावे लागतील. कदाचित जीवनांतल्या सगळ्याच प्रमेयांना एकच एक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मोजमाप लावून त्यांचें लहानमोठेपण अजमावण्याची परंपरागत रीती याला कारण असूं शकेल. पण या ठिकाणीं हें स्पष्ट करणें जरूर आहे की अप्रतिहत चाललेल्या त्रिकालाबाधित विचारमंथनाचें मंथनदंडच आतां बदलूं लागले आहेत. यश हीच विचारसरणीची योग्यायोग्यता हें खरें असेल तर नवीं मूल्यें खरीं की खोटीं हें भविष्यकाळ ठरवील. त्यामुळे श्री. बुधे यांनी नव्या ग्रन्थांत मांडलेला सनातन दृष्टिकोन जसाच्या तसा स्वीकारणें निखालस चुकीचें होईल

प्रस्तावनाकारांनी खलील जिब्रानचा जीवनवाद तुलना करण्यासाठी म्हणून उपयोगांत आणला आहे आणि श्री. बुधे यांचा ईश्वरवाद याहि पुस्तकांत खऱ्या खऱ्या रूपांत अस्तित्वांत आहे असा निर्वाळा दिला आहे. पण एक तर श्री. बुधे आपल्या मूळ भूमिकेपासून पुढे आले आहेत हें या पुस्तकांत पानोपानीं दिसून येते. कित्येक ठिकाणीं तर त्यांनी आपला चष्मा काढून ठेवला आहे. वस्तुतः ही एक प्रगतीचीच खूण होय. युगवाणींतूनच परीक्षण करतांना श्री. मुक्तिबोध यांनी तशी अपेक्षाहि केल्याचें स्मरतें. पण खालील जिब्रानचा जीवनवाद मनुष्याच्या अंतर्मनाची पकड घेणारा असून वाचकाला त्याचें लिखाण वाचतांना आपण एखाद्या निकटवर्ती सुहृदाशीं वार्तालाप करीत आहोत इतका आपलेपणा वाटतो. उलट श्री बुधे यांचा आकाश विहार निळ्या वातावरणांतला स्वैरसंचार असून जेव्हा कधी कधी दृष्टी खालच्या जीवनसृष्टीवर जाते तेव्हाच काय तो जीवनाशी संबंध येतो. परमात्म्याशी तादात्म्य पावण्याचा हव्यास येथेंहि कायम असल्यामुळे पार्थिव जीवनांत सदैव सावली-प्रमाणे सोबत करणाऱ्या कटु सत्याची जीवनाविषयीची आर्तता त्यांत प्रकट होत नाही. उलट यतिवेष धारण करणाऱ्या सर्वसंगपरित्यागी माणसाने गावाबाहेर माळरानावर उंच उभे राहून साऱ्या संतप्त जीवांना कंठरवाने जणू सांगावें की "लोकहो! असे आहे तुमचें जीवन! तुमचें विज्ञान, जीवन, शिक्षण, राजनीति यांच्या आंतरिक प्रवाहांत असा विपरीत अर्थ भरला आहे." ही लिखाणांतील अलिप्तता परंपरागत जीवनविषयक श्रद्धेमुळे निर्माण झाली आहे हें उघड आहे आणि म्हणूनच या संघर्षांत जें टिकेल तें चांगले असें मानणाऱ्यांना पुढल्या काळाचा हवाला देणें भाग पडणार आहे.

परंतु 'आकाश नौके'तील कांही प्रतीक-चित्रें खरोखरीच सुंदर आणि हृद्य झालीं आहेत यांत शंका नाही. पान ६० वरील सुरुवात, पान ६४ वरील १८ वा विहार, तसेंच पान २८ वरील आठवा विहार यांतील काव्यकल्पना आकर्षक व सहजस्फूर्त वाटतात. आल्हाददायक वातावरण निर्माण करण्यांत श्री बुधे प्रवीण आहेत यांत शंका नाही. उ०–'काव्य प्रतिबिंबांची क्रीडा आहे.' 'बालक म्हणजे आत्म्याने प्रस्थान ठेवलें आहे ती नौका' 'यौवन म्हणजे उगमापर्यंत जाणारें दृष्ट चैतन्य' या व यांसारख्या दुसऱ्या पुष्कळ विहारांत सुरुवात नितांतसुंदर अशा वातावरणांत झालेली आहे. पण तोच सुंदरपणा अखेरपर्यंत टिकवितां येतां तर बरें झालें असतें. कांही प्रकरणांत तर शेवट मुळीच परिणामकारक होत नाहीत.

तरीपण यावेळीं श्री. बुधे जगाच्या पुष्कळच जवळ आले आहेत. दुर्बोध बायबलच्या जुन्या भाषांतरासारखे कांही प्रकार सोडले तर ओघवती व निसर्गसुंदर भाषापद्धती हा श्री. बुधे यांच्या लिखाणाचा दुसरा विशेष आहे हें नमूद करण्यांत आनंद वाटतो. त्यांच्या कलाप्रवण लेखनपद्धतीला साहित्यांतली निरनिराळीं दालनें

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" मला वाटलं तुझ्या सहवासांत ध्येय अन् सुख दोन्ही मिळेल मला. पण ध्येय साधलं अन् सुख मात्र हातांतून निसटलं···मला पत्नी हवी, घर हवं, मुलं हवींत—" ह्या निर्मलच्या भावनेचा तिने कधी विचार केला कां ?

राजेश्वरी स्त्री होती, मातृभावनेला ती पारखी नव्हती. पण जो पुरुष स्त्रीला हवासा वाटतो, त्याचाच मुलगा आपल्या पोटीं वाढावा, ही तिची भावना होती. पूर्वप्रेमाची विस्मृति तिला झाली नव्हती. निर्मलबद्दल तिला प्रेम कधी वाटलें नव्हतें म्हणूनच तिच्या संसारांत कडवटपणा निर्माण झाल्याबरोबर तो सांभाळून न घेतां, तिऱ्हाईतासारखें दूर सरकतांना निर्मलचा यत्किंचितहि विचार तिने केला नाही. ज्यावेळीं तिच्या प्रेमाची, सहवासाची निर्मलला अत्यंत जरूर होती अशावेळीं ती अविचाराने त्याच्यापासून दूर झाली. तिने स्वतः लग्न केलें निर्मलशीं, प्रेम केलें प्रियदर्शनवर ! अन् स्वतःचा हा दुटप्पीपणा थोडासाहि जमेस न धरतां " एका स्त्रीनं समाधान होण्याची त्याची वृत्ति नाही " हा ठपका निर्मलवर ठेवायला तिला दिक्कत वाटली नाही.

अत्यंत गोंधळलेल्या मनःस्थितींत लेखिकेने रंगविलेलें हें राजेश्वरीचें विसंगति-परिपूर्ण पात्र वाचकांवर कोठल्याच तऱ्हेचा परिणाम करावयास असमर्थ ठरतें. उगीचच वैफल्याच्या वेदनेने विव्हळतांना जर ती " मी एकटीच जाणार " म्हणून दूर जाऊं लागली तर वाचक तिच्याशीं समरस कसे होणार ?

—कु. इंदुमती मोटे.

☆

* वेचलेले मणी

आपल्या पतीच्या जीवनांतील धाग्यादोऱ्यांत स्मृतीच्या मण्यांनी गुंफलेले हे 'वेचलेले मणी' म्हणजे श्रीमती रमाबाईनी आपले पति कै. डॉ. नानासाहेब केदार यांच्या आठवणींच्या रूपांत लिहिलेले हें जीवन चरित्र होय.

कै. नानासाहेब हे मध्यप्रांतांतील श्रेष्ठ कायदेपंडित, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू व वीस वर्षांपूर्वीच्या राजकारणाचे धुरीण होते. स्वपराक्रमाने आपलें कर्तृत्व त्यांनी गाजवलेलें. त्यांच्या धिप्पाड व उंच शरीराप्रमाणेच त्यांचें मनहि खंबीर व महत्वाकांक्षी. मध्यप्रांताच्या राजकारणांत गाजलेल्या व कायदेपंडित म्हणून ज्यांचीं नांवें बोटावर मोजतां येतील अशांत ज्यांची गणना होते त्या नानासाहेबांची ओळख त्यांच्या पत्नीने, अल्प शिक्षण, संसाराचा व्याप व पतीच्या मरणाचा आघात धैर्याने सहन करून वाचकांना करून दिली या कर्तव्य तत्परतेबद्दल श्रीमती केदार केव्हाहि महाराष्ट्राच्या कौतुकाचा विषय होतील. लेखिकेच्या धैर्य, चिकाटी व परिश्रमांची साक्ष म्हणजे हे 'वेचलेले मणि' होत.

थोर माणसाच्या खाजगी आयुष्याबद्दल नेहमीच फार कुतूहल असतें. श्री. रमाबाईनी नानासाहेबांबरोबर आपलें जीवन सावलीप्रमाणे घालविलें. विविध क्षेत्रांत अष्टपैलु हिऱ्याप्रमाणे चमकणाऱ्या त्यांच्या जीवनाची कौटुंबिक बाजु जी रमाबाईनी आपल्यासमोरे ठेवली तशी दुसऱ्या कोणालाहि ठेवणें शक्य

* लेखिका व प्रकाशिका—श्री० रमाबाई केदार, किंमत ३ रुपये.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाली नसती. कै. नानासाहेबांच्या अंगचे अनेक गुण त्यांनी प्रसंगाच्या रूपाने दाखविले आहेत. त्यांची उद्योगप्रियता व परिश्रम यांच्या पाठीतून वाहणारा त्यांचा विशाल मनोधैर्य निरनिराळ्या प्रसंगांतून दिसतो. कर्तव्यकठोरता व सचोटी यामुळे त्यांच्या गाजलेल्या कुलगुरूच्या कारकीर्दीची थोडीशी कल्पना येते. पण ज्याच्या जोरावर मनुष्य सार्वजनिक, राजकीय व सामाजिक कार्याची धुरा वाहतो त्या गृहजीवनांतील स्वभाववैशिष्ट्याचें हें चित्र फार मनोरम आहे. या गृहजीवनाचा भार रमाबाईकडेच असल्यामुळे त्यांचें आत्मकथन यांत आल्यास नवल नाही, व ह्यामुळेच त्यांना या चरित्रांत निरनिराळे विविधरंग भरतां आले. चरित्र व आत्मचरित्र यांचा सुंदर मिलाफ या पुस्तकांत झालेला दिसतो.

कै. नानासाहेबांच्या स्वभावाचें वैशिष्ट्य व त्यांच्या गुणांचे प्रसंगानें व अनुभवाने केलेलें मूल्यमापन यथायोग्यच रंगविलें गेलें आहे. बालपण व विद्यार्थी दशेंतील त्यांच्या आठवणी वाचल्यावर पन्नासवर्षापूर्वीच्या काळाचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहतें पतीच्या चरित्रांतील आठवणी लिहितांना स्वतः अनुभवलेल्या प्रसंगामुळे रमाबाईचा आत्मचरित्रात्मक असा भाग यांत येणें इष्टच आहे. या चरित्राने आजच्या पिढीला आदर्श पतिपत्नि, आदर्श पिता व खरी सहधर्मचारिणी कशी असते याची कल्पना येईल.

पुष्कळ ठिकाणीं रमाबाईचा भावनोद्रेक दृग्गोचर होतो न होतो तोंच त्याला विराम देतात. ह्याला कारण म्हणजे स्वतःबद्दल जास्त नको असेंच रमाबाईंना वाटत असावें पण यामुळें व्यक्तित्वाच्या भावना दाबून टाकल्यासारख्या वाटतात. सत्य केव्हा केव्हा कादंबरीपेक्षां अद्‌भुत व रहस्यपूर्ण असतें याचा प्रत्यय रमाबाईंच्या लग्नाच्या आठवणींने येतो. सार्वजनिक आयुष्यांत झुंझार व निधड्या छातीचे पण घरांत अगदी मृदु अंतःकरणाचे असे नानासाहेब यांत आपल्याला आढळतात.

हें पुस्तक वाचीत असतां रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी' या पुस्तकाची आठवण झाल्यावाचून राहात नाही. दोहींचीहि भूमिका एकच श्रीमती केदारांनी आजच्या गृहजीवनाबद्दल ठिकठिकाणीं जे उद्गार काढले आहेत ते फार मार्मिक व उद्‌बोधक वाटतात. या दोन चरित्र नायकांच्या जन्मांत पन्नास वर्षांचें अंतर आहे. त्यामुळे साहजिकच सामाजिक व राजकीय परिस्थितींत फरक आढळतो. पण घरांतलें वळण फारसें बदललेलें दिसत नाही. भाषेच्या दृष्टीने फरक जाणवतो. आणि तरीहि 'वेचलेल्या मण्यांची' भाषा निराळी व सफाईदार उतरली आहे.

मराठी वाङ्‌मयांत आपल्या पतींची पत्नींनी लिहिलेली बरींच रमणीय व स्मरणीय चरित्रें आहेत. 'माझी कहाणी' या पुस्तकांत बायो कर्व्यांनी समाजसेवक कर्वे गृहस्थ म्हणून कसे आहेत हें निवेदन केलें आहे. श्रीमती रमाबाई केदार यांनी कै. नानासाहेब केदार यांचें गृहजीवन कसें सुखी व समाधानी होतें तें 'वेचलेल्या मण्यांत' स्पष्ट केलें आहे. या पुस्तकाने मराठी चरित्रवाङ्मयांत फार मोलाची भर घातली आहे. जीवनाला स्फूर्ति देणाऱ्या कै. नानासाहेबांच्या विविध गुणांच्या दर्शनाने तरुणांना खात्रीने मार्गदर्शन होईल यांत शंका नाही. या दृष्टीने वेचलेल्या मण्यांचें महत्त्व फार मोठें आहे. तरुण पिढीसमोर अशा पुस्तक रूपाने डॉ. केदारांचा आदर्श ठेवल्याबद्दल रमाबाई ह्या धन्यवादास पात्र आहेत.

—रा. पु सगदेव.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

श्री. ना. रा. शेंडे
चिटणीस, वि. सा. संघ,
यां ज क डू न

वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची सभा रविवार दि. १४–९–'५२ रोजीं सकाळीं ८ वाजतां संघाध्यक्ष प्रि. डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली संघ-कार्यालयांत भरली.

सभेंत खालील कामकाज झालें :

१. सरचिटणिसांनी दि. ६–७–५२ च्या का. का. च्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. जबलपूर येथील अधिवेशनांत हिंदी–मराठी विभाग सीमारेषेवरील तक्रारी दूर करून घेण्यासाठी जी समिति नेमण्यांत आली तिचे आमंत्रक म्हणून श्री. ह. ना. नेने यांना नियुक्त करण्यांत आलें.

३. श्री. दा. वि. देशमुख व सौ. सगुणाबाई देशमुख यांनी वि. सा. सं. च्या मंदिरासाठी ५००१ ची देणगी देणार असल्या संबंधीचें पत्र वाचून दाखविण्यांत आलें. त्याचा साभार स्वीकार करण्यांत आला.

४. श्री. नानासाहेब जोग यांनी मंदिराचा नकाशा (plan) समजावून दिल्यावर खालील दोन ठराव सर्वानुमतें मंजूर झालें.

ठराव नं. १

(१) हा नकाशा (plan) सर्वसाधारणपणे मंजूर करण्यांत यावा.

(२) या नकाशामध्ये शिल्प, सौंदर्य, इम्प्रुव्हमेण्ट ट्रस्टचे नियम इत्यादि कारणांसाठी योग्य ते बदल करण्याचा अधिकार नागपूरस्थ विश्वस्तांना (अध्यक्ष व श्री. न्यायमूर्ति मंगळमूर्ति) यांना देण्यांत यावा.

(३) संघकार्य सुकर होण्याच्या दृष्टीने नकाशामधील समोरचा दर्शनी भाग (तांबड्या रंगांत दर्शविलेला) प्रथम बांधण्यांत यावा आणि हा बांधून झाल्यावर मागील भाग निधि जसजसा जमेल तसतसा बांधण्यांत यावा.

ठराव नं. २

वि. सा. मंदिराच्या बांधकामासाठी अडचणीच्या प्रसंगीं परत करण्याच्या अटीवर चालू निधीमधील रकम वापरण्यास कार्यकारी मंडळाची संमती आहे. 'अडचणीच्या प्रसंगीं' या संबंधीचा निर्णय वि. सा. संघाच्या अध्यक्षांना राहील.

५. संघलेखकास द. म. २५ रु. व चपराशास द. म. १० रु. महागाई देण्याचें ठरलें. तसेंच कार्यालय आठवड्यांतून एकदा बंद ठेवण्यांत येऊन, नोकरांना वर्षांतून १२ सणाच्या सुट्या देण्याचें ठरलें.

६. वि. सा. संघाचें पुढील सम्मेलन कोठे भरवायचें यावर विचार करण्यांत आला.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाची सर्वसाधारण सभा

वि. सा. संघाची सर्वसाधारण सभा रविवार दि. १४-९-५२ रोजीं दुपारीं ४॥ वा. संघाध्यक्ष प्रि. डॉ. श. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखालीं संघकार्यालयांत भरली.

श्री. नानासाहेब जोग यांनी इमारत कशी उभारली जाईल याची स्पष्ट कल्पना, तज्ज्ञ इंजिनियरांकडून काढून घेण्यांत आलेला नकाशा दाखवून दिली. प्रत्येक दालनाला सुमारें ४००० ते ५००० रु. खर्च येईल व छोट्या सभागृहाला ७००० ते ८००० खर्च येईल, असें त्यांनी सांगितलें. श्री. पु. य. देशपांडे यांनी अधिक स्पष्टीकरण करून कार्यकारिणीचा ठराव (नं. १) सभेच्या सम्मतिस्तव वाचून दाखविला.

यावर प्रा. श्री. ना. वनहट्टी यांनी खालील सूचना आणली; व तिला श्री. शं. वा. रानडे यांनी अनुमोदन दिलें. सूचना अशी :

" कार्यकारिणीने आज सकाळीं मंदिराच्या योजनेबाबत जो ठराव सर्वानुमते स्वीकृत केला आहे, त्याला या सभेचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र या ठरावांतील कलम (३) मध्ये "दर्शनी भाग प्रथम बांधण्यांत यावा आणि हा भाग बांधून झाल्यावर मागील भाग निधि जसजसा जमेल तसतसा बांधण्यांत " असे जे शब्द आहेत, त्यांना खालील पुस्ती जोडण्यांत यावी :—

"दर्शनीभाग प्रथम बांधून झाल्यावर रंगपीठ (स्टेज) बांधण्यांत यावें व नंतर सभागृह बांधण्यांत यावें."

या सूचनेसह कार्यकारिणीचा ठराव सर्वानुमते सम्मत झाला.

तद्नंतर, निधि गोळा करण्यासंबंधींची योजना व आदेशाचा ठराव श्री. पु. य. देशपांडे यांनी सभेपुढे मांडला. त्यावेळी त्यांनी नागपूरचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. दामुअण्णा देशमुख आणि त्यांच्या पत्नी सौ. सगुणाबाई देशमुख यांनी दामुपंतांच्या प्रथम पत्नीच्या स्मरणार्थ, रु. ५००१ ची देणगी दिली असून, एका दालनावर तत्संबंधीचा स्मृतिलेख व आंत त्यांचीं छायाचित्रें लावण्याचें का. का. ने मान्य केलें असल्याचें सांगितलें. तसेंच रु. ५०० अगर अधिक रकम देणारांची नांवें फलकावर लावण्याची व इतर लहान सहान रकमांची–मग ती रकम एक रुपयाची कां असेना – यादी व्यवस्थितपणे ग्रंथाच्या स्वरूपांत कार्यालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था केली जाईल असें सांगून, त्यांनी या व्यवस्थेला सभेची मान्यता मागितली; व सभेने ती दिली.

त्यानंतर खालील ठराव श्री. पु. य. देशपांडे यांनी सभेपुढे मंजुरीसाठी मांडला.

ठराव नं. ३

" विदर्भ साहित्य मंदिर बांधण्याबाबत संघाच्या सर्वसाधारण सभेने वेळोवेळीं स्वीकृत केलेल्या ठरावांनुसार कार्यकारी मंडळाने जी योजना तयार केली आहे, तिच्या अम्मलबजावणीस शक्य तों येत्या दिवाळीच्या आंत आरंभ करावा. ही योजना फलद्रूप होण्यासाठी सुमारे तीन लाखांचा निधि जमवावा लागेल. तो पद्धतशीर रीतीने व जलद गोळा होण्यासाठी पुढील प्रमाणे योजना आंखण्यांत येत आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) जेथे संघाच्या शाखा असतील तेथील शाखेच्या कार्यकारिणीने वि. सा. संघाचे अध्यक्ष व मंदिरनिधि समितीचे अध्यक्ष ह्यांच्या अनुमतीने एक स्थानिक मंदिरनिधि साहाय्यक समिती स्थापन करावी व तिच्या मार्फत केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या व संघाध्यक्षांच्या आणि मंदिरनिधि समितीच्या अध्यक्षांच्या आदेशानुसार निधि गोळा करण्याचें कार्य करावें.

(२) जेथे शाखा नसतील तेथे केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक सभासदांच्या आणि प्रतिष्ठित जबाबदार सद्गृहस्थांच्या सहकार्याने वि. सा. संघाचे अध्यक्ष व मंदिरनिधि समितीचे अध्यक्ष ह्यांच्या अनुमतीने स्थानिक मंदिरनिधि साहाय्यक समित्या स्थापन करून, त्यांच्या मार्फत केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या, संघाच्या अध्यक्षांच्या व मंदिरनिधि समितीच्या अध्यक्षांच्या आदेशानुसार निधि गोळा करण्याचें कार्य करावें.

(३) ठिकठिकाणच्या सभासदांनी व्यक्तिशः आपापल्या गावीं संघाध्यक्षांच्या लेखी अनुमतीने वर उल्लेखिलेल्या अटींवर निधि गोळा करण्याची जबाबदारी उचलावी.

(४) वर दर्शविलेल्या मार्गांशिवाय अन्य तऱ्हेनेहि संघाध्यक्षांच्या अथवा मंदिरनिधिसमितीच्या अध्यक्षांच्या अनुमतीने मंदिरनिधि गोळा करण्यांत यावा.

(५) निधीचा हिशेब चोख राहावा म्हणून वरील सर्व साहाय्यक समित्यांनी व व्यक्तिशः साहाय्य करणारांनी वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयाने काढलेल्या पावत्याच वापरल्या पाहिजेत; व मंदिरनिधिसमितीच्या अध्यक्षाकडे शक्य तितक्या लवकर जमा केलेला निधि व त्याचा हिशेब पाठविला पाहिजे."

श्री. आ. रा. देशपांडे यांनी अनुमोदन दिल्यावर वरील ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांची वि. सा. संघाला भेट

भारताचे कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शनिवार दि. २७–९–५२ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. संघाध्यक्ष प्रिं. डॉ. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं, "लोकशाहीच्या परिपोषार्थ मातृभाषांचा विकास होणें अवश्य आहे," असें सांगून, "राष्ट्रभाषेने मातृभाषांची गळचेपी करतां कामा नये." असा डॉ. पंजाबराव देशमुखांनी आपला अभिप्राय व्यक्त केला.

श्री. मंगेश पाडगांवकरांचें काव्यगायन

सुप्रसिद्ध कवि श्री. मंगेश पाडगांवकर यांचा दि. २७–९–५२ रोजीं वि. सा. संघातर्फे सत्कार करण्यांत आला. त्याप्रसंगीं त्यांचें सुश्राव्य काव्यगायनहि झालें.

अमरावती संघशाखेचें वार्षिक अधिवेशन

अमरावती येथे ता. ९ व १० रोजीं झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेच्या द्वितीय वार्षिक अधिवेशनांत पुढील निर्णय एकमताने मंजूर करण्यांत आले आहेत:—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) मध्यप्रदेश राज्यभाषा विधेयक १९५० मधील कलम नं. ४ मध्ये दुरुस्ती करून घेण्यासाठी वि. सा. संघाने एक दुरुस्ती बील म. प्र. असेंब्लीच्या कांहीं सभासदांकडून असेंब्लींत मांडण्याची नोटीस देवविली होती. परंतु नवीन निवडणूक होऊन नवीन विधानसभा अस्तित्वांत आल्यावर हें बील पुनरपि विधानसभेंत मांडल्या जाणें जरुर आहे. ह्या परिस्थितीचा विचार करतां हें संमेलन म. प्र. विधान सभेंतील आमदारांना अशी विनंती करतें की, त्यांनी दुरुस्ती बील विधानसभेंत मंजूर करून घ्यावें. सोबतच हें संमेलन वि. सा. संघाच्या मध्यवर्ती कार्यालयास अशी विनंती करतें की त्यांनी राज्यभाषा विधेयकाच्या ४ थ्या कलमांत दुरुस्ती करण्यासाठी पुनः प्रयत्न सुरू करावेत.

(२) कै. ना. कृ. दिवाणजी हे सरकारच्या समाजशिक्षणाचे कामासाठी प्रवास करीत असतां मोटार अपघाताने त्यांना मृत्यु आला. त्यांच्या मृत्यूबद्दल त्यांच्या कुटुंबियांना सरकारने नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती वि. सा. संघातर्फे करण्यांत आलेली आहे. श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी यांनीहि रीतसर सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. वि. सा. संघाचें अमरावती येथे झालेलें हें संमेलन म. प्र. सरकारला विनंति करतें की त्यांनी श्रीमती शकुन्तलाबाई दिवाणजी ह्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी.

(३) मध्यप्रदेशांतील कॉलेजांतून जी रघुवीर प्रणीत परिभाषा आज कांही ठिकाणीं सुरू आहे व जिच्याबद्दल विद्यार्थ्यांत व शैक्षणिक तज्ञांत, तीव्र मतभेद, असंतोष व विरोध आहे, तीच परिभाषा दुय्यम शाळांत सुरू करण्याचे दृष्टीने प्रयत्न सुरू झाल्याचें समजतें. परिभाषा हा केवळ प्रादेशिक प्रश्न नसून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे, इतकेंच नव्हे तर याबाबत निष्कारण घाई केल्याने सर्वत्र गोंधळ माजून विद्यार्थ्यांचें नुकसान होणार आहे.

विशेषतः परिभाषेच्या प्रश्नांत मराठी भाषेच्या दृष्टीने निरनिराळ्या चार राज्यांचा संबंध येत असल्याने कोणत्याहि एका राज्याने स्वतंत्रपणे निर्णय घेणें हें गैर ठरणारें आहे. म्हणून हें संमेलन राज्य सरकारला व हायस्कूल बोर्डाला अशी विनंती करतें की, त्यांनी आजच्या स्थितींत ही रघुवीर प्रणीत परिभाषा दुय्यम शिक्षण क्षेत्रांत सुरू करूं नये. मध्यवर्ति वि. सा. संघाने त्याबाबत योग्य तें पाऊल उचलून अशा प्रयत्नांचा विरोध करावा.

(४) आपल्या द्वि-भाषिक राज्यांत शैक्षणिक व इतर क्षेत्रांतील कार्यात व्यवहाराची म्हणून मराठी व हिन्दी या भाषांचा वापर होत आहे. या बाबतींत कोणत्याहि भाषिक जनतेवर अन्याय होऊ नये म्हणून ह्या दोन भाषांच्या प्रदेशांना विभागणारी सीमा निश्चित होणें निकडीचें आहे. अशा सीमा-निश्चयाला पोषक म्हणून वि. सा. संमे. व हिंदी सा. संमेलन या संस्थांनी संयुक्त सीमा समिती नेमावी व सीमा विभागांत फिरून या समितीने दोन्ही भाषिक समाजांत परस्पर सहकार्याची भूमिका दृढ करून सीमा-रेषेसंबंधी माहिती गोळा करावी व आपलें मत राज्यांतील सर्व जनतेपुढे व सरकारपुढे सादर करावें, अशी या शाखेची शिफारस वि. सा. संघाच्या का. का. मं. ला ही सभा सादर करीत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(५) वि.सा. संघाच्या जबलपूर अधिवेशनानंतर 'युगवाणी' पुनरपि मासिकाच्या स्वरूपांत प्रकाशित होऊं लागलें आहे. वि. सा. संघाच्या का. का. मं. च्या या निर्णया-बद्दल अमरावती शाखेचें हें संमेलन त्यांचें अभिनंदन करतें.

अमरावती शाखा वृत्त

(१) ता. १५-८-१९५२ रोजीं म. प्र. सरकारचे अर्थमंत्रि श्री. बियाणी यांनी शाखेस भेट दिली त्याप्रसंगीं शाखेतर्फे त्यांना एक निवेदन सादर करण्यांत आलें.

(२) ता. २८-८-५२ रोजीं श्री. सोपानदेव चौधरी यांचा शाखेतर्फे सत्कार करण्यांत आला.

(३) ता. २०-९ ते २७-९-५२ पर्यंत अमरावती नगर वाचनालयाचे सह-कार्याने नवरात्र व्याख्यानमाला गुंफण्यांत आली. खालीलप्रमाणे व्याख्यानें झालींत.

ता. २० श्री. मंगेश पाडगांवकरांचें काव्यगायन, ता. २१ श्री. अण्णासाहेब खापर्डे यांचें व्याख्यान, ता. २२ श्री. भ. श्री. पंडित यांचें व्याख्यान, श्री. ह. रा. महाजनी, संपादक 'लोकसत्ता' मुंबई यांचें भाषण, ता. २३ श्री. प्रा. सुब्बाराव यांचें भाषण, ता. २४ श्री. शि. ल. करंदीकर पुणें, यांचें व्याख्यान, ता. २५ प्रा. निजसुरे यांचें भाषण, ता. २६ श्री. प्रियरंजन सेनगुप्त यांचें भाषण, ता. २७ श्री. हिर्लेकरशास्त्री यांचें व्याख्यान, ता. २८ सकाळीं संघशाखेच्या का. का. मं. चे सदस्य, नगर वाचनालयाच्या का. का. मं. चे सदस्य व व्याख्याते यांचें संमेलन, चर्चा व चहापान.

(४) ७-१०-५२ ला सायंकाळीं पुण्याचे श्री. गो. नी. दांडेकर यांची संघ-शाखेस भेट.

भंडारा येथे वि. सा. संघाची शाखा

रविवार ता. ५-१०-५२ रोजीं भंडारा येथे वि. सा. संघाच्या परीक्षांचा प्रमाण-पत्र वितरण समारंभ झाला. या समारंभाला सरचिटणीस श्री. ह. ना. नेने व परीक्षा समितीचे संचालक डॉ. वि. भि. कोलते हजर होते. याच प्रसंगीं या ठिकाणीं वि. सा. संघाच्या शाखेची स्थापना करण्यांत आली.

महत्त्वाची सूचना

नागपूर येथील वि. सा. संघाचें केंद्रीय कार्यालय शुक्रवारखेरीज रोज दुपारीं ११ ते २ व सायंकाळीं ५ ते ८-३० उघडें असतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाच्या मंदिरनिधीसाठी रोख देणगी देणारांचीं नांवें

[१ आक्टोबर १९५२ पर्यंत]

	रु.
श्रीमंत लक्ष्मण श्रीधर ऊर्फ बाबूरावजी देशमुख, नागपूर	४०००
नाट्योत्सवाचें उत्पन्न	३२१७
श्री. गो. वि. काणे, सेवानिवृत्त तहसिलदार, ,,	१००१
सहकारी संस्था, ,,	१००१
श्री. दा. वि. देशमुख, ,,	१००१
नागपूर इलेक्ट्रिक लाईट अँण्ड पावर कं., ,,	१०००
माजी राज्यपाल, लोकनायक बापूजी अणे	५००
नाट्यप्रयोगाचें उत्पन्न	७९८
श्री. न. का. मोहगांवकर, नागपूर	३०१
माजी राज्यपाल श्री. मंगलदास पक्वासा	२००
श्री. दि. वा. मंडपे, नागपूर	२००
डॉ. म. स. मोडक, ,,	१०१
म. म. वा. वि. मिराशी, नागपूर	१०१
डॉ ना. भा. खरे, नागपूर	१०१
श्री. फुलचंद बिरदीचंद पोद्दार, नागपूर	१०१
डॉ. वि. भि. कोलते, नागपूर	१०१
श्री. पु. वा. काळे, ,,	१०१
श्री. आर. एस्. डवीर, ,,	१००
श्री. गो. गं. कानिटकर, सांगली	१००
सौ. अनसूयाबाई वाडेगांवकर, नागपूर	१००
श्री. एस्. एस्. पेंढारकर, अमरावती	१००
सौ. लीलाबाई रानडे, नागपूर	१००
श्री. कृष्णराव के. ठाकूर, ,,	१००
ॲड. श्री. के. व्ही. तांबे, ,,	१००

	रु.
ले. कर्नल भा. त्रिं. परांजपे, जबलपूर	१००
श्रीमती लक्ष्मीबाई धर्माधिकारी, पांढुर्णा	५१
श्री. गो. आ. मोंघुले, नागपूर	५१
श्री. व्ही. एन्. सहस्त्रबुद्धे, ,,	५१
श्री. एन्. जी. दामले, ,,	५१
श्री. मोंघुले, नागपूर	५०
श्री. प्र. श्री. कोल्हटकर, पुणें	५०
श्री. आनंद काळे, नागपूर	५०
श्री. काशीनाथ पु. काळे, नागपूर	५०
श्री. बाळकृष्ण पु. काळे, ,,	५०
श्री. एस्. जी काशीकर ,,	५०
बॅ. शेषराव वानखेडे, ,,	५०
प्रि. डॉ. शं. दा. पेंडसे, ,,	५०
श्री व्ही. एन्. देव सेवानिवृत्त जज्ज, नागपूर	५०
सौ. प्रभावतीबाई जकातदार, नागपूर	५०
सौ. कमलाबाई सरवटे. ,,	५०
सौ. द्वारकाताई देऊस्कर, ,,	५०
सौ. शांताबाई जोशी	३१
प्रा. के. ज. पुरोहित, नागपूर	२५
श्री. ना. गो. चापेकर, बदलापूर	२०
श्री. पु. र. साठे, सेवानिवृत्त जज्ज, नागपूर	२५
श्री. पळसुले, सेवानिवृत्त जज्ज, ,,	२५
मागील रुपया फंडाची जमा	१९
श्री. चंदुलाल सुळे, नागपूर	११
श्री. पी. बी. तेलंग, ,,	११
श्री. कुंडलराय मोहेकर, ,,	१०
प्रा. श्री. मा. कुळकर्णी नागपूर	१०

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

	रु.
प्रा. गो. मा. कुळकर्णी, नागपूर	१०
श्री. रा. अ. देशपांडे, ,,	१०
ॲड. श्री. जा. म. धारस्कर, नागपूर	१०
,, ,, जोहरापूरकर, नागपूर	१०
,, ,, अबीदअली, ,,	१०
प्रा. व्ही. जी. अयाचित ,,	१०
ॲड. श्री. डे,	१०
श्री. शंकरराव सप्रे ,,	१०
सौ. शारदाबाई काळे, पांढुर्णा	१०
ॲड. श्री. र. सि. देवईकर, चांदा	१०
श्री. पां. चिं. करकरे, नागपूर	५
,, य. के. सातपुते, ,,	५
,, बाळासाहेब कुळकर्णी, वकील, नाग.	५
,, प्रभाकरराव धारस्कर	५
,, हुदा	५
,, शामराव आदमने	५
,, मुरलीधरराव वैद्य ,, ,,	५
ॲड. श्री. दत्तोपंत देशपांडे, नागपूर	५
श्री. प्रभाकर लातूरकर, ,,	५
,, वसंत गणेश सोमण,	५
,, श्रीराम सप्रे,	५
,, डी. जी. नाईक वकील,	५

	रु.
श्री. पी. पी. भटकर, अमरावती	५
ॲड. श्री. वाय्. सी. जोशी, नागपूर	५
श्री. ताराचंद कोनेरी,	५
ॲड. श्री. बच्छराज व्यास, ,,	५
श्री. एल्. पी. नागदेवते, कामठी	५
श्री आनंदराव लाखकर, नागपूर	५
ॲड. श्री. स. म. मेश्राम, नागपूर	५
श्री. एम्. व्ही. निकम, वकील, नागपूर	५
ॲड. श्री. जी. आर. प्रधान, नागपूर	५
सौ. राधाबाई धर्माधिकारी, पांढुर्णा	५
श्री. शारदा समाज, पांढुर्णा	५
,, शामशंकर सरवटे, नागपूर	५
,, शं. वा. रानडे, नागपूर	५
,, ना. ग. उबगडे, भंडारा	५
,, ह. ग. पाटील, वरोडा	१
सौ. शकुंतला पाटील, वरोडा	१
श्री. श्री. ल. लिमये, नागपूर	१
सौ. उषाबाई लिमये, नागपूर	१
श्री. गोपाळराव देव वकील, नागपूर	१
,, गाडगीळ मास्तर, नागपूर	१

एकूण जमा, १५,८५७

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

'युगवाणी'चा दिवाळी अंक वाचकांच्या हातीं देतांना अनेक भावनांचा कल्लोळ आमच्या मनांत उसळला आहे. अंक सभासदांच्या हातांत वेळेवर पडणार आणि त्यांना वाचण्या-जोगा बराच मजकूर देतां येणार हें समाधान व्यक्त करतांना ज्यांनी वेळांत वेळ काढून अल्पावधींत वाणीला लेखन साहाय्य केलें त्यांचे मनापासून आभार मानणें हें आमचें कर्तव्य आहे. श्री. वि. स. खांडेकर, डॉ. पेंडसे, प्रा. पंडित, प्रा. अ. गं. मंगरुळकर, श्री. शांताराम, श्री. मुक्तिबोध यांनी केवळ युगवाणीच्या प्रेमामुळे क्षणाची उसंत नसतांहि आम्हांला जी मदत केली तिचा विशेष उल्लेख करावयाचा आहे.

या वेळी एक नवीन उपक्रम केलेला आहे. "थोरांच्या साहित्य जीवनाचा श्रीगणेशा" हें सदर या अंकांत श्री. बाबासाहेब खापर्डे व कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या आठवणींनीं सजलें आहे. हें सदर अधिकाधिक चांगलें करण्याचा संपादक मंडळाचा प्रयत्न आहे.

आमचा आनंद आणि दिवाळीच्या शुभेच्छा कितीतरी चांगल्या शब्दांत व्यक्त करतां आल्या असत्या. पण वि. सा. संघाच्या गेल्यावर्षीच्या अध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे व संघाचे हितचिंतक श्री. आप्पासाहेब देशपांडे यांच्यावर जी पुत्रशोकाची आपत्ति कोसळली त्यामुळे संघाच्या सर्वच कार्यकर्त्यांचीं मनें खचलीं आहेत. श्री. आप्पासाहेब व सौ. कुसुमावती-बाईंनी ज्या धैर्यानें हें दुःख पेललें आहे तें धैर्यच इतरांच्या मनांत वेदना व भय निर्माण करतें. या असह्य दुःखांतहि स्थिरप्रज्ञ रहाण्याचा आपल्या संयमी व संस्कारी स्वभावाच्या मदतीने दोघेहि प्रयत्न करीत असले तरी जें असह्य आहे तें असह्यच होणार. केवळ शब्दांनी अशा वेळीं सांत्वन लाभणें शक्य नाही. दुःखाने दुःखी होण्याचा मानवी स्वभाव आहे व त्याच दुःखाचा प्रत्यय आम्हा सगळ्यांना आज येत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्यांकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, आक्टोबर १९५२, दिवाळी अंक

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ